• पुणे, गुरुवार, १५ ऑगस्ट २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 247 • वर्ष ३ रे, अंक २४७ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS






मानाच्या मंडळाच्या बैठकीत पोलीस आयुक्तांचा निर्णय

# विसर्जन मिरवणुकीत 'लेझर बीम' वर बंदी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहराची वैशिट्यपूर्ण विसर्जन परंपरा असलेल्या पुण्यातील विसर्जन मिरवणुकीत गेल्या काही वर्षांपासून डोळे दिपवणाऱ्या प्रकाशझोतांचा (लेझर बीम) वापर करण्यात येत आहे. लेझर प्रकाशझोतांमुळे डोळ्यांना इजा पोहोचल्याच्या घटना गेल्या वर्षी घडली होती. या पार्श्वभूमीवर पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी विसर्जन मिरवणुकीत लेझर प्रकाशझोतांचा वापर करण्यास बंदी घातली आहे. प्रकाशझोतांचा वापर केल्यास कारवाईचा इशारा मंगळवारी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सोमवारी पोलीस मुख्यालयात शहरातील सार्वजनिक मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर पोलीस आयुक्तालयात मंगळवारी मानाच्या मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीनंतर पोलीस आयुक्तांनी पत्रकारांशी संवाद साधला.



गेल्या विसर्जन मिरवणुकीत लेझर प्रकाशझोतांचा वापर मोठ्या प्रमाणावर करण्यात आला होता. प्रकाशझोतांमुळे अनेकांना त्रास झाला होता. काहींच्या डोळ्यांना इजा झाली होती. ध्वनिवर्धकाचा वापर मोठ्या प्रमावर करण्यात आल्याच्या तक्रारी करण्यात आल्या होत्या.

विसर्जन मिरवणुकीत वापरण्यात येणाऱ्या लेझर प्रकाशझोतांवर बंदी घालण्यात आली आहे. मिरवणुकीत मोठ्या प्रमाणावर ध्वनिवर्धकाचा वापर करण्यात येतो. सर्वोच्च न्यायालयाने ध्वनिवर्धकाचा वापराबाबत काही निर्देश दिले आहे. या निर्देशांचे पालन करणे गरजेचे आहे. ध्वनीवर्धक पुरवठादार व्यावसायिकांशी चर्चा करण्यात येणार आहे. लवकरच ध्वनी यंत्रणा सांभाळणाऱ्या (डीजे) तंत्रज्ञांची बैठक आयेजित केली जाणार आहे, असे त्यांनी नमूद केले.

> लेझर लाईटची क्षमता पाच मिलीवॅट पेक्षा जास्त असल्यास; ती १० सेकंद एवढ्या कालावधी साठी जरी बाधीत झाली तरी रेटीनास गंभीर इजा होऊ शकते. जे युवक त्या लेझर वारंवारितेच्या (फ्रिक्वेन्सी) केंद्रास्थ लांबी वर ('फोकल लेंग्थ') आले किंवा त्यांचे नेत्रपटल आले तर त्यांना अशा त्रासाला सामोरे जावे लागते. तरुणांना झालेला नेत्रपटल दोष त्यांच्या शिक्षणावर आणि करीअर साठी भयावह ठरू शकतो. त्यासाठी हा लेझर लाईट टाळावा. या लेझर वापरावर नियम , निर्बंध आणण्याची गरज आहे. नाही तर याचे भयंकर परिणाम भविष्यात सोसावे लागतील. आणि त्यात अनेक निष्पाप लोकांची नजर जाईल. — **डॉ. अनिल दुधभाते,** दुधभाते नेत्रालय आणि रेटिना सेंटर.



### पुण्यात गणेशोत्सावादरम्यान 'ड्राय डे'?

● शहरातील गणेश मंडळांनी गणेशोत्सवात १० दिवस दारू बंद (ड्राय डे) ठेवण्यात यावी अशी मागणी पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्याकडे केली आहे. गणेशोत्सावाच्या पार्श्वभूमीवर शिवाजीनगर पोलीस मुख्यालयातील सभागृहात सार्वजनिक गणेश मंडळांच्या पदाधिका-यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी काही गणेश मंडळांनी ही मागणी केली आहे.

### मंडळांना परवानगीसाठी एक खिडकी योजना

● गेल्या वर्षी ज्या गणेश मंडळांनी परवानगी घेतली आहे त्यांना ५ वर्षे परवानगी घेण्याची गरज नसल्याची माहिती यावेळी आयुक्तांनी दिली. तसेच नवीन मंडळांसाठी एक खिडकी योजना लागू करण्यात येणार आहे. अनेक गणेश मंडळे हे वर्गणी न घेता उत्सव मंडळात स्टॉलला परवानगी देताना, या वेळी वाहतूक कोंडी होणार नाही याची काळजी त्यांनी घ्यावी. तसेच कमानी उभारताना देखील वाहतुकीचा विचार करून नियमात बसेल अशा पद्धतीने उभाराव्यात, अशा सुचना आयुक्तांनी दिल्या.

---

» Selected

## जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूस्तर्फे ६ वा शौर्य पुरस्कार प्रदान



**पुणे :** काश्मिरमधील दहशतवादाचे कंबरडे मोडले गेलेले आहे. तरी देखील पाकिस्तान हा कधीही शांत बसणारा देश नाही. तसेच बांग्लादेशी घुसखोरी हा फार मोठा प्रश्न आपल्यासमोर आहे. आज ४ ते ५ कोटी बांगलादेशी भारतामध्ये आहेत. पश्चिम बंगालची २९ टक्के आणि आसामची ३४ टक्के लोकसंख्या बांगलादेशी आहे. सन २०२५ च्या आधी बंगालची किंवा आसामचे मुख्यमंत्री बांग्लादेशी व्यक्ती होऊ शकतो, असे मत ब्रिगेडियर हेमंत महाजन (निवृत्त) यांनी व्यक्त केले. नऱ्हे येथील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटस् तर्फे स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने संस्थेच्या सभागृहात ६ व्या शौर्य पुरस्कार प्रदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. दहशतवाद्यांना पकडणा-या पुण्यातील पोलीस बालरफी शेख, अमोल नजन, प्रदीप चव्हाण, ज्ञानेश्वर पांचाळ, अनिकेत जमदाडे यांना यंदाचा शौर्य पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाला सहाय्यक पोलीस निरीक्षक समीर चव्हाण, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.सुधाकर जाधवर, संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर यावेळी उपस्थित होते.

## डीएसकेमधील ठेवीदार निर्णायक आंदोलनाच्या पवित्र्यात

**पुणे :** डीएसकेंच्या मालमत्ता विकून ठेवीदारांचे पैसे परत मिळू शकतात मात्र मालमत्ता चुकीच्या पद्धतीने विकल्या जात असून ही विक्री प्रक्रिया विशिष्ट खरेदीदारांसाठी राबवली जात असल्याने रद्द करण्यात यावी अशी मागणी आज ठेवीदारांची संघटना असलेल्या चैतन्य सेवाभावी संस्था (असोसिएशन ऑफ डीएसके फ्रॉड व्हिक्टिम्स) ने हिंदू महासंघाच्या सहकार्याने घेतलेल्या पत्रकार परिषदेत केली.यासंबंधी सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल करण्यात येत असून मोर्चे,आंदोलने आणि सामुदायिक आत्मदहनाद्वारे निर्णायक लढाई लढू,असा इशारा या पत्रकार परिषदेत देण्यात आला. या पत्रकार परिषदेत हिंदू महासंघाच्या वतीने अध्यक्ष आनंद दवे, ॲड.नीता जोशी, सीए आदिती जोशी, मनोज तारे, श्वेता कुलकर्णी, विद्या घटवाई, मेघा म्हसवडे, उमेश कुलकर्णी, नितीन जोशी तसेच ठेवीदार संघटनेचे दीपक फडणीस, श्रीकांत अडूळकर, सुधीर गोसावी उपस्थित होते.

डी एस कुलकर्णी तुरूंगामध्ये असताना प्रोसिजर फॉलो न करता जो रिसोल्युशन प्लॅन बनवला आहे तो संपूर्णतः बनावट असून तो खरेदी घेणाऱ्या लोकांसाठी बनवण्यात आलेला आहे. त्यामध्ये जमिनीचे बाजार व शासकीय मूल्य ठेवीदारांच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष ठेवी या बाबींचा विचार करण्यात आलेला नाही, असा आरोप करण्यात आला. मालमत्ता विक्री करताना एकाकडून दुसऱ्याकडे नंतर तिसऱ्याकडे विक्री करून थर्ड पार्टी, फोर्थ पार्टी इंटरेस्ट तयार केले जात आहेत. राज्य सरकारचा हस्तक्षेप गरजेचा असून राजकीय नेते लक्ष देत नाहीत, न्यायालयात, एनसीएलटीमध्ये संथ गतीने प्रक्रिया चालतात, न्यायाधीश बदलत राहतात, तारखा पडतात, यातून ठेवीदार मेटाकुटीला आले आहेत. ३२ हजार पैकी २०० ठेवीदार मृत पावले आहेत, अशी माहिती देण्यात आली.

## ब्रह्मनाद कला मंडळातर्फे 'गुरुवंदना'



**पुणे :** ब्रह्मनाद कला मंडळ व ब्रह्मनाद संगीत विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवर्य पं. श्रीकांत देशपांडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मंगळवार, दि. २० ऑगस्ट रोजी 'गुरुवंदना' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पं. देशपांडे यांचे शिष्य पं. संजय गुरुड 'माझे माहेर पंढरी' हा अभंगवाणीचा कार्यक्रम सादर करणार आहेत. कार्यक्रम सायंकाळी ६ वाजता एस. एम. जोशी, सभागृह, नवी पेठ येथे आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती ब्रह्मनाद कला मंडळाच्या सचिव रागिणी गरुड यांनी निवेदनाद्वारे कळविली आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

## बी.जे. महाविद्यालय प्रशासनाचे महत्वाचे पाऊल

**पुणे :** कोलकत्यातील वैद्यकीय महाविद्यालयात निवासी डॉक्टरवर बलात्कार करून तिचा खून करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या पार्श्वभूमीवर बी.जे.वैद्यकीय महाविद्यालयातील महिला निवासी डॉक्टरांची सुरक्षितता वाढविण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. याचबरोबर महाविद्यालय आणि ससून रुग्णालयाच्या आवारातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची संख्याही वाढविली जाणार आहे. कोलकत्यातील घटनेच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयातील सुरक्षा उपाययोजनांची माहिती अधिष्ठाता डॉ.एकनाथ पवार यांनी दिली. ते म्हणाले की, महाविद्यालय आणि ससून रुग्णालयाच्या आवारात मोक्याच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविलेले आहेत. महिला डॉक्टरांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची संख्या वाढविली जाणार आहे. याबाबत समिती नेमण्यात आली असून, ही समिती कॅमेरे बसविण्याची ठिकाणे निश्चित करेल.

---

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

सीए चंद्रशेखर चितळे यांचे प्रतिपादन

## सनदी लेखापालांच्या मागणीत वाढ होणार

राष्ट्रीय विद्यार्थी परिषदेला चांगला प्रतिसाद



**पुणे :** "भावी सनदी लेखापालांनी पारंपरिक ज्ञानासह आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा, कृत्रिम बुद्धिमत्तेचा विवेकी दृष्टीकोनातून स्वीकार करावा. त्याचप्रमाणे राष्ट्रीय आणि जागतिक पातळीवर सनदी लेखापालांची मागणी मोठ्या प्रमाणात असल्याने व्यावसायिक स्पर्धेची भीती बाळगू नये", असा सल्ला ज्येष्ठ सनदी लेखापाल, केंद्रीय समिती सदस्य चंद्रशेखर चितळे यांनी उभरत्या सीए विद्यार्थ्यांना दिला. दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्स ऑफ इंडियाच्या (आयसीएआय) बोर्ड ऑफ स्टडीज, आयसीएआय पुणे व 'विकासा' पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सीए विद्यार्थ्यांसाठी आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्‌घाटन सत्रात सीए चितळे बोलत होते. 'आरोहण : असेंड, अचिव्ह, ॲडव्हान्स' अशी या परिषदेची मध्यवर्ती संकल्पना आहे. परिषदेला १३०० पेक्षा अधिक विद्यार्थी उपस्थित होते.

याप्रसंगी विभागीय समिती सदस्य सीए यशवंत कासार, परिषदेच्या समन्वयक व आयसीएआय पुणेच्या अध्यक्षा सीए अमृता कुलकर्णी, उपाध्यक्ष सीए सचिन मिनियार, सचिव सीए हृषिकेश बडवे, खजिनदार सीए मोशमी शहा यांच्यासह कार्यकारिणी सदस्य सीए राजेश अग्रवाल, सीए अजिंक्य रणदिवे, सीए प्रीतेश मुनोत, 'विकासा'चे अध्यक्ष सीए प्रणव आपटे, उपाध्यक्ष अभिराज शिंदे, सचिव वैभव अंबोरे, खजिनदार अमोल भोसले, सहसचिव कृष्णा घोळवे, सहखजिनदार गेया शहा, ओंकार फापळ आदी उपस्थित होते.

> सीए विद्यार्थ्यांची ही राष्ट्रीय परिषद ज्ञानोत्सव आहे. विद्यार्थ्यांनी आपली जिज्ञासा जागी ठेवत प्रश्न विचारावेत. प्रश्नांतूनच शिकण्याची प्रक्रिया सुरू होते. काळ झपाट्याने बदलत असल्याने जागतिक आणि राष्ट्रीय पातळीवर सनदी लेखापाल या भूमिकेतून योगदान देण्यासाठी पारंपरिक ज्ञानाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड द्या. देशाची अर्थव्यवस्था यापुढे गतिमान राहणार आहे. सनदी लेखापालांच्या मागणीत वाढ होणार आहे. रोजगार शोधण्याऐवजी रोजगार निर्मिती करणारी उद्योजकीय मानसिकताही घडवा," **- सीए चंद्रशेखर चितळे**

---

## विद्यार्थ्यांच्या प्रेमाने गहिवरले वृद्ध

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**वडगाव :** सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षणासह विविध कलागुणांना वाव मिळावा, यासाठी अनेक उपक्रम राबविण्यात येतात. याचाच एक भाग म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी आभाळमाया वृद्धाश्रमाला भेट दिली.

एन. बी. एन. सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाचा अनोखा उपक्रम

# 'आभाळमाया' वृद्धाश्रमात वृध्दांना भेट!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आंबेगाव :** आंबेगाव येथील एन. बी. एन. सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सिंहगड इन्स्टिट्यूटच्या वर्धापन दिनानिमित्त वडगाव येथील आभाळमाया वृद्धाश्रमाला भेट दिली.

स्वयंसेवकांनी वृद्धाश्रमातील आजी आजोबांसोबत गप्पागोष्टी केल्या व त्यांच्या जीवनातील सुख दुःख जाणून घेतले. स्वयंसेवकांनी वृद्धाश्रमातील लोकांचा एकटेपणा दूर करण्यासाठी व त्यांना प्रफुल्लित करण्यासाठी संगीत, स्वरचित कविता व शिवव्याख्यान इत्यादी कार्यक्रम आयोजित केले होते.

प्रा. सुमित माळी यांनी वृद्धाश्रमातील वृद्धांशी संवाद साधला. त्यानंतर स्वयंसेवकांनी खाद्यपदार्थांचे वाटप केले. तसेच स्वयंसेवक गिरीधर पिंगळे याने शिवव्याख्यान प्रस्तुत करून वृद्धाश्रमातील सदस्यांच्या मनात स्फूर्तीदायक भावना जागृत केल्या. अशा सगळ्या कार्यक्रमानंतर भेटीचा कार्यक्रम एनएसएस क्लेपने संपन्न झाला आणि स्वयंसेवकांना त्यातून प्रेरणा मिळाली व ती भेट सगळ्यांसाठी आनंददायी ठरली.

### मान्यवरांचे मोलाचे मार्गदर्शन

● हा कार्यक्रम यशस्वी व योग्यरित्या पार पडण्यासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. एम. एन. नवले, संस्थापक सचिव डॉ. सुनंदा नवले, संस्थेच्या उपाध्यक्षा रचना नवले, उपाध्यक्ष रोहित नवले, महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. शिवप्रसाद पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. सुमित माळी, प्रा. प्रथमेश बाजारे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

---

राज्यपालांच्या उपस्थितीत एमआयटी मधील कार्यशाळेचा समारोप

# ध्येय ठरवून प्रयत्न करा: राज्यपाल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जीवनात यशस्वी होण्यासाठी ध्येय निश्चित करुन ते साध्य करण्यासाठी प्रयत्न करा. अपयशाच्या वेळी निराश न होता कसोशीने प्रयत्न केल्यास यश नक्की तुमचेच आहे, असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केले.

महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी पुणे येथे आयोजित सामाजिक नेतृत्व विकास कार्यशाळेच्या समारोप कार्यक्रमात राज्यपाल बोलत होते. यावेळी आयर्नमॅन मेजर जनरल विक्रम देव डोगरा, विद्यापीठाचे संस्थापक तथा अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड, कार्याध्यक्ष राहुल कराड, कुलगुरू डॉ. रवी चिटणीस आदी उपस्थित होते.




> विद्यापीठातील शैक्षणिक सोयीसुविधांचा वापर करून, खूप शिक्षण घ्या. विद्यापीठातून बाहेर पडल्यानंतर आपल्याला लोकांची मदत करायची आहे, या भावनेने वाटचाल करा. भ्रष्टाचार हा कर्करोगासारखा असून आपल्या विकासात खूप मोठा अडथळा ठरत आहे. त्यामुळे भ्रष्टाचाराला मुळापासून काढून फेकण्यासाठी कार्य करायचे आहे असे ध्येय मनाशी बाळगून वाटचाल करा. — **सी.पी. राधाकृष्णन,** राज्यपाल

सामाजिक नेतृत्व विकास कार्यशाळा विद्यार्थ्यांमध्ये अनुकूल परिवर्तन घडवून आणण्याचे उत्तम माध्यम असल्याचे सांगून राज्यपाल म्हणाले, युवकांनी आयुष्यात ध्येय निश्चित करावे आणि त्याकडे सुसंगत वेगाने जावे. कधीही हार मानू नका, जे प्रयत्न सोडतात त्यांना यश मिळत नाही. जीवनात यशस्वी व्यक्तीमत्त्वाचा आदर्श पुढे ठेऊन वाटचाल केल्यास यश नक्कीच मिळेल.

डॉ. विश्वनाथ कराड म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपल्याला भविष्यात देशाचे नेतृत्व करायचे आहे हे लक्षात ठेऊन विद्यापीठीय अभ्यासक्रमासोबतच चांगल्या गोष्टींचे शिक्षण घेऊन वाटचाल करावी. स्वामी विवेकानंद यांच्यासारख्या थोर व्यक्तिमत्त्वाचा आदर्श समोर ठेऊन वाटचाल केल्यास, आपल्या प्रश्नांची उत्तरे मिळतील आणि यशस्वी व्हाल.

विक्रम देव डोगरा म्हणाले, प्रत्येक यशस्वी व्यक्तीच्या आयुष्यात कुठेतरी अपयश येऊन गेलेले असते. त्यामुळे अपयशाला घाबरू नये. यशस्वी व्हायचे आहे, याचे उद्दिष्ट समोर ठेऊन प्रयत्न करा. त्यानंतर तुम्ही यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही.

राहुल कराड यांनी सामाजिक नेतृत्व विकास कार्यक्रमाची माहिती देऊन विद्यापीठाच्या विविध उपक्रम आणि कार्यक्रमांची माहिती दिली. कुलगुरू डॉ. चिटणीस यांनी प्रास्ताविक केले.

---

# चतुर्श्रुंगी मातेचे मंदिर राहणार महिनाभर बंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सेनापती बापट रोडवरील श्री चतुःश्रृंगी देवीचे मंदिर हे जीर्णोद्धाराच्या कामासाठी १६ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर या एक महिन्याच्या कालावधीत भाविकांचा दर्शनासाठी बंद राहणार आहे. देवीची मूर्ती या कालावधीत पायथ्याला असणाऱ्या गणपती मंदिरात दर्शनाला उपलब्ध असेल.



भाविकांनी या जीर्णोद्धाराच्या कामासाठी देवस्थानला सहकार्य करावे, असे आवाहन मंदिर समितीच्यावतीने करण्यात आले आहे. चतुःश्रृंगी देवीच्या मंदिरात नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा केला जातो. अनेक भाविक या मंदिरात दर्शनासाठी येतात. काही दिवसांवर आलेल्या नवरात्रीसाठी चतुःश्रृंगी मंदिराचे नूतनीकरण करण्यात येणार आहे. भाविकांनी त्यासाठी देवस्थानला सहकार्य करावे, असे आवाहन मंदिर प्रशासनातकडून करण्यात आलं आहे.

---

'रक्षाबंधन बंधुता' कार्यक्रमा अंतर्गत सीमेवरच्या सैनिकांना भेट

# पुण्याहून काश्मीरला जवानांसाठी राख्या रवाना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आम्ही पुणेकर, केअर टेकर्स सोसायटी,कॅम्प एज्युकेशन सोसायटी, सायरस पूनावाला मुलांची शाळा व कन्या शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने 'रक्षाबंधन बंधुता' कार्यक्रमा अंतर्गत सीमेवरच्या सैनिक बांधवांसाठी पुण्याहून राख्यांचे पूजन करून राख्या सीमेवर तैनात सैनिकांसाठी पाठवण्यात आल्या.

यावेळी कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन वालचंद संचेती, आम्ही पुणेकरचे अध्यक्ष हेमंत जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक शितल जाधव, ज्येष्ठ मूर्तिकार विवेक खटावकर, श्री पांडुरंग आदर्श सेवा ट्रस्टचे सूरज परदेशी, सकल मराठाचे समाजाचे राजा चव्हाण, सोनिया इथापे, पुरातत्व विभाग, मुख्याध्यापक प्रशांत वाघ, समाजसेवक किशोर मेहता, ज्ञानेश्वर कांबळे, केअर टेकर्सचे अध्यक्ष कुमार शिंदे उपस्थित होते.



'रक्षाबंधन बंधुता' उपक्रमाची सुरूवात सहाय्यक पोलीस निरीक्षक शितल जाधव, राजश्री कुऱ्हाडे व चंदा जयस्वाल यांनी मराठा रेजिमेंटच्या सैनिक बांधवाना राखी बांधून केली. या उपक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांनी राख्या व ग्रिटींग कार्ड तयार करून सीमेवरील सैनिक बांधवांसाठी पाठवले आहेत.

वालचंद संचेती म्हणाले, विद्यार्थ्यांना जवानांन बद्दलची आत्मियता निर्माण व्हावी आणि सीमेवरील सैनिकांचे मनोबल वाढण्यासाठी असे उपक्रम शाळेत व्हावेत. 'रक्षाबंधन बंधुता' कार्यक्रमातुनसामाजिक बांधिलकी जपली आहे. सीमेवरील बांधवांसाठी पाठवण्यात आलेल्या राख्या भारत मातेचे जय घोष करीत, जल्लोष पूर्ण वातावरणात रवाना करण्यात आल्या. पुणे, मुंबई,दमन, गांधीनगर, जोधपुर, जयपुर, दिल्ली, पठाणकोट मार्गे जम्मू बेस कॅम्प, उधमपुर कुपवाडा येथे रक्षाबंधनाच्या दिवशी पोहोचणार आहेत.

#रा

• पुणे, गुरुवार, १५ ऑगस्ट २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 247 • वर्ष ३ रे, अंक २४७ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com

BEYOND THE NEWS

## उद्या अंक नाही

गुरुवार, दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त राष्ट्रसंचार कार्यालयास सुटी असल्याने शुक्रवार, दि. १६ ऑगस्ट २०२४ रोजी अंक प्रसिद्ध होणार नाही,
याची वाचक, विक्रेते, जाहिरातदार व हितचिंतकांनी नोंद घ्यावी.

**- वितरण व्यवस्थापक**
**राष्ट्रसंचार, पुणे**

## At a Glance

### कोल्हापूर ते थेट दिल्ली विमानसेवेचा मुहूर्त ठरला

**कोल्हापूर :** गेल्या अनेक वर्षांपासून कोल्हापुरातील उद्योजक,कारखानदारांकडून होत असलेली मागणी व अखेर पूर्णत्वास गेली आहे. कोल्हापूर विमानतळावरून कोल्हापूर ते दिल्ली थेट विमानसेवा सुरू होणार आहे. खासदार धनंजय महाडिक यांनी यासंदर्भात माहिती दिली आहे. येत्या २७ ऑक्टोबरपासून कोल्हापूर ते दिल्ली या मार्गावर विमानसेवा सुरू होणार आहे.

### केंद्रीय पुरातत्त्व खात्याची योजना; पाच वारसा स्थळांचा समावेश

# शनिवारवाडा देणार दत्तक!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** केंद्रीय पुरातत्व विभागाने देशभरातील प्राचीन स्मारके, पुरातत्त्व स्थळांच्या संवर्धनासासाठी पुढाकार घेतला आहे. यासाठी पुरातत्त्व विभागाने एक महत्वाकांशी योजना जाहीर केली आहे. 'अ‍ॅडॉप्ट अ हेरिटेज' असे या योजनेचे नाव या अंतर्गत देशातील नामांकित कंपन्या, स्वयंसेवी संस्था व वारसा स्थळांच्या सवर्धनासाठी कार्यरत संस्थांना या वास्तूंच्या देखभाल करता येणार आहे.

केंद्रीय पुरातत्त्व विभागाच्या अखत्यारित तब्बल ३ हजार ६९६ वारसा स्थळे आहेत. यात प्राचीन स्मारके, मंदिरे आणि काही धार्मिक स्थळे व ऐतिहासिक आहेत. वारसास्थळ दत्तक योजनेत सुरुवातीला देशातील ६६ वारसा स्थळे ही विविध संस्थांना दत्तक दिली जाणार आहेत.

> सरकारकडे ही वारसास्थळे जतन करण्यासाठी पैसा नसावा, यासारखे दुर्दैव नाही, देशातील प्राचीन व ऐतिहासिक वारसास्थळे खासगी संस्था व कंपन्यांना दत्तक देण्याच्या गोंडस नावाखाली केंद्र सरकारने ही स्थळे भाडेतत्वावर देण्याचा घाट घातला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेले गड- किल्ले, तथागत गौतम बुद्ध यांची शिकवण देणारी व जागतिक वारसा असणारी लेणी, मंदिरे, वाडे,वारसा स्थळे खासगी क्षेत्राला आंदण देणे दुर्दैवी आहे.
>
> — सुप्रिया सुळे (खासदार)

शनिवार वाड्यासोबतच पुण्यातील आगाखान पॅलेस, पाताळेश्वर लेण्या यासह पाच प्राचीन पुरातत्त्वस्थळे ही दत्तक दिली जाणार आहेत.पुण्यात अनेक वारसास्थळे आहेत. यातील शनिवार वाडा हे सर्वांचे पर्यटनस्थल आहे. मात्र, आता पुण्याचा ऐतिहासिक साक्षीदार असणारा हा वाडा दत्तक दिला जाणार आहे.

या बाबत केंद्रीय पुरातत्व विभागाने निर्णय घेतला आहे.वारसास्थळे दत्तक घेण्यासाठी दत्तक घेणाऱ्या संस्थांना पर्यटनाला चालना देण्यासाठी विविध सुविधा उपलब्ध करून द्यावा लागणार आहेत. दरम्यान, वारसा स्थळ दत्तक घेण्यासाठी संबंधित संस्था- कंपनी यांच्यासोबत दत्तक करारपत्र करावे लागणार आहे.

या योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी www.asipermissionportal.gov.in या संकेत स्थळावर त्यांचे प्रस्थाव सादर करावे. यानंतर एक समिटी आलेल्या प्रस्तावाचे मूल्यांकन करून त्यांना मान्यता दिल्यावर पाच वर्षांचा करार संबंधित कंपनी अथवा संस्थेबरोबर करणार आहे.या योजनेनुसार ज्या संस्था अथवा कंपन्या या वास्तु दत्तक घेतील त्यांच्यावर वस्तूची देखभाल दुरुस्ती, स्वच्छता व्यवस्थापन व इतर जबाबदऱ्या राहणार आहेत. राज्यातील रायगड जिल्ह्यातील घारापुरी लेणी या पूर्वी पाच वर्षांसाठी दत्तक देण्यात आली आहेत. » पान ७ वर

## १९ पासून पुन्हा पावसाची एन्ट्री

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात राज्यात खूप चांगला पाऊस झाला. सरासरी ५३ टक्के पाऊस पहिल्या आठवड्यात झाला. त्यानंतर ९ ते १० ऑगस्टपासून राज्यातील मोठा पाऊस कमी होण्यास सुरुवात झाली. १३ ऑगस्ट रोजी दिलेल्या अंदाजानुसार राज्यातून मोठा पाऊस पूर्ण ओसरला आहे. फक्त विदर्भात तो १४ ते १६ ऑगस्ट या कालावधीत पडेल. मात्र हा अलर्ट मध्यम पावसाचा आहे. राज्यात १८ ऑगस्टपर्यंत सर्वत्र रिमझिम पावसाचा अंदाज असून, १९ पासून पाऊस वाढण्यास सुरुवात होईल, असा अंदाज हवामानशास्त्रज्ञांनी दिला आहे. गेल्या चार ते पाच दिवसांपासून राज्यातील मोठ्या पावसाने विश्रांती घेतली असून, सध्या कोकणसह मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात कमाल तापमान २१ ते २२ अंशांवरून थेट ३० ते ३१ अंशांवर गेले आहे. आता विदर्भातच पावसाचा अंदाज आहे. त्या भागातही १५ ऑगस्टपासून वाढण्याचा अंदाज आहे.

## आसाराम बापूवर पुण्यात होणार उपचार



**नवी दिल्ली :** बलात्काराच्या आरोपाखाली गेल्या ११ वर्षांपासून जोधपूर मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत असलेला स्वयंघोषित अध्यात्मिक गुरू आसाराम बापू याला अखेर दिलासा मिळाला आहे. उपचारांसाठी न्यायालयाने त्याला सात दिवसांचा पॅरोल मंजूर केला आहे. ८५ वर्षीय आसारामवर महाराष्ट्रात उपचार होणार आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून आसाराम पॅरोलसाठी प्रयत्नशील होता. त्याने अनेकदा अर्ज केले होते. त्यांच्या प्रकृतीची दखल घेऊन अखेर राजस्थान उच्च न्यायालयाने त्याचा पॅरोलचा अर्ज स्वीकारला आहे. आता त्याला स्वखर्चाने पोलीस संरक्षणात उपचार घ्यावे लागणार आहेत. सुरतमधील आश्रम एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी जोधपूरच्या न्यायालयाने दोषी ठरवून आसारामला जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती.

# पवारांचा पडद्या मागून जरांगेना पाठिंबा -हाके

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** जरांगे विधानसभेची एकही निवडणूक लढणार नाहीत. लढाव्यात त्यांनी २८८ मतदार संघ ते लोकशाही मानणार नाहीत. छत्रपतींच्या पुतळ्यासमोर बसतात, शिवीगाळ करतात. ९६ कुळी मराठे हा लोकशाहीत सांगायचा, यावर निवडणूक लढण्याचा विषय आहे का? ते जातीयता मानणारे आहेत. नेता नाहीत असे लक्ष्मण हाके यांनी सांगितले आहे.मराठा आणि ओबीसी आरक्षणावरून सध्या राज्यात संघर्ष निर्माण झाला आहे.

मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांची शांतता रॅलीही सुरु आहे. तसेच त्यांनी सरकारला २९ ऑगस्टपर्यंतचा अल्टिमेटमही दिला आहे. तर दुसऱ्या बाजूने ओबीसी आरक्षणाचे नेते लक्ष्मण हाके लढत आहेत. मराठ्यांना ओबीसीतूनच आरक्षण द्यावे अशी मागणी जरांगे यांनी केली आहे. त्याला विरोध करत हाके मैदानात उतरले आहेत. आज हाकेंनी आरक्षणाच्या मुद्दावरून थेट शरद पवारांवर पुण्यात झालेल्या पत्रकार परिषदेत आरोप केले आहेत. पवारांनी पडद्या मागून जरांगेना पाठिंबा दिल्याचे सांगितले आहे.

हाके म्हणाले, शरद पवार म्हणतायेत कि सर्वपक्षीय बैठक बोलवा. आतापर्यंत ८ महिने झाले. » पान ७ वर

### मुख्यमंत्री त्यांना तरीही रेड कार्पेट देत आहेत का?

आम्ही आरक्षण घेतो, आम्ही खालच्या वर्णात आहोत ही चूक आहे का? न्यूनगंडाची भावना निर्माण झालीय. हक्क आणि अधिकार याची आम्हालाही माहिती आहे. आम्ही जाब विचारू निवडणूकीत उमेदवारांना. ओबीसी आरक्षण टिकले पाहिजे. अशीच सर्व ओबीसींची भावना आहे. स्थानिक स्वराज्य संस्था ३ वर्षे झाली. आरक्षण संपवायचा असा यामागचा विचार आहे. गावांमध्ये आमदार, पक्षांच्या ओबीसी सेलचे पदाधिकारी आम्हाला आंदोलनाला पाठिंबा देत नाहीत. जरांगेंना मात्र आमदार पाठिंबा, खर्च करून देत आहेत.



## डॉ. ज्योती भाकरे यांची नियुक्ती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विद्यापीठाच्या आतापर्यंतच्या कुलसचिव पदाच्या परंपरेतीत दुसऱ्या महिला प्रभारी कुलसचिव यांची निवड करण्यात आली आहे. याचा मान डॉ. ज्योती भाकरे यांना मिळाला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रभारी कुलसचिवपदी डॉ. ज्योती भाकरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. विजय खरे यांच्याकडून डॉ. भाकरे यांनी प्रभारी कुलसचिव पदाची सूत्रे स्वीकारली. डॉ. ज्योती भाकरे या विद्यापीठातील विधी विभागातील प्राध्यापिका आहेत. » पान ७ वर

# पुणे शहरातील ड्रग्स तस्करीचा प्रश्न ऐरणीवर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यात एका पार्टीत काही तरुण ड्रग्ससेवन करत असतानाचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. त्यामुळे पुण्यातील ड्रग्स तस्करीचा प्रश्न ऐरणीवर आला होता. या पूर्वी देखील पुण्यात ड्रग्स तस्करीचे व ड्रग्स निर्मिती करून त्याच्या तस्करीचे प्रकरणे उघडकीस आले आहेत. यानंतर पुणे पोलिसांनी मोठी कारवाई करून सुद्धा ही तस्करी थांबलेली नाही. तस्करांनी आता नशेखोरांना आता थेट कुरिअरद्वारे होमडिलिव्हरीद्वारे ड्रग्स पुरवठा करत असल्याचं पुढं आलं आहे. या प्रकरणी विश्रांतवाडी पोलिसांनी एकला अटक केली आहे.

पुण्यात विश्रांतवाडी परिसरातून दोन दिवसांपूर्वी तब्बल १ कोटी रुपयांचे



मेफेड्रोन जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आली असून त्यांची चौकशी केली असतांना धक्कादायक माहिती तपास पथकाला मिळाली. नशेखोरांना घरपोच कुरिअर द्वारे ड्रग्सची डिलिव्हरी होत असल्याची माहिती पुढे आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी कुरिअर कंपनीतील एका कर्मचाऱ्याला अटक केली आहे. अमली पदार्थ तस्करांकडून देण्यात आलेले ड्रग्स हे कुरिअर कंपनीतील » पान ७ वर

» अंमली पदार्थ

# गोविंदांना १० लाख रुपयांचे विमा संरक्षण!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** राज्य सरकारने दहीहंडी उत्सवापूर्वी गोविंदांसाठी महत्वाची घोषणा केली आहे. गोविंदांसाठी १० लाख रुपयांचे विमा संरक्षण लागू करण्यात आले असून दहीहंडी फोडण्यासाठी मानवी मनोरे तयार करतांना एखादी दुर्घटना किंवा दुर्घटना घडल्यास किंवा जखमी झालेल्यांना १० लाख रुपयांचे विमा संरक्षण दिले जाणार असल्याचे राज्याच्या क्रीडा विभागाने जाहीर केले आहे.

या साठी २४ ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन देखील करण्यात आलं आहे. दहीहंडी असोसिएशनने आक्षेप घेतलेला असतानाही महाराष्ट्र राज्य दहीहंडी » पान ७ वर

### २४ ऑगस्ट पर्यंत करता येणार अर्ज

दहीहंडी असोसिएशनने (महाराष्ट्र राज्य) सरकारच्या या निर्णयाला आक्षेप घेतला आहे. असे असतांनाही महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशनने मुंबईसह महाराष्ट्रातील सर्व गोविंदांचा विमा उतरवण्यास सुरुवात केली आहे. या साठी गोविंदांना २४ ऑगस्टपर्यंत अर्ज भरण्याचे आवाहन करण्यात आहे. विमा संरक्षणाचा कालावधी हा १४ ऑगस्टपासून ते २८ ऑगस्ट पर्यंत ६ वाजेपर्यंत राहणार आहे.

## चार दहशतवादांचा केला खात्मा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**श्रीनगर :** स्वातंत्र्यदिनाच्या एक दिवस आधी सुरक्षा दलांना मोठे यश मिळाले आहे. जम्मू-काश्मीरच्या डोडा जिल्ह्यात बुधवारी लष्करासोबत झालेल्या चकमकीत चार दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आला. मात्र, या कारवाईत लष्कराचा एक कॅप्टन शहीद झाला.

अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली. या चकमकीत एक नागरिक जखमी झाला आहे. कॅप्टन दीपक सिंह हे ४८ राष्ट्रीय रायफल्सचे जवान होते. दहशतवादी हल्ल्यांमध्ये अचानक वाढ झाली असून, सुरक्षा यंत्रणांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. खोऱ्यातील वाढत्या दहशतवादी घटनांच्या पार्श्वभूमीवर, संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी बुधवारी तातडीची बैठक घेतली.

## आकर्षक रोषणाई

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



इंदापूर: स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने उजनी धरण व्यवस्थापन विभागाच्या वतीने राष्ट्रध्वज तिरंगी झेंड्याच्या तीन रंगात उजनीतून भीमा नदी पात्रात होत असलेल्या विसर्गाच्या पाण्यावर आकर्षक विद्युत रोषणाई केली आहे.

## अखेर उड्डाणपूल आज खुला होणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सिंहगड रस्त्यावरील उड्डाण पूल तयार होवून ही सुरु करण्यात आला नव्हता. सिंहगड रस्त्यावर राजाराम पुल चौकात उभारण्यात आलेला उड्डाणपूल गुरुवारी खुला केला जाणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार व पर्वती विधानसभा मतदार संघाच्या आ.माधुरी मिसाळ यांच्या हस्ते हा पुल खुला केला जाणार आहे. येथील वाहतूक कोंडी लक्षात घेता. प्रशासनाने उशीरा का होईना यांची दखल घेवून. अखेर आज सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे.मागील आठवड्यात या पुलाचे काम पूर्ण झाले होते. त्यानंतर तो सुरू करण्याची मागणी केली होती. हा उड्डाण पूल आज स्वातंत्र्यदिनी नागरिकांसाठी सकाळी ७ वाजल्यापासून खुला होत असल्याने वाहनचालकांची गैरसोय टळणार आहे.



### गणेश भक्तांना बाप्पा पावला ; यंदाही टोलमाफी

# पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करा !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा. गणेशोत्सवापूर्वी राज्यात सर्वत्र गणपती आगमन आणि विसर्जन मार्गावरील खड्डे तातडीने बुजवावेत त्यासाठी रॅपीड क्वीक सेटिंग हार्डनर-एम सिक्टी या आधुनिक साहित्याचा वापर करावा. झाडांच्या फांद्याची छाटणी करावी. कृत्रिम तलावांची संख्या वाढवावी. मोठ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या ठिकाणी आरोग्य पथक, रुग्णवाहिका, अग्निशमन वाहन तैनात करावेत असे निर्देश देऊन गणेशोत्सवासाठी गावी जाणाऱ्या गणेश भक्तांना यंदाही टोल माफीचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे जाहीर केला. सह्याद्री अतिथीगृह येथे गणेशोत्सवानिमित्त कायदा व सुव्यवस्थेचा आढावा आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याबाबत बैठक झाली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, मुंबई शहरचे पालकमंत्री दीपक केसकर, मुंबई उपनगर पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव डॉ. आय. एस. चहल, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला आदी यावेळी उपस्थित होते. राज्यातील सर्वच मोठ्या शहरांमध्ये गणपती आगमन आणि विसर्जन मार्गावरील खड्डे बुजवण्यासाठी रॅपीड क्वीक सेटिंग हार्डनर-एम सिक्टी या आधुनिक साहित्याचा वापर करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी महापालिका आयुक्त, जिल्हाधिकारी यांना दिले.

» पान ७ वर

#रा

## लाडकी बहीण योजना; पैसे जमा होण्यास सुरुवात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे पैसे खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली आहे, अशी माहिती भाजपाचे आमदार राणाजगजितसिंह पद्मसिंह पाटील यांनी एक्स खात्यावरून दिली. महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी राज्य सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अंमलात आणली आहे. १ जुलैपासून ही योजना कार्यान्वित झाली असून आतापर्यंक १ कोटी ३५ लाख अर्ज स्वीकारण्यात आले आहेत. तर, रक्षाबंधाच्या पार्श्वभूमीवर १७ ऑगस्ट रोजी हा निधी पात्र महिलांच्या खात्यात जमा होईल असे सांगितले.

# कमला नेहरू रुग्णालयात दहशतवादी घुसल्याचा संशय!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिकेच्या कमला नेहरू रुग्णालय येथे संशयित घुसल्याने मोठा गोंधळ पुणे -पुण्याच्या मंगळवार पेठेतील पुणे महापालिकेच्या कमला नेहरू रुग्णालय येथे संशयित घुसल्याने मोठा गोंधळ सुरू झाला होता. सुरक्षारक्षकांनी तातडीने पाऊल उचलून या संशयिताना रूममध्ये बंद केले.यावेळी रुग्णालयातून सर्वांना बाहेर काढण्यात आले होते.

पोलिसांनी त्या तीन संशयित व्यक्तींना ताब्यात घेतले. हे तीन व्यक्ती दहशतवादी किंवा बांगलादेशी असल्याच्या संशय व्यक्त केला जात होता. परंतु हे दहशतवादी किंवा बांगलादेशी असल्याच पोलिसांच्या प्राथमिक चौकशीच आढळून आलेल नाही असे पोलिसांनी सांगितले आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ताब्यात घेतलेले तरूण पुण्यात लोहियानगर परिसरात वास्तव्याला आहेत. मूळचे बिहारचे असून त्यांच्याकडे आधारकार्ड मिळून आले आहेत. काही स्थानिकांनी या तरूणांचे फोटो काल समाजमाध्यमांवर बांग्लादेशी म्हणून टाकून खोटा मेसेज पसरवला होता. आज हे तरूण कमला नेहरू रूग्णालयात गेले असता समाजमाध्यमांवर फोटो बघितलेल्या सुरक्षारक्षकांनी पोलीस कंट्रोलला याची माहिती दिली. » पान ७ वर

# थोडी खुशी, ज्यादा गम!

नुकताच पॅरिस ऑलिम्पिकचा समारोप झाला. मागच्या टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारताने एका सुवर्णपदकासह सात पदकांची कमाई केली होती. ती भारताची ऑलिम्पिकमधील सर्वोत्तम कामगिरी होती. त्यामुळे भारतात कधी नव्हे ते ऑलिम्पिक स्पर्धेबाबत उत्सुकता निर्माण झाली होती व पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारत पदकांची दोन आकडी संख्या नक्कीच पार करेल, अशी अपेक्षा निर्माण झाली होती. त्यादृष्टीने भारतीय चमूतील खेळाडूंनी स्पर्धेत जोरदार शुभारंभही केला होता. मात्र, शेवट गोड करण्यात भारताला अपयशच आले. पॅरिस ऑलिम्पिकचा भारताचा शेवट चढता नव्हे तर उतरणीचा झाला. एकमेव रौप्यपदकासह भारत कसाबसा सहा पदकांच्या संख्येपर्यंत पोहोचला आणि पदकांची दोन आकडी संख्या गाठण्याचे स्वप्न अधुरेच राहिले. विनेश फोगट प्रकरणाचा निकाल आपल्या बाजूने लागला तर आपल्याला टोकियोतील सर्वोत्तम कामगिरीची बरोबरी केल्याचे समाधान मिळेल, एवढेच! मात्र सर्वच बाबतीत भारत महासत्ता म्हणून पुढे जात असल्याचा दावा हल्ली पदोपदी होत असताना क्रीडा क्षेत्रात मात्र आपण महासत्तांच्याच नव्हे तर अनेक छोट्या देशांच्या तुलनेतही बरेच माघारलेले आहोत, हे सत्य आपल्याला पचवावेच लागते. आकडेवारीसहच तुलना करायची तर महासत्ता अमेरिका व चीन यांच्या स्पर्धेतही आपण कुठे दिसत नाही हे कटू वास्तव आहे. अमेरिकेने ऑलिम्पिक स्पर्धेतील सर्व क्रीडा प्रकारांमध्ये म्हणजे ३४ खेळांमध्ये सहभाग नोंदविला व सर्वच्या सर्व ३४ प्रकारांमध्ये पदके जिंकली. एकूण १४ खेळांत सुवर्णपदके अमेरिकेने जिंकली व चीनला एका पदकाने मागे टाकत अव्वल क्रमांक मिळविला. अमेरिकेच्या चमूमध्ये ५९२ खेळाडूंचा समावेश होता व त्यांनी एकूण १२८ पदके जिंकली. प्रति खेळाडू पदक असा स्ट्राईक रेट काढल्यास तो ४.७० पदके प्रति खेळाडू असा निघतो. स्पर्धेत सहभागी सेंट लुसिया या कॅरेबियन देशाने केवळ चार खेळाडूंचे पथक पाठवले आणि एक सुवर्ण व एक रौप्यपदक जिंकले! चीनने ४०५ खेळाडूंचा चमू पाठवला व एकूण ९१ पदके प्राप्त केली. किर्गिजस्तानने १६ खेळाडूंचा चमू पाठवला व एकूण ६ पदके प्राप्त केली. द. कोरियानेही १६ खेळाडूंचा चमू पाठवून ६ पदके पटकावली. ग्रेनाडाने ६ खेळाडू पाठवले व २ पदके मिळवली! बहरीनने १३ खेळाडू पाठवले व चार पदके पटकावली. इराणने ४१ खेळाडू पाठविले आणि १२ पदके पटकावली. उ. कोरियाने १४१ खेळाडू पाठवले आणि ३२ पदके पटकावली. या तुलनेत भारताने ११७ खेळाडूंचे पथक पाठवले आणि आपल्या पदरात केवळ ६ पदके पडली, ही वस्तुस्थिती आहे. पदकांच्या क्रमवारीत भारत ७१ व्या स्थानावर राहिला. मनू भाकरच्या अपेक्षित तिसऱ्या पदकासह मीराबाई चानूपर्यंत भारताचे सहा खेळाडू चौथ्या क्रमांकावर अडकले व त्यांना पदकांना मुकावे लागले. मोक्याच्या क्षणी हे अपयश आले नसते तर भारताची पदकसंख्या आज नक्कीच दोन आकडी राहिली असती! लक्ष्य सेन व सात्विक चिराग शेट्टी किंवा पी. व्ही. सिंधू हे खेळाडू इतर स्पर्धांमध्ये ज्या खेळाडूंना अगदी सहजपणे हरवतात त्याच खेळाडूंसमोर ऑलिम्पिकमध्ये मात्र नांगी टाकतात! हे मानसिक दृढतेच्या अभावाने होते की, भारतीय खेळाडूंची या सर्वच स्पर्धेसाठीची तयारी कमी पडते? या प्रश्नाचे उत्तर आपल्याला आता शोधावेच लागेल. ते न शोधता आपण मिळालेल्या यशावर समाधान मानतो म्हणूनच अनेक छोटे-छोटे देशही पदकांच्या स्ट्राईक रेटमध्ये भारताला मागे सोडतात. मुळात ऑलिम्पिकसारख्या सर्वोच्च जागतिक स्पर्धेत उत्तम कामगिरी करायची तर देशात क्रीडा संस्कृती शेवटपर्यंत रुजायला हवी. ज्यांच्यात गुणवत्ता आहे त्यांना संधी मिळायला हवी व मिळालेल्या या संधीचे सोने करण्यासाठी त्या खेळाडूस सर्वोत्तम प्रशिक्षणापासून सर्वोत्तम सुविधांपर्यंत सर्व काही वेळेवर, नियमित मिळायला हवे. त्यात सरकारी हस्तक्षेप, राजकारण शिरायला नको. तरच अशा स्पर्धांसाठीचे सर्वोत्तम खेळाडू देशात तयार होतात. अमेरिकेसारखा देश ही क्रीडा संस्कृती जोपासतो म्हणूनच त्या देशाचे खेळाडू सर्व क्रीडा प्रकारांमध्ये हमखास पदक पटकाविण्याची किमया करू शकतात. आपल्याकडे फक्त खेळाडूंवर किती कोटींचा खर्च झाला याचे आकडे सांगून आपण क्रीडा संस्कृती निर्माण केल्याची शेखी मिरवण्यात धन्यता मानतो. सात पदके मिळाली हे चांगलेच पण त्याने हुरळून जाऊन २०३६ च्या ऑलिम्पिक यजमानपदावर दावा ठोकणे कितपत संयुक्तिक? हा प्रश्न ऑलिम्पिकमधील आपले इतर देशांच्या तुलनेतील यश व कामगिरी पाहता वारंवार छळत राहतो. यजमानपद आणि खेळाडूंची कामगिरी यांचा काय संबंध? असा युक्तिवाद यावर नक्कीच होऊ शकतो. मात्र, यजमानपदाला खरा अर्थ तेव्हाच प्राप्त होऊ शकतो जेव्हा देशात सर्वोत्तम खेळाडू तयार होतात, क्रीडा संस्कृती देशात रुजलेली असते व एकूणच देशात खेळासाठीचे 'मैदान' प्रत्येकाच्या मनात व कृतीत निर्माण झालेले असते. मुळात ही क्रीडा संस्कृती आपल्या देशात रुजली आहे का? याचे आत्मपरीक्षण व्हायला हवे. अनेक क्रीडा प्रकारांमध्ये भारत आजही ऑलिम्पिक स्पर्धेत सहभागी होत नाही किंवा अशा सहभागासाठी आवश्यक पात्रता आपण गाठू शकत नाही, हे १४० कोटी लोकसंख्या असलेल्या आपल्या देशात क्रीडा संस्कृती रुजल्याचे, फुलल्याचे लक्षण आहे काय? शालेय पातळीपासून जर क्रीडा संस्कृती रुजविण्याचे व फुलविण्याचे प्रयत्न झाले तरच देशात सर्वोत्तम खेळाडू तयार होतील. आपल्याकडे खरेच याकडे कधी गांभीर्याने पाहिले जाते काय? हा खरा प्रश्न! खेळाडूने पदक मिळविले की, आपण त्याच्यावर कौतुकाचा आणि धनाचाही वर्षाव करतो. मात्र, असे पदक विजेते घडविण्यासाठी किती गंभीर प्रयत्न करतो? अनेक वर्षांची अथक मेहनत व योग्य प्रशिक्षण याशिवाय पदक विजेते खेळाडू तयार होऊ शकत नाहीत, हे वास्तवच स्वीकारायला आपण तयार नाही. मग या देशात क्रीडा संस्कृती रुजणार कशी आणि आपण क्रीडाक्षेत्रात महासत्ता होणे सोडाच पण सन्मानाने उभे राहणार कसे? हाच प्रश्न! जोवर या प्रश्नाचे प्रामाणिक उत्तर शोधून आपण कामाला लागत नाही तोवर मग असे 'थोडी खुशी, ज्यादा गमचे' भावनिक हेलकावे आपल्याला सोसावेच लागणार, हे मात्र निश्चित! ■

# शंभरीकडे जाताना...

भारतीय स्वातंत्र्याला ७७ वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्ताने गेल्या साडे सात दशकांच्या वाटचालीचे सिंहावलोकन करताना आपण साध्य केलेल्या उपलब्धींच्या बाबतीत अभिमन बाळगतानाच ज्या उणिवा राहिल्या त्यांचाही विचार करणे आवश्यक आहे. त्यातूनच स्वातंत्र्याच्या शतक महोत्सवामध्ये देशाची समाजव्यवस्था, अर्थव्यवस्था कशी असावी, देशाचे एकंदरीतच चलनवलन कसे असावे या दिशेने प्रयास करता येतील. भूतकाळातील प्रवासाच्या चर्चेत रममाण झाल्यास भविष्यातील वाटचालीच्या नियोजनाचा विसर पडण्याची शयता असते. किंबहुना यामुळे भविष्याचा वेध घेण्याची आपली मानसिकता कुंठीत होत जाते. त्यामुळे भूतकाळाचा धावता आढावा घेताना पुढील २५ वर्षांमध्ये नेमकेपणाने काय करायला हवे याचा लेखाजोखा प्रस्तुत लेखातून मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारताची लोकसंख्या सुमारे ३४ कोटी होती. ती आता १४० कोटींवर पोहोचली आहे. दुसरीकडे जगाचा विचारकेल्यास १९५०-६० च्या दशकात २५० ते २६० कोटी असणाऱ्या वैश्विक लोकसंख्येचा आकार आता ७७५ ते ८०० कोटींपर्यंत पोहोचली आहे. म्हणजेच जागतिक लोकसंख्या गेल्या ७० वर्षांत तिपटीने वाढली आहे आणि याच काळात भारतातील लोकसंख्या चौपट वाढली आहे. या पार्श्वभूमीवर वाढत्या लोकसंख्येच्या मानाने सकल राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न वाढले का, देशातील कृषीक्षेत्र, पायाभूत सुविधा, निर्यात वाढली का, इंधन आणि ऊर्जेसारख्या क्षेत्रांमधील भारताचे परावलंबित्व वाढले का याचा विचार करणे आवश्यक आहे. सर्वंकष विकासाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी केवळ दरडोई उत्पन्न वाढणे पुरेसे नाही; तर उत्पन्नाबाबतची समानता आहे का की मूठभरांच्या हातीच संपत्तीचे केंद्रीकरण झाले आहे हेही पाहणे गरजेचे आहे. कारण गरीब आणि श्रीमंत यांच्यातील वाढती दरी ही केवळ विषमतादर्शक नसते, तर समाजविघातक होत जाते. भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा देशातील नागरिकांचे सरासरी आयुर्मान ३२ ते ३४ वर्षे होते. ते आज ६९ वर्षे झाले आहे. जगाच्या तुलनेत हे कमी असले तरी याबाबत आपण प्रचंड प्रगती केली आहे. अन्नधान्याची उपलब्धता, वैद्यकीय सोयीसुविधांचा विस्तार यामुळे हे शय झाले असून ही उपलब्धी खूप मोठी आहे. स्वातंत्र्यानंतरची सर्वांत मोठी उपलब्धी म्हणजे, ऐतिहासिक आणि भौगोलिक दृष्ट्या प्रचंड वैविध्यता असणारा, विविध जातीधर्मांचे लोकसमुदाय असणारा हा खंडप्राय देश आज ७५ वर्षांनंतरही एकसंध राहिला आहे. अमेरिका हादेखील एकसंध देश असला तरी मुळातच तिथे भारताइतकी वैविधता नाहीये. चीनचे उदाहरण घेतल्यास तिथे लोकशाही व्यवस्था नाहीये. या पार्श्वभूमीवर भारतासारख्या लोकशाही देशाचे अखंडत्व हे निश्चितच उजवे ठरणारे आहे. देशांतर्गत पातळीवर कितीही मतभेद असले, वादविवाद असले, जातीपातींमधील संघर्ष असले, प्रादेशिक-भाषिक-धार्मिक अस्मितांचे प्राबल्य असले तरीही एकसंध भारत म्हणून आपण केलेला प्रवास हा अभिमानास्पदच आहे. आपल्याबरोबरीने स्वतंत्र झालेल्या पाकिस्तानचे दोन तुकडे झाले, हे यानिमित्ताने विशेष करुन लक्षात घेतले पाहिजे. शंभरीच्या टप्प्यावर पोहोचताना ही एकात्मता, अखंडत्व टिकवून ठेवण्याचे आव्हान भारतापुढे असणार आहे. कारण जागतिक पातळीवर होत चाललेल्या बदलांचे पडसाद भारतातही पडताना दिसू लागले आहेत. आज देशात वाढत चाललेल्या प्रादेशिक अस्मितांमुळे भारताच्या संघराज्यात्मक व्यवस्थेपुढे आव्हान उभे केले आहे. पुढील २५ वर्षांमध्ये या प्रादेशिक अस्मिता मावळत जाऊन भारतीयत्वाची राष्ट्रीय भावना वाढीस लागली पाहिजे. कारण अशा अस्मितांचा गैरफायदा जागतिक पातळीवरील विविध शतींकडून घेतला जाण्याचा धोका असतो. त्यामुळे राष्ट्र म्हणून आपण एक आहोत, ही भावना सर्वांच्या मनात रुजली पाहिजे आणि ती आचरणातून-कृतीतून दिसली पाहिजे. ब्रिटिशांच्या १५० वर्षांच्या राजवटीत भारत गुलामगिरीत होता. परंतु तत्पूर्वी म्हणजे १७५० पूर्वी भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाची आर्थिक महासत्ता होता. परंतु परकीय आक्रमणांमुळे असेल किंवा जगभरात झालेल्या पहिल्या तीन औद्योगिक क्रांतींमध्ये मागे पडल्यामुळे असेल, भारत या स्थानापासून दूर गेला. याउलट १९८० च्या दशकामध्ये दहाव्या स्थानावर असणारा चीन हा आज जगातील दुसऱ्या क्रमांकाची आर्थिक महासत्ता म्हणून नावारुपाला आला आहे. भारत आणि चीन यांच्यात लोकसंख्या, नैसर्गिक संसाधने यांमध्ये फार मोठा फरक नाहीये. पण तरीही चीनने दहाव्या स्थानावरुन दुसऱ्या स्थानापर्यंत भरारी घेतली आणि भारत पाचव्या-सहाव्या स्थानासाठी झटतो आहे, ही बाब आपल्याला आत्मपरीक्षण करायला लावणारी आहे. आज भारताचा जीडीपी ३ ट्रिलियन डॉलर्स इतका आहे; तर अमेरिकेचा २३ ट्रिलियन डॉलर्स आणि चीनचा १७ ट्रिलियन डॉलर्स इतका आहे. या पार्श्वभूमीवर विचार करताना नेहमी एक चुकीची मांडणी केली जाते. ती म्हणजे भारताला आर्थिक महासत्ता बनण्यासाठी आपला जीडीपी साधारण २४ ट्रिलियन डॉलर्स इतका झाला पाहिजे. वास्तविक, ती चुकीची आहे. कारण अमेरिका आणि आपल्यामध्ये लोकसंख्येचा मुख्य फरक आहे. भारतीय लोकसंख्येचा विचार करता आणि अमेरिकन दरडोई उत्पन्नाचा विचार करता आर्थिक महासत्ता बनण्यासाठी आपला जीडीपी ८२ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. दरडोई उत्पन्नात वाढ झाल्याखेरीज आर्थिक महासत्ता बनण्याला अर्थ असणार नाही, हे लक्षात घेतले पाहिजे.

जगाची लोकसंख्या १८०० मध्ये १०० कोटी होती. ती आज साडे सात पटींनी वाढली आहे. भारताची लोकसंख्या आज १४० कोटी असली तरी १८० कोटींच्या आसपास पोहोचल्यानंतर तिचे स्थिरीकरण होईल. साधारण २०८० च्या दशकामध्ये हे घडू शकेल. याचाच अर्थ पुढील २५ वर्षांमध्ये देशाची लोकसंख्या आजच्या इतया वेगाने वाढतच जाणार आहे.

**महेश झगडे, माजी सनदी अधिकारी**

हे लक्षात घेता या नवीन लोकसंख्येसाठी आपल्याला रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्या लागणार आहेत. आज आपण चौथ्या औद्योगिक क्रांतीच्या उंबरठ्यावर उभे आहोत. यामध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स, इंटरनेट ऑफ थिंग्ज, अल्गोरिदम, थ्रीडी प्रिंटिंग, रोबोटिस अशा अनेक अत्याधुनिक गोष्टी घडणार आहेत. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या एका अंदाजानुसार, या औद्योगिक क्रांतीमुळे जगात आज असणाऱ्या नोकऱ्यांपैकी ६५ टके नोकऱ्या पुढील दोन दशकांमध्ये संपुष्टात येणार आहेत. ही समस्या भारतासारख्या आर्थिक महासत्ता बनू पाहणाऱ्या देशात अधिक प्रकर्षाने जाणवणार आहे. या पार्श्वभूमीवर भारताने आज धार्मिक आणि अन्य गोष्टी बाजूला सारून राष्ट्रीय अजेंडा म्हणून याबाबत विचार करण्याची वेळ आली आहे. पुढील काळात देश टिकवायचा असेल तर देशातील लोकांना स्वायत्त पद्धतीने उत्पन्नस्रोत निर्माण झाले पाहिजेत आणि त्यांच्यासाठी जगण्याचे साधन निर्माण झाले पाहिजे. अन्यथा मोठ्या प्रमाणावर संघर्ष उद्भवण्याचा धोका आहे. गेल्या ६० ते ७० वर्षांमध्ये अमेरिकेने त्यांचा जीडीपी अत्यंत सुबक पद्धतीने आणि सुनियोजितपणाने हाताळला आहे; पण भारताला ते जमलेले नाही. शेती, कारखानदारी आणि सेवाक्षेत्र हे जीडीपीतील तीन प्रमुख घटक मानले जातात. या तिन्हींवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण हे जीडीपीसापेक्ष असणे अपेक्षित आहे. उदाहरणच घ्यायचे झाल्यास अमेरिकेत शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या १ टका आहे आणि शेतीतून येणाऱ्या उत्पन्नाचा जीडीपीतील वाटाही १ टकाच आहे. तेथे १९४०, ५०, ६० च्या दशकामध्ये शेतीवर अवलंबून असणारा जो वर्ग होता त्याला औद्योगिकरणाकडे आणि सेवाक्षेत्राकडे वळवण्यात आले. याउलट भारताची स्थिती आहे. भारतात शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या ५० ते ६० टके इतकी आहे. त्यांना आपल्याला कारखानदारी अथवा सेवाक्षेत्राकडे वळवावे लागेल. अन्यथा शेतीतून मिळणारे सकल उत्पन्न ५० ते ६० टयांवर न्यावे लागेल. पण शेतीच्या उत्पादनाला असणाऱ्या मर्यादा लक्षात घेता हे शय होणार नाही. दुसरीकडे चौथ्या औद्योगिक क्रांतीमुळे कारखानदारी आणि सेवाक्षेत्रातील संधी कमी होत चालल्या आहेत. त्यामुळे शेतीवर अवलंबून असणारा वर्ग तिकडे वळवण्यालाही मर्यादा आहेत. म्हणूनच रोजगाराबाबतचे भारतापुढील आव्हान हे अत्यंत मोठे आणि चिंताजनक स्वरुपाचे आहे. राजकीय व्यवस्था, सामाजिक व्यवस्था, प्रशासन आणि अर्थतज्ज्ञ या सर्वांनी एकत्रित बसून याचा विचार करण्याची गरज आहे. दुर्दैवाने याबाबत आज मोठी उदासिनता दिसून येते. प्रत्यक्षात देशाच्या अजेंड्यावर हा विषय अग्रस्थानी असायला हवा.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेमुळे जगभरात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती झाली, विविध शोध लागण्यास मदत झाली, विविध संशोधने झाली आणि या सर्वांतून भांडवलशाहीने सुबत्ता आणत जगाला एक सोनेरी वळण दिले. भारतालाही याचे लाभ कमी-अधिक प्रमाणात झाले आहेत. विशेषतः, मोठ्या लोकसंख्येला आपण दारिद्र्यातून बाहेर काढण्यात यामुळे यशस्वी झालो आहोत. पण जागतिक अर्थव्यवस्था १९७० नंतर डबघाईला येऊ लागली आहे. याचे कारण भांडवलशाही सदृढ करण्याच्या नावाखाली आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक यांसारख्या जागतिक वित्तीय संस्था कमजोर करण्यात आल्या. त्यातून भांडवलशाहीचे लोकशाहीचे वर्चस्व वाढत गेले आणि आज भांडवलशाहीने लोकशाहीला गिळंकृत केले आहे का, असा प्रश्न विचारण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. कारण जगभरातील राजकीय नेतृत्त्व हे भांडवलशहांच्या प्रभावाखाली गेले आहेत. चीन, रशिया यांसारख्या एकाधिकारशाही असणाऱ्या देशांमध्येही भांडवलशाहीचेच वर्चस्व आहे. या वर्चस्वामुळे विकलांग होत चाललेल्या लोकशाहीत राजकीय नेतृत्वाला कणखर, कठोर निर्णय घेण्याला मर्यादा येत जातात. त्यांचे निर्णय हे भांडवलशाहीधार्जिणे होतात. चौथ्या औद्योगिक क्रांतीमध्ये भांडवलशाहीही अस्ताकडे चालली आहे. नवअर्थव्यवस्थेमध्ये टेनोस्युडॅलिझमचा उदय झाला आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील बहुराष्ट्रीय महाकाय कंपन्यांनी आज लोकनियुत सरकारांच्या स्वायत्तेवर प्राबल्य निर्माण केले आहे. हे लक्षात घेता अशा कंपन्यांना कोणत्याही परिस्थितीत रोजगार कमी होऊ देणार नाहीत यासाठी बाध्य करण्याची जबाबदारी राजकीय नेतृत्त्वाची असणार आहे. यासाठी लोकशाही सक्षम, सदृढ करणे गरजेचे आहे. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, स्थानिक पातळीवर निणर्याधिकार असणाऱ्या व्यती सक्षम असणे गरजेचे आहे. कोणाच्याही दबावाला बळी न पडता लोकहिताला सर्वोच्च प्राधान्य देणारे लोक यामध्ये आले पाहिजेत. गेल्या ४०-५० वर्षांमध्ये वर्ल्ड बँक, आयएमएफ, जागतिक आरोग्य संघटना, जागतिक व्यापार संघना, संयुत राष्ट्रसंघटना विकलांग होत चालल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पुढील २५ वर्षांमध्ये भारताने जागतिक पातळीवरसुद्धा नेतृत्त्व घेत अर्थव्यवस्थेची नवी घडी बसवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे भारताचे ऊर्जेवरील परावलंबित्व. आज देशांतर्गत एकूण कच्च्या तेलाच्या गरजेपैकी ८५ टके तेलासाठी आपल्याला अन्य देशांवर अवलंबून राहावे लागत आहे. ही एक प्रकारची गुलामगिरीच आहे. येत्या २५ वर्षांमध्ये ऊर्जाक्षेत्रातील हे परदेशी परावलंबित्व कमी कमी करत स्वावलंबी होणे गरजेचे आहे. पुढचा मुद्दा म्हणजे आज जगभरात ५७ ते ५८ टके लोक शहरांमध्ये राहताहेत. साधारण २०० वर्षांपूर्वी हे प्रमाण अवघे ३ टके होते. भारताचाच विचार केल्यास पुढील ३० वर्षांमध्ये आपली ६० ते ७० टके लोकसंख्या शहरांमध्ये येणार आहे. त्यावेळी देशाचे ७० ते ८० टके सकल उत्पादन शहरांमधून आलेले असेल. तसेच ७० ते ८० टके रोजगारही शहरांतच निर्माण करावा लागेल. ऊर्जा शहरांसाठी लागणार आहे. या पार्श्वभूमीवर आपल्या शहर विकासाचे नियोजन अत्यंत काटेकोरपणाने करावे लागेल आणि त्यासाठी दूरदर्शी विचार करुन एक समग्र आराखडा बनवावा लागेल. त्यातून शहरे ही रोजगाराची केंद्र बनली पाहिजेत. तसे न झाल्यास देशविघटनास तो एक ट्रिगर बनू शकतो.

**(शब्दांकन : हेमचंद्र फडके)** ■

## गुड मॉर्निंग
दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

**पंचांग**

**गुरुवार, दिनांक १५ ऑगस्ट २०२४**
श्रावण शु. १० , श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू नक्षत्र : ज्येष्ठा, योग :वैधृति , करण : वणिज स्वातंत्र्य दिन, बृहस्पती पूजन, पारशी नूतनवर्ष सन १३९४ प्रारंभ, पारशी फरवर्दिन मासारंभ सूर्योदय : स.०६.२२ सूर्यास्त : सायं.०७.०४ वा. राहू काळ : दुपारी : १:३० ते ३:००

**दिनविशेष**

*१७८९ : लटिल कार्पोरल व फ्रेंच राज्यक्रांतीचे अपत्य 'नेपोलियन बोनापार्ट' यांचा जन्मदिन. *१८७२ : योगी अरविंद घोष यांचा जन्मदिन. *१९८५ : आसामसाठी शांतता योजना. *१७६९ : फ्रान्समधील पराक्रमी वीरपुरुष नेपोलियन बोनापार्ट यांचा जन्म. *१८७२ : आधुनिक भारतातील प्रख्यात तत्त्वचिंतक, क्रांतिकारक, योगी व कवी अरविंद घोष यांचा जन्म. *१९९७ : शांतता काळातील अतुलनीय शौर्याबद्दलचा 'अशोकचक्र' हा सर्वोच्च सन्मान सेकंड लेफ्टनंट पुनीत दत्त यांना मरणोत्तर जाहीर. *१९१४ : पनामा कालव्यातून पहिले जहाज पार झाले. *१९४७ : मोहम्मद अली झीना पाकिस्तानच्या गव्हर्नर जनरलपदी.

**राशीभविष्य**

* मेष : संतती सौख्य, दिवस आनंदात जाईल.* वृषभ : रेंगाळलेली कामे होतील.* मिथुन : कष्टाचे चीज होईल.* कर्क : कौटुंबिक सौख्य लाभेल.*सिंह : बदली, बढतीचा योग.*कन्या : तरुणींना विवाहयोग*तुळ : सौख्यकारक खरेदीचे योग*वृश्चिक : संगीत, साहित्याचा आस्वाद घ्याल.* धनु : दूरच्या प्रवासाची संधी.* मकर : रेंगाळलेल्या कामांना गती.*कुंभ : जुनी येणी वसूल होतील.*मीन : स्थावर खरेदीचा योग.

**मेसेज आया**

आयुष्यातला सर्वांत मोठा अपराध
हाच असतो कि
आपल्यामुळे कुणाच्या तरी डोळ्यात अश्रू
असणे आणि आयुष्यातले सर्वांत मोठे
सार्थक हेच की, आपल्याकरिता
कुणाच्यातरी डोळ्यात अश्रू असणे.
अश्रू तेच असतात
पण फरक जमीन-आसमानचा असतो.




**म्हणी**

कामापुरता मामा, ताकापुरती आजी.
केवळ गरजेसाठी एखाद्याचा वापर करणे.
यालाच मिळतीजुळती दुसरी म्हण आहे,
'गरज सरो वैद्य मरो'. याचा अर्थ गरज संपल्यानंतर ती पूर्ण करणाऱ्याचे काहीही झाले तरी बेहत्तर अशी मानसिकता ठेवणे.

**व्यक्तीविशेष**

**महादेवभाई देसाई**

गांधीजींचे सच्चे अनुयायी असलेले महादेवभाई देसाई यांनी २५ वर्षे गांधीजींचे सचिव म्हणून काम केले. गुजरातमधील सुरत जिल्ह्यातील सारस या खेडेगावात त्यांचा १ जानेवारी १८९२ रोजी जन्म झाला. १९१७ मध्ये त्यांची गांधीजींशी भेट झाली आणि त्यांना आपला गुरु सापडला. महादेवभाईंनी लगेच नोकरी सोडली आणि ते गांधीजींबरोबर सत्याग्रहात सामील झाले. गांधीजींबरोबर त्यानंतर ते सतत सावलीसारखे वावरले. चंपारण्य सत्याग्रह (१९१७), बार्डोलीचा सत्याग्रह (१९३०) यांत त्यांनी सक्रीय सहभाग घेतला. आणि तुरुंगवासही भोगला त्यांचे भाषेवरील प्रभुत्व पाहून गांधीजींनी त्यांच्यावर नवजीवन या वृत्तपत्राच्या संपादनाची जबाबदारी सोपवली. ब्रिटीश राजवटीविरोधात त्यांनी लिहिलेले अग्रलेख अतिशय अभ्यासपूर्ण आणि प्रखर टीका करणारे असत. १९२४ ते १९२८ या काळात त्यांनी गांधीजींबरोबर संपूर्ण देशाचा दौरा केला. १९३१ मध्ये गांधीजी गोलमेज परिषदेसाठी इंग्लंडला गेले तेव्हा महादेवभाई त्यांच्याबरोबर होते. १९४२च्या भारत छोडो आंदोलनातही त्यांचा

**बोधकथा**

**अपशब्द कधीही वापरू नका**

पंडित मदनमोहन मालवीय महान तत्वज्ञानी होते. बनारस हिंदू युनिव्हर्सिटी हा त्यांचा ध्यास होता. मालवीय यांच्या परिचयाचे अंनेक लोक निरनिराळ्या क्षेत्रात होते. त्यांच्याशी मालवीयजींचे चांगले संबंध होते. एकदा त्यांच्याकडे रमापती मिश्र नावाचे एक विद्वान गृहस्थ आले होते. मदनमोहन मालवीय व रमापती मिश्र यांच्यात निरनिराळ्या विषयांवर बरीच चर्चा झाली. ती खूप रंगली एकातून एक विषय निघाले आणि अशाच एका विषयावर चर्चा सुरू झाली. चर्चेचा विषय होता 'क्रोध'! म्हणजे राग! राग कसा येतो, रागाचे प्रकारन, रागाला आवर कसा घालावा, रागाचे परिणाम, राग जिंकावा कसा... अशी चर्चा होती. दोघेही तत्तवज्ञानी असल्याने चर्चा अधिकच रंगत चालली होती.रमापती मिश्र स्वत:अत्यंत सौम्य स्वभावाचे होते. ते म्हणाले, 'मला कधीच राग येत नाही. 'फारच चांगली गोष्ट आहे.' मालवीय म्हणाले. 'होय कितीही मनाविरूध्द गोष्ट घडली तरीही मी रागावत नाही. 'आपण रागाला जिंकलेलं दिसतंय! 'होय, जिंकलं तर आहेच, पण मनाचं संतुलन मी कधीच बिघडू देत नाही. 'छान! पण हे लोकांना कसे कळेल? ' कळेल ना ! त्यासाठी मी एक उपाय सांगतो. 'सांगा. तुम्ही माझ्याविषयी एकापाठोपाठ अपशब्द बोला. शंभर शिव्या द्या. मी मुळीच रागावणार नाही. 'अरे वा! आपले रागावर चांगलेच नियंत्रण दिसते! 'मग करा सुरू मी ऐकतो. 'नाही! माझ्याच्याने ते होणार नाही. 'का बरे? 'तुम्ही अपशब्द ऐकायला तयार असलात तरी मी ते उच्चारायला तयार नाही. अपशब्द बोलून माझ्या जिभेला वाईट काम करायला का लावू ?' रमापती मित्र अत्यंत आदराने मालवीयजींकडे पाहू लागले. **तात्पर्य: दुसऱ्याची परीक्षा घेण्यासाठीसुध्दा अपशब्द उच्चारू नयेत.**

**भूगोल**

**अरबी समुद्र**

भारताच्या पश्चिमेला असणाऱ्या समुद्राला अरबी समुद्र असे म्हणतात. या समुद्राच्या पूर्वेस भारत, उत्तरेस पाकिस्तान आणि इराण तर पश्चिमेस अरबी द्विपकल्प आहेत. सोमालियातील केप ग्वाडाफुईपासून कन्याकुमारीमधील काल्पनिक रेषा या समुद्राची दक्षिण सीमा मानली जाते. हा समुद्र अक्षवृत्त ८ ते २५ व रेखावृत्त ५० ते ७५ पूर्व यामध्ये विस्तारलेला आढळतो. कच्छचे आखात, ओमानचे आखात, इराणचे आखात, तांबडा समुद्र हे अरबी समुद्राचेच फाटे होत. ओमान आणि इराणची आखाते हॉर्मझच्या सामुद्रधुनीने जोडलेले आहेत. अरबी समुद्राची सरासरी खोली २९०० किलोमीटर याचा विस्तार सुमारे ३८५९ चौरस किलोमीटर इतका आहे. इतकी असून समुद्राच्या मध्यभागी बेटे नाहीत.

# बलसागर भारत होवो

*बलसागर भारत होवो।*
*विश्वात शोभुनी राहो ।।ध्रु।।*

साने गुरुजींची ही काव्य रचना सदैव प्रेरणा देणारी आहे. आज विश्वात भारताला महत्वपूर्ण स्थान आहे. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यप्राप्ती नंतर अनेक राष्ट्रपुरुषांनी भारत महान होण्याची स्वप्न बाळगली व साकारही केली. आज भारत वेगवेगळ्या स्तरावर आपली कामगीरी करत आहे. नुकत्याच पार पडलेल्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताने एकूण ६ पदके जिंकली आहेत. यामध्ये ५ कांस्य आणि एका रौप्यपदकांचा समावेश आहे. अशा खेळाडूंचा भारतवासीयाना अभिमान आहे. भारतातील प्रत्येक नागरिकांचे देशाच्या जडण घडणीत योगदान असले पाहिजे. तरच बलसागर भारताचे स्वप्न पूर्ण होईल.

आज देशात ७८ वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहाने साजरा होत आहे. देश स्वातंत्र्य झाला तेंव्हा देशाची असलेली परिस्थिती आणि आजची परिस्थिती मोठा बदल झालेला दिसून येतो. या स्वातंत्र्यासाठी अनेकांनी बलिदान दिले. त्यांच्या बलिदानाची यशोगाथा ही स्वातंत्र्यदिनी गायली जाते. त्यांचे बलिदान येणाऱ्या पिढीला एक नवी प्रेरणा देत असते. देशाने स्वातंत्र्यप्राप्ती नंतर कृषी, विज्ञान, संशोधन, तंत्रज्ञान, संगणक, औद्योगिक विकास, आरोग्य, साहित्य, कला, क्रिडा अनेक क्षेत्रात प्रगती केली. म्हणूनच आज देशात आपण सुखाने नांदत आहोत. याचा विसर पडता कामा नये. भारत देशा बरोबर पाकिस्तान ही स्वातंत्र्य झाला पण आज पाकिस्तानची अवस्था दयनीय आहे. भारत काही पाऊले पुढे आहे. याचे कारण देशात असलेली लोकशाही, या लोकशाहीत जात, पंथ व धर्म यांना संविधानाने एकसंघ ठेवले आहे. संविधानाने सर्वाना एका चौकटीत मांडले. देशात लोकशाही मजबूत असल्याने अराजकतेला थारा नाही. विविधतेत एकता टिकवण्याचा भारताने प्रयत्न केला आहे.

देश वेगवेगळ्या पथावर आपली प्रगती साधत असताना अनेकजण देशविरोधी फुत्कार टाकत आहे. देशात अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली देशविरोधी बोलले जाते. अनेकजण स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिन सुट्टी म्हणून साजरा करतात. खिशाला आणि गाडीला राष्ट्रीय ध्वज लावून फिरतात दुसऱ्या दिवशी कुठे ही पडलेली दिसतात. हर घर तिरंगा म्हणत घरांवर व कार्यालयांवर तिरंगा फडकवला जाताना ध्वज संहिता नुसार अनेक ध्वज योग्य आहे की नाही हे पाहणे महत्वाचे आहे. योग्य वेळी खाली उतरवणे महत्वाचे आहे. कोणत्याही प्रकारे अवमान होता कामा नये. मनात राष्ट्रीय ध्वजा विषयी प्रेम पाहिजे, अवमान होता कामा नये. स्वातंत्र्यदिनाला क्रांतिकारकांचे स्मरण व प्रजासत्ताक दिनाला आम्हाला लोकशाहीचे व संविधानाचे मुल्य जोपासण्याचे काम केले पाहीजे. देशात अनेक राष्ट्रीय प्रश्न आ वासून उभे आहेत. पाणी प्रश्न, रोजगार, दुष्काळ, वनीकरण, अश्या अनेक गोष्टींवर काम करण्या सारखे आहे. असे निस्वार्थी काम करणाऱ्यांच्या जीवावर हा देश तरला आहे. आजच्या पिढीने स्वातंत्र्याचा संघर्षाचा लवलेश अनुभवला नाही. ज्या राष्ट्रपुरुषांना जगात मोठ्या सन्मान केला जातो त्यांचा अवमान करताना थोडासा सुद्धा विचार केल जात नाही. अश्या वागण्याला भावी पिढी दोष दिल्या शिवार राहणार नाही. नव्या पिढी पुढे उज्वल भविष्याचे चित्र ठेवण्या ऐवज स्वैराचाराने जागा घेतली तर भारत युगाचे स्वप्न अधुरे राहील यात तीळमात्र शंका नाही!

१९६३ साली भारताचे पहिले रॉकेट प्रक्षेपण केरळ येथील तिरुअनंतपुरमजवळील थुंबा येथून १९६९ भारतीय अंतराळ संशोधन संस्था , १९७० साली श्वेत क्रांती, १९७४ मध्ये राजस्थानमधील पोखरणच्या पहिल्या अणुचाचणीचा प्रयोग यशस्वी झाला व भारताने जगाच्या पटलावर परमाणू क्षमतेने संपन्न असलेल्या सर्वश्रेष्ठ पाच देशांमध्ये आपले स्थान निर्माण केले १९८२ रंगीत दूरदर्शन प्रवास सुरु झाला. १९८८ साली सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडियाची स्थापना झाली, पुढे १९८९ साली अग्री क्षेपणास्त्राचे यशस्वी प्रक्षेपण पार पडले. १९९१ पासून भारताचे आर्थिक उदारीकरण सुरु झाले. १९९१ साली भारताला स्वदेशी बनावटीचा महासंगणक मिळाला. १९९५ दिल्लीत मेट्रो रेल सुरु झाली. १९९८ साली भारताने पोखरण चाचणी केली, २००८ साली चांद्रयान - १ ल्योंच केले. २०१० शिक्षण मुलांचा मुलभूत अधिकार झाला. २०१५ साली नीती आयोगाची स्थापना,२०१७ वस्तू आणि सेवा कर लागू केले. २०२० कोरोना महामारीत अमुल्य योगदान दिले. चांद्रयान ३ हे अवकाशयान २३ ऑगस्ट २०२३ रोजी यशस्वीरित्या चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरवलं. एक नव्हे अनेक यशस्वी योजना कार्यन्वित करून भारताने जगाला ओळख दिली या अशा अनेक योजना होत असताना भारताने चीन व पाकिस्तान बरोबर युद्धे केली. परंतु देशात अश्या काही घटना आहेत. त्य भारताची मान खाली खालत आहेत. वाढता भ्रष्टाचार, दंगे, महगाई रोजगार बरोबर अनेक परीक्षांचे फुटणारे पेपर यामुळे देशात वेगवेगळ्या आघाड्यांवर पुन्हा स्वातंत्र मिळवणे अवश्य आहे.

१५० वर्षाची जुलमी सत्ता संपून जाता जाता ब्रिटिशांनी अखंड हिंदुस्थानचे दोन तुकडे करून ठेवले. पैकी एक भारत तर दुसरा पाकिस्थान १५ ऑगस्ट १९४७ पासून आज पर्यंत पाकिस्थानचा उपद्रव थांबता थांबत नाही. सातत्याने सीमेवर हरकती चालू आहेत ७० वर्षाच्या कालखंडात सिमेवर लाख जवानांचे व नागरिकांचे बलिदान गेले. अश्या नापाक पाकिस्थान व चिन बाबत अनेक महाभाग त्यांची री घेऊन ओढत असतात सतत देश विरोधी बोलण्याचे धाडस करत असतात.अश्या राष्ट्राप्रती संकोच बाळगणाऱ्या विद्रोहींवर कडक शासन बसवले पाहिजे. राष्ट्र भावना सतत जागृत राहणे हे सजग नागरिकाचे लक्षण आहे. स्वातंत्र्य आपसूक मिळाले नाही ते असिम त्याग, बलिदान देऊन मिळवले आहे. याचा विसर पडून अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली स्वैराचार पद्धतीने वागणे, बोलणे, लिहिणे यांचा प्रवास अखंडपणे चालू आहे.

**- विठ्ठल वळसे पाटील**

'राष्ट्र संचार' हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

# चक्क तरंगणारे पोस्ट ऑफिस

आपल्या देशात काही 'हट के' ठिकाणी आहेत. जगातील सर्वाधिक उंचीवरील पोस्ट ऑफिस आपल्याच देशात आहे, हे तुम्हाला ठाऊक आहे का? हिमाचल प्रदेशातील हिक्कीम या ४,४०० मीटर उंचीवरील पोस्ट ऑफिसचा हा लौकिक आहे. आपल्याच देशात एक 'तरंगते पोस्ट ऑफिस'ही आहे. जम्मू-काश्मीरमध्ये श्रीनगरच्या दल सरोवरामध्ये असलेल्या पोस्ट ऑफिसबद्दल आम्ही तुम्हाला सांगत आहोत. हे जगातील एकमेव तरंगते पोस्ट ऑफिस आहे.




हे २०० वर्षे जुने पोस्ट ऑफिस ब्रिटिश राजवटीत बांधले गेले होते. एका हाऊस बोटमध्ये असलेल्या या पोस्ट ऑफिसमध्ये एक संग्रहालयदेखील आहे. जेथे प्राचीन टपाल तिकिटे संग्रहित करण्यात आली आहेत. दल सरोवराला भेट देणाऱ्या बहुतेक लोकांना हे पोस्ट ऑफिस नक्कीच बघायला आवडते. हजारो पर्यटक येथे येतात आणि सेल्फी घेतात. हे पोस्ट ऑफिस २०११ पर्यंत नेहरू पार्क पोस्ट ऑफिस म्हणून ओळखले जात होते; परंतु नंतर भारताच्या माजी पोस्टमास्टर जनरलने त्याचे नाव बदलून फ्लोटिंग पोस्ट ऑफिस केले. जगातील कोठूनही लोक येथे येतात, त्यांचे प्राधान्य हे आहे की, ते प्रथम फ्लोटिंग पोस्ट ऑफिसमध्ये जातील, तेथून कार्ड घेतील आणि त्यावर कॅन्सलेशन स्टॅम्प लावतील. विशेष म्हणजे, येथील टपाल तिकिटांमध्ये दल सरोवराची प्रतिमा पाहायला मिळते.

एवढेच नाही, तर या पोस्ट ऑफिसमध्ये जगभरातील मेल आणि टेलिफोनची सुविधाही उपलब्ध आहे. जगातील सर्वात मोठे पोस्टल नेटवर्क भारतात आहे. येथे सुमारे १ लाख ५५ हजार पोस्ट ऑफिस आणि ५ लाखांहून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत. भारतीय पोस्टल नेटवर्कची इतर काही वैशिष्ट्ये आहेत, जसे की तरंगते पोस्ट ऑफिस आणि जगातील सर्वात उंच पोस्ट ऑफिस.

# सुवर्णनाण्यांचे भांडार



तुर्कीमध्ये पुरातत्त्व संशोधकांना प्राचीन ग्रीक नाण्यांनी भरलेले एक भांडे सापडले आहे. ही सर्व नाणी सोन्याची आहेत, हे विशेष. पश्चिम तुर्कीमधील नोशन नावाच्या प्राचीन ग्रीक शहरात एका घराखाली खोली सापडली होती. याच खोलीमध्ये हा सोन्याच्या नाण्यांचा खजिना सापडला आहे. ही नाणी ग्रीक असली, तरी त्यांच्यावर पर्शियन साम्राज्याचा छाप आहे. नोशनपासून ९७ किलोमीटरवर असलेल्या सार्डिस या ठिकाणच्या टांकसाळीत ही नाणी पाडलेली असावीत, असे संशोधकांना वाटते. अमेरिकेतील मिशिगन युनिव्हर्सिटीतील ख्रिस्तोफर रॅट्टे यांनी याबाबतची माहिती दिली. एखाद्या मर्यादित पुरातत्त्वीय उत्खननात इतका मौल्यवान शोध लागणे ही एक दुर्मीळ बाब असल्याचे त्यांनी सांगितले. त्या काळातील कुणी तरी सुरक्षेचा विचार करून ही सोन्याची नाणी पुरून ठेवलेली असावीत. काही पुराव्यांचा विचार करता ही नाणी इसवी सन पूर्व पाचव्या शतकात बनवलेली असावीत. गेल्या काही वर्षांच्या काळात या ठिकाणी प्राचीन काळातील अनेक वस्तूंचा शोध लागला आहे. त्यामध्ये मातीच्या भांड्यांचा तसेच शस्त्रांचा समावेश आहे. या वस्तू अलेक्झांडर द ग्रेट याच्यानंतरच्या 'हेलेनिस्टिक' काळातील आहेत.

# अबब! चार फुटांचा फणस

मध्य प्रदेशातील कटनी जिल्ह्यातील एक फणस पाहून लोक थक्क झाले. या फणसाचा आकार इतका मोठा होता की, त्याला कुणी खरेदीदारही मिळेना. अखेर या शेतकऱ्याने हा भला मोठा फणस केवळ दोनशे रुपयांना विकून तो घरी निघून गेला. हा फणस तब्बल चार फूट लांबीचा आणि ४५ किलो वजनाचा होता!

कटनी जिल्ह्यातील बरही बसस्टँडवर हा शेतकरी फणसाने भरलेली अनेक पोती घेऊन उतरला. मात्र, लोकांची नजर या चार फूट लांबीच्या फणसावर खिळून राहिली. हा फणस गाडीतून खाली उतरून घेण्यासाठी तीन-चार जण लागले!



कसेतरी हा फणस घेऊन शेतकरी बाजारपेठेत पोहोचला. त्याचे अधिक वजन आणि आकार पाहून लोक आश्चर्य करीत; पण हा फणस खरेदी करण्याचे धाडस मात्र करीत नव्हते. अनेक तास असेच गेल्यावर शेवटी या वृद्ध शेतकऱ्याला नाइलाजाने हा फणस केवळ दोनशे रुपयांमध्ये विकावा लागला. असे सांगितले जाते की, हा शेतकरी शहडोल जिल्हातील छतैनी गावचा होता. एका स्थानिक दुकानदार महिलेने हा फणस खरेदी केला. हा शेतकरी दरवर्षी मोठ्या आकाराचे फणस घेऊन येतो, असे तिने सांगितले.

# दीडशे कोटींचे बूट

जगभरात अनेक महागडे शूज आहेत; परंतु एखाद्या शूज जोडीची किंमत शंभर कोटींपेक्षा जास्त असू शकते, याची कोणीच कल्पना केली नसेल. तर मग जगातील सर्वात महागड्या शूजबद्दल जाणून घेऊयात.

जगातील सर्वात महागड्या शूजचे नाव 'मून स्टार शूज' आहे. इटालियन शूज डिझायनर अँटोनियो व्हिएत्री यांनी हे शूज डिझाईन केले. दरम्यान, २०१९ मध्ये दुबई येथे आयोजित एनआयडीई फॅशन वीक दरम्यान हे आश्चर्यकारक शूजचे प्रदर्शन करण्यात आले. या शूजची किंमत १९.९ मिलियन डॉलर म्हणजेच सुमारे १६४ कोटी रुपये आहे. हे ऐकून अनेकांना विश्वास बसणार नाही. अनेक करोडपतींची संपत्तीही या शूजच्या किमतीइतकी नाही.



मून स्टार शूजची टाच सोन्याने बनवलेल्या आहेत. तसेच हे शूज ३० कॅरेट सोन्याने सजवण्यात आले आहे. यासोबतच या शूजमध्ये एक विलक्षण आणि दुर्मीळ वस्तूदेखील समाविष्ट करण्यात आली आहे. या शूजवर सोने, हिरे इत्यादी जडवलेले आहेत; पण अर्जेंटिनाच्या उल्केचा तुकडाही त्यात जडलेला आहे. ही उल्का १५७६ साली आहे. यामुळेच हे शूज मौल्यवान असून, ऐतिहासिक आहे. 'मून स्टार शूज' डिझाईन करणारे अँटोनियो व्हिएत्री यांनी यापूर्वी असे शूज बनवले आहेत. अँटोनियो व्हिएत्रीने २०१७ मध्ये जगातील पहिला २४ कॅरेट सोन्याचा शूज डिझाइन केला. त्यानंतर जगभरात त्याची चर्चा झाली. अँटोनियो व्हिएत्री लक्झरी आणि महागड्या फॅन्सी वस्तू बनवण्यासाठी प्रसिद्ध आहे.



# गुरूच्या डागामध्ये अनोखी रचना

खगोलशास्त्रज्ञांनी नासाच्या जेम्स वेब स्पेस टेलिस्कोपचा वापर करून गुरु ग्रहावरील प्रसिद्ध ग्रेट रेड स्पॉटमध्ये अनोखी रचना व हालचाली पाहिल्या आहेत, ज्या यापूर्वी निदर्शनास आल्या नव्हत्या. गुरुवरील हा तांबडा ठिपका म्हणजे तिथे दीर्घकाळापासून सुरू असलेले मोठे वादळ आहे. या तांबड्या ठिपक्याचे वेळोवेळी निरीक्षण केले जात असते. आता जी अनोखी रचना आढळली आहे, ती शक्तिशाली वातावरणीय गुरुत्वाकर्षण लहरींचा परिणाम असल्याचे सांगितले जाते. ग्रेट रेड स्पॉट हे सौरमंडळातील सर्वात मोठे वादळ आहे. या वादळाची व्याप्तीच इतकी मोठी आहे की, त्याने पृथ्वीच्या दुप्पट आकाराची जागा घेतली आहे. गेल्या तीनशे वर्षांपासून हे वादळ गुरुवर सुरु आहे. तेथील वाऱ्याचा वेग ताशी ४३० ते ६८० किलोमीटर इतका प्रचंड आहे. पृथ्वीवरील वादळांच्या तिप्पट असा हा वेग आहे. या वादळाच्या वरील भागात असलेल्या वातावरणाबाबत संशोधकांना फारसे कुतूहल वाटत नव्हते. मात्र, आता जेम्स वेब स्पेस टेलिस्कोपच्या निअर इन्फ्रारेड स्पेक्ट्रोग्राफ या उपकरणाने याबाबतची नवी माहिती समोर आणली आहे.

लिसेस्टर युनिव्हर्सिटीतील टीम लीडर हेनरीक मेलिन यांनी सांगितले की, आम्हाला आधी वाटत होते की, हा भाग कंटाळवाणा आहे आणि तिथे विशेष असे काही घडत नाही. मात्र, हे चुकीचे असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. उलट हा भाग नॉर्दन लाईट्सइतकाच रंजक आहे. ग्रहमालिकेतील हा सर्वात मोठा ग्रह आपल्याला वेळोवेळी आश्चर्याचे धक्के देत असतो. जेम्स वेब स्पेस टेलिस्कोपने याठिकाणी काळ्या कमानी व चमकदार ठिपके दाखवले आहेत. गुरुत्वाकर्षण लहरींमुळे या रचना निर्माण झालेल्या आहेत.

# पावसाळ्यात फिट राहण्यासाठी...



'नेमेचि येतो मग पावसाळा' तसे पावसाळ्याबरोबरच अनेक प्रकारचे आजारही येत असतात. पावसाळ्यात रोगप्रतिकारक शक्ती मंदावत असते. सूर्यप्रकाश कमी असल्याने व एकंदरीतच ओलसर वातावरणामुळे संसर्गजन्य रोगांचा जोर वाढलेला असतो. त्यामुळेच पावसाळ्यात जर मजबूत प्रतिकारक शक्ती हवी, तर जेवणाच्या ताटात काही गोष्टी आवश्यक आहेत. रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी तुमच्या आहारात आणि दिनचर्येत आवश्यक बदल करणे गरजेचे आहे, असे तज्ज्ञ सांगतात. त्याची ही माहिती...

**पोषक मसाले :** हळद, लवंग, काळी मिरी, दालचिनी इत्यादी भारतीय मसाले हे रोगप्रतिकारशक्ती वाढवणारे मसाले आहेत. हे तुमचे शरीर शुद्ध करतात आणि तुमच्या शरीराची संरक्षण यंत्रणा वाढवतात. हळदीमध्ये आढळणाऱ्या कर्क्युमिनचा शरीरावर अँटिइंफ्लेमेटरी आणि अँटिऑक्सिडंट प्रभाव असतो. कर्क्युमिनला रोगप्रतिकारक शक्ती वाढवणारे मानले जाते आणि ते अँटिव्हायरल म्हणूनदेखील कार्य करते.


**दुग्धजन्य पदार्थ :** आपल्या आहारात दुग्धजन्य पदार्थांचा समावेश करणे आवश्यक आहे. दही, दूध, चीज यांसारख्या दुग्धजन्य पदार्थांमध्ये भरपूर जीवनसत्त्वे आणि प्रथिने असतात, ज्यामुळे तुमची प्रतिकारक शक्ती वाढते. दही हे प्रोबायोटिक्सचा एक चांगला स्रोत मानला जातो, जे आतड्यांमध्ये असलेल्या चांगल्या बॅक्टेरियांना योग्य पचन राखण्यासाठी प्रोत्साहन देतात. सर्व लोकांनी याचे नियमित सेवन करावे.

**आंबट फळे :** जवळजवळ सर्व लिंबूवर्गीय फळांमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते. संत्रे, लिंबू, अननस यांसारख्या फळांचे सेवन शरीराला हे आवश्यक जीवनसत्त्व सहज पुरवण्यासाठी आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी आणि गंभीर आजारांपासून संरक्षण करण्यासाठी उपयुक्त ठरू शकते. व्हिटॅमिन सी हे रोगप्रतिकारक शक्तीसाठी सर्वात आवश्यक आणि फायदेशीर मानले जाते. हे पांढऱ्या रक्तपेशींचे उत्पादन वाढवण्यास उपयुक्त आहे, जे तुम्हाला संक्रमणाशी लढण्यास मदत करते.

**हिरव्या पालेभाज्या :** पालक आणि ब्रोकोलीसारख्या भाज्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानल्या जातात. या भाज्यांमध्ये अँटिऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे (व्हिटॅमिन ए, सी, ई), खनिजे आणि फायबर भरपूर असतात. हे पोषक घटक आपल्या रोगप्रतिकारक शक्तीची संसर्गाशी लढण्याची क्षमता वाढवतात. शरीराला आवश्यक असलेली बहुतांश पोषकतत्त्वे हिरव्या भाज्या खाल्ल्याने सहज मिळू शकतात. संशोधनात असे आढळून आले आहे की, जे लोक जास्त हिरव्या भाज्या खातात त्यांना आजारी पडण्याचा धोका कमी असतो.

# किंचाळणाऱ्या ममीचे गूढ उलगडले!

इजिप्तच्या लक्सर येथे १९३५ मध्ये पुरातत्त्व संशोधकांना एका प्राचीन महिलेच्या ममीचा शोध लागला होता. तिचे तोंड उघडे होते आणि असे वाटत होते की, जणू काही ती किंचाळत आहे. या रहस्यमय ममीने सुमारे शतकभराच्या काळात संशोधकांचे कुतूहल वाढवलेले होते. आता संशोधकांनी या ममीचे रहस्य उलगडण्यात यश मिळवले आहे. अद्ययावत सीटी स्कॅन, इन्फ्रारेड इमेजिंग आणि अन्य आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून या ममीवर नव्याने संशोधन करण्यात आले. त्याचे निष्कर्ष फ्रंटियर्स इन मेडिसीन या नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आले. त्यानुसार या महिलेचे मृत्यूवेळी वय ४८ वर्षे होते. ३५०० वर्षांपूर्वी या महिलेचा मृत्यू झाला. मात्र, अद्यापही तिचा देह असामान्यरीत्या सुस्थितीत आहे. कैरो विद्यापीठातील कासर अल ऐनी हॉस्पिटलमधील रेडिओलॉजीचे प्राध्यापक आणि या संशोधनाचे प्रमुख सहर सलीम यांनी सांगितले की, लोबान आणि जुनिपर राळ अशा महागड्या पदार्थांच्या साहाय्याने या महिलेच्या शरीरावर लेप दिला होता व तिच्या मृतदेहाची ममी बनवण्यात आली होती. कदाचित हे पदार्थ त्या काळी अतिशय दूरवरून आणण्यात आले असावेत. त्यावरून असे दिसते की, ही महिला संपन्न घराण्यातील होती. तिच्या शरीरावर कोणताही छेद आढळला नाही. समकालीन पद्धतीच्या विपरीत तिच्या शरीराच्या अंतर्गत भागातील अवयव हटवण्यात आले नव्हते. तिच्या शरीरात अद्यापही मेंदू, हृदय, फुफ्फुस, यकृत, प्लीहा, किडनी, आतडी आहे. ही महिला मणक्याच्या संधिवाताने त्रस्त होती. तिच्या तोंडातील अनेक दातही गायब आहेत. कदाचित तिच्या मृत्यूपूर्वीच काही दात पडले होते. काही प्राचीन ममी असे उघडलेले तोंड असलेल्या आहेत. त्यामुळे या ममीबाबत ही एक विशेष गोष्ट आहे, असे म्हणता येत नाही.



# मासेमारीसाठी पाळतात पाणमांजरे

बांगला देशमधील दक्षिणी भागात कित्येक शतकांपासून अगदी अनोख्या पद्धतीने मासेमारीची परंपरा जपली गेली आहे. येथील मच्छीमार मासे पकडण्यासाठी चक्क पाणमांजरे अगदी पाळीव प्राण्याप्रमाणे पाळतात आणि त्यांच्याकडून मासेमारी करवून घेतात.

हे मच्छीमार मागील कित्येक कालावधीपासून ही अजब परंपरा जपत आले आहेत. ते पाणमांजरे पाळीव प्राण्याप्रमाणे पाळायचे, त्यावेळी आता मनुष्याच्या मदतीला उपयोगाला येतील, असे एकही कारण दिसत नसल्याने यामागील उद्देश काय, असा प्रश्न उपस्थित होणे साहजिक. मात्र, त्यांचा ज्या पद्धतीने वापर केला जातो, ते थक्क करणारे आहे. या पाळीव पाणमांजरांना मासेमारीच्या वेळी नदी, तलावाच्या ठिकाणी घेऊन गेले जाते. तेथे त्यांना दोरखंडाने बांधून पाण्यात उतरवतात. पाणमांजरांचे पोहणे अफलातून असते. त्यामुळे, ते आरामात पाण्यात उतरतात, मासे पकडतात आणि छोट्या बोटीकडे परततात. यानंतर मच्छीमार माशाची शिकार करून आलेल्या या पाळीव पाणमांजरांना बोटीत घेतात. इन्स्टाग्रामवर काही वर्षांपूर्वी आणखी एक व्हिडीओ व्हायरल झाला होता. मात्र, त्यात मासे पकडण्याची थोडी वेगळी पद्धत दर्शवली गेली होती. त्यामध्ये पाणमांजरांना दोरी बांधून पाण्यात उतरवले जाते; पण ती पाणमांजरे स्वतः मासे न पकडता त्या माशांना आपल्या मच्छीमारांच्या जाळीच्या दिशेने जाणे भाग पडतात आणि अशारीतीने ते मासे जाळ्यात अडकतात. बांगला देशमध्ये ही दुसरी परंपरा अगदी काही गावांपुरती सीमित राहिलेली आहे.



# फ्लोअरींग बदललं, नशीब पालटलं!

एखाद्या ठिकाणी खजिना सापडला किंवा छुपी खोली सापडली, त्यात मौल्यवान वस्तू सापडली असे अनेकदा होते. मात्र, घरातील केवळ एकाच फरशीने एखाद्याला लखपती बनवल्याची घटना क्वचितच निदर्शनास आली आहे. यावर विश्वास बसणारही नाही; पण ही वस्तुस्थिती आहे.

इंग्लंडमधील हा किस्सा असून, एका जोडगोळीचे आयुष्य एका फरशीने बदलले आहे. या दाम्पत्याचे आयुष्य फरशीने बदलले. त्यांनी घराचे नूतनीकरण करण्याचा निर्णय घेतला, त्यावेळी त्यांना हे सरप्राईज मिळाले. या संपूर्ण घटनेची माहिती दोघांनी स्वतः दिली आहे. ३७ वर्षांचे जोश व त्याची ३८ वर्षांची पत्नी एमिली ब्रूक्स हे दाम्पत्य लंडनमधील वॉल्थमस्टो इथे राहते. त्यांनी आपल्या घराचे नूतनीकरण करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी घराचं फ्लोअरिंग बदलायचं ठरवलं, तेव्हा त्यांना कळले की, कार्पेटच्या खाली हिऱ्याच्या लाकडाचे (डायमंड वुड फ्लोअरिंग) होते. ते खूप चांगल्या स्थितीत होते. हे पाहून त्यांचा आनंद गगनात मावत नव्हता.



या डायमंड वूड फ्लोअरिंगबद्दल कळल्यानंतर फ्लोअरिंग एक्स्पर्टला बोलावण्यात आले. ही मौल्यवान लाकडी फरशी पाहून एक्स्पर्टलाही आश्चर्याचा धक्का बसला. त्याने सांगितले की, या लाकडाची किंमत २६ लाखांपेक्षा जास्त आहे. दोघांनी त्यांचा व्हिडीओ टिकटॉक या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर शेअर केला आहे. भारतात टिकटॉकवर बंदी असल्याने हा व्हिडीओ पाहता येणार नाही. कॅमेरा ऑपरेट करणारे जोश म्हणाले, 'जेव्हा आम्ही आत आलो तेव्हा आम्हाला एक छोटा कोपरा दिसला; पण जेव्हा आम्हाला कळले की, ते खूप चांगल्या स्थितीत असलेले डायमंड वुड फ्लोअरिंग आहे, तेव्हा आम्हाला आश्चर्याचा धक्का बसला. आम्ही एका एक्स्पर्टला कॉल केला आणि त्याने सांगितले की, हे त्याने आजपर्यंत पाहिलेले सर्वोत्तम ओक लाकूड असून, ते अजूनही खूप चांगल्या स्थितीत आहे.'

## सुमारे ५०० कुटुंबीयांना मिळणार दिलासा

# शिवशंभो कॉलनीतील रस्त्याचा प्रश्न अखेर मार्गी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील प्रभाग क्रमांक २ मधील विनायकनगर येथील शिवशंभो कॉलनीच्या नागरिकांना गेल्या १० वर्षांपासून रस्ता उपलब्ध झाला नाही. खासगी जागा मालकांनी याकामी आता सकारात्मक पुढाकार घेतल्यामुळे सदर रस्त्याचे काम मार्गी लागले आहे.

भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने खासगी जागामालक यांच्यासोबत कृषी उत्पन्न बाजार समिती प्रशासनाशी सामोपचाराने चर्चा केली. बाजार समितीने परवानगी दिली. त्यामुळे १८ मीटर रस्त्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे या भागातील सुमारे ५०० कुटुंबीयांना दिलासा मिळाला आहे.

विशेष म्हणजे, आमदार महेश लांडगे यांच्या उपस्थितीमध्ये रस्त्याचे भूमिपूजनही करण्यात आले. जागामालक विलास जेऊरकर, पोपट बोराटे, शिवाजी सस्ते, अक्षय कोलते यांनी सहकार्य केले. यावेळी माजी नगरसेविका सारिका बोऱ्हाडे-सस्ते, अश्विनी जाधव, नितीन बोऱ्हाडे, निखिल बोऱ्हाडे, संतोष जाधव, तुषार सस्ते, मिनिनाथ सस्ते, दगडू आल्हाट यांच्यासह शिवशंभो कॉलनीतील नागरिक उपस्थित होते.

**पाणी आणि रस्ता दोन्ही प्रश्न सुटले...**

शिवशंभो कॉलनीमध्ये एका बिल्डरने एक ते दोन गुंठेचे प्लॉटिंग करुन ९ वर्षांपूर्वी नागरिकांना विकले. पण, त्या जागेला येणारा रस्ता दुसऱ्या शेतकऱ्याचा असल्यामुळे नागरिकांना महापालिकेची पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकता येत नव्हती. याकामी माजी नगरसेविका सारिका सस्ते यांनी आमदार महेश लांडगे यांच्या सहकार्याने पाठपुरावा केला होता. त्याला यश मिळाले. आता रस्त्याचा प्रश्नही मार्गी लागला आहे.

त्यामुळे शिवशंभो कॉलनीतील नागरिकांनी व्यक्त केले आहे.



“ समाविष्ट गावांमध्ये २००० नंतर मोठ्या प्रमाणात नागरिकरण झाले. २००० ते २०१४ पर्यंत या भागात नागरिकरणाच्या तुलनेत पायाभूत सोयी-सुविधा सक्षमपणे निर्माण झाल्या नाहीत. २०१७ मध्ये महानगरपालिकेत भाजपाची सत्ता आल्यानंतर खऱ्या अर्थाने समाविष्ट गावांच्या विकासाला चालना मिळाली. पायाभूत सोयी-सुविधा सक्षम केल्यामुळेच "चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर" विकसित झाला. मात्र, आजही खासगी जागामालक, सोसायटीधारक आणि महानगरपालिका प्रशासन यांच्यातील सकारात्मक समन्वयाअभावी काही ठिकाणी रस्त्याची कामे प्रलंबित आहेत. शिवशंभो कॉलनीतील नागरिकांनी याबाबत सातत्याने मागणी केली. त्यानुसार, येथील जलवाहिनी आणि रस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्याबाबत पुढाकार घेतला. त्याला यश मिळाले. सोसायटीधारकांच्या हितासाठी आम्ही सदैव कटिबद्ध आहोत.

— **महेश लांडगे**
आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

## गरजू व होतकरु विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**पवनानगर :** स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून विश्वजीत बारणे यांच्या मार्गदर्शनाखाली गार्डन बॉईज यांच्या वतीने गरजू व होतकरु विद्यार्थ्यांना आज गुरुवारी शालेय साहित्याचे वाटप केले जाणार आहे.

थेरगाव येथील महादेव कॉलनीतील लक्ष्मीबाई बारणे उद्यानात गुरुवारी सायंकाळी ४ ते ६ या वेळेत हा कार्यक्रम होणार आहे. प्रत्येक घरामधील दोन विद्यार्थ्यांना याचा लाभ घेता येईल. पहिल्या येणा-या २५० विद्यार्थ्यांसाठी संधी, वयोगट मर्यादा ६ ते १२, विद्यार्थ्यांना पालकांना सोबत आणावे लागणार आहे. थेरगाव परिसरातील पालकांनी लवकरात-लवकर नावनोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



» Selected



## पवनानगरमध्ये 'हर घर तिरंगा' मोहिमेची जनजागृती

**पवनानगर :** देशाचा अमृत महोत्सव अंतर्गत केंद्र शासनाकडून ‘हर घर तिरंगा’ अभियान राबविण्यात येत आहे. पवनानगर येथे अभियानाबाबत जनजागृती करण्यासाठी प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले होते.स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून राष्ट्राभिमान जागृती आणि देशाच्या गौरवासाठी प्रत्येक नागरिकाने आपल्या घरावर तिरंगा ध्वज फडकविण्याबाबत आवाहन करण्यात आले.

पवनानगर येथील पवना विद्या मंदिर, संकल्प इंग्लिश मीडियम स्कूल, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व सरुबाई पांडुरंग दळवी ज्युनिअर कॉलेज यांच्या मार्फत तिरंगा रॅली काढण्याचे आयोजन केले होते.यावेळी विद्यार्थ्यांनी हर घर तिरंगा – घर घर तिरंगा, भारत माता की जय, जय जवान – जय किसान अशा घोषणा देऊन परिसर दणाणून सोडला होता. शाळा ते पवनानगर बाजारपेठ अशी प्रभातफेरी काढण्यात आली.

पवना संकुलाचे प्राचार्य भाऊसाहेब आगळमे, संकल्प स्कूलचे प्राचार्य राहुल सोनावणे, सरुबाई दळवी कॉलेजचे प्राचार्य दत्तात्रय कराळे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर रॅलीचे नियोजन करण्यात आले होते.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## हरित सेतू उपक्रमाच्या जनजागृतीसाठी सायकल रॅली

**चिखली :** पादचाऱ्यांसाठी, सायकलप्रेमी तसेच लहान शाळकरी मुलांसाठी आणि रहिवाशांसाठी सार्वजनिक परिसर हा स्वच्छ, सुंदर आणि उत्साहवर्धक बनवण्याच्या उद्देशाने आपण हरित सेतू हा उपक्रम राबवीत आहोत, तसेच घरोघरी तिरंगा उपक्रमाच्या माध्यमातून सर्व नागरिकांनी आपल्या घरांवर तिरंगा झेंडा फडकवावा,तसेच महापालिकेच्या हरित सेतू उपक्रमात देखील आपला सहभाग नोंदवून पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी हातभार लावावा असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले.पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने घरोघरी तिरंगा या मोहीम तसेच हरित सेतू उपक्रमाची जनजागृती करण्यासाठी आज सकाळी 6 वाजता आकुर्डी परिसरात भव्य सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना आयुक्त सिंह बोलत होते. आजच्या कार्यक्रमात सह शहर अभियंता प्रमोद ओंभासे, उपआयुक्त अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता बापूसाहेब गायकवाड, प्रेरणा सिनकर, संध्या वाघ, सुनील पवार, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच इंडो ॲथलेस्टिक्स सोसायटी (आय.ए.एस.) चे गजानन खैरे आणि त्यांच्या संस्थेचे संपूर्ण सहकार्य या भव्य सायकल रॅलीला लाभले. त्यांच्या सहकार्याने सायकल फेरी सुरक्षितपणे यशस्वी झाली. आजच्या रॅलीत आयुक्त शेखर सिंह यांच्यासह सुमारे ५५३ सायकलपटूंनी आपला सहभाग नोंदवला.

घरोघरी तिरंगा मोहीमेच्या माध्यमातून राबवण्यात आलेल्या भव्य सायकल रॅलीवेळी माझी वसुंधरा ही पर्यावरण रक्षणाची सामुहिक शपथही घेण्यात आली. शपथेचे वाचन जनता संपर्क अधिकारी प्रफुल पुराणिक यांनी केले.



## वेशभूषा स्पर्धेचे आयोजन...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिका, पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी लि. आणि पिंपरी-चिंचवड स्मार्ट बाजार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सांस्कृतिक वेशभूषा स्पर्धेच्या पारितोषिक वितकरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# सांस्कृतिक वेशभूषा स्पर्धेचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महाराष्ट्राला संतांची परंपरा लाभली असून या संस्कृतीचे जतन होणे गरजेचे आहे. पाश्चात्य संस्कृतीचा अंगीकार करण्यापेक्षा संतांच्या विचारांचा अंगीकार केल्यास जीवनात सकारात्मक बदल होतात, असे मत अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी व्यक्त केले.

पिंपरी-चिंचवड महापालिका, पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी लि. आणि पिंपरी-चिंचवड स्मार्ट बाजार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सांस्कृतिक वेशभूषा स्पर्धेच्या पारितोषिक वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. गिरीश प्रभुणे, ह.भ.प. शिरीष महाराज मोरे, महाराष्ट्र राज्य रिलायन्स स्मार्ट बाजारचे बिझनेस हेड संतोष शिंदे, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उप आयुक्त अण्णा बोदडे, यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या स्पर्धेच्या माध्यमातून मुलांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळाले. सदर सांस्कृतिक वेशभूषा स्पर्धेचे मागील वर्षीदेखील आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये एक हजारांपेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी झाले होते. या वर्षीदेखील स्पर्धेचे व्यापक स्तरावर आयोजन करण्यात आले. या वर्षी स्पर्धेमध्ये ४००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यामध्ये पहिल्या फेरीत १७०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यामधून दुसऱ्या फेरीसाठी १८ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

## ठाकर समाजातील १० आदिवासी कुटुंबियांना जातीचे दाखले वाटप



**पिंपरी :** आमदार सुनिल शेळके यांनी सुरू केलेल्या आदिम सेवा अभियानाअंतर्गत आणि मोरया प्रतिष्ठानच्या माध्यमातून वडगाव – कातवी शहरातील ठाकर समाजातील १० कुटुंबीयांना जातीचे दाखले वाटप करण्यात आले. तसेच शासनाने सुरू केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज देखील भरून घेण्यात आले.

वडगाव नगरीचे माजी नगराध्यक्ष मयूर ढोरे यांच्या उपस्थितीत आदिवासी बांधवांना त्यांच्या जातीचे दाखल्यांचे वाटप करण्यात आले. कित्येक वर्षे प्रयत्न करूनही न मिळालेले जातीचे दाखले मोरया प्रतिष्ठानच्या माध्यमातून मिळाल्याने आदिवासी बांधवांनी आनंद व्यक्त केला.तसेच, यापुढे ठाकर समाजातील आणखीन काही वंचित कुटुंबीयांना जातीचे दाखले मिळवून देण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करणार असल्याचे प्रतिष्ठानच्या अध्यक्षा अबोली ढोरे यांनी सांगितले.

जातीचे दाखले नसल्याने आदिवासी बांधवांना पात्रता असूनही कागदपत्रांच्या अभावी सरकारी योजनांपासून वंचित राहावे लागत होते. तसेच विविध शासकीय कामे, मुलांची शैक्षणिक कामे अशा दाखल्यांमुळे अडून राहत होती. पूर्वज शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर असल्याने जातीचे दाखले काढण्यासाठी आदिवासींना नाहक त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे अशा नागरिकांसाठी आमदार सुनिल शेळके यांनी विशेष अभियान सुरू केले आहे. याप्रकरणी सचिन वामन, रुपेश सोनुने, यशवंत शिंदे यांचे सहकार्य मिळाले.

## दादागिरी करणाऱ्या स्वयंघोषित भाईला पोलिसांनी दाखवला इंगा

**सांगवी- :** टपरी चालकाला मारहाण करत त्याच्याकडून हप्ता वसुली करणाऱ्या स्वयंघोषित भाईला सांगवी पोलिसांनी इंगा दाखवला. टपरी चालकाकडे हप्त्याची मागणी करत त्याला मारहाण केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर सांगवी पोलिसांनी कारवाई केली. खाकीचा धाक बघताच स्वयंघोषित भाई गयावया करू लागला.

श्यामबहादुर प्रतापसिंह (वय४१ , रा. पिंपळे गुरव. मूळ रा. उत्तर प्रदेश) यांनी या प्रकरणी सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे त्यानुसार नकुल उर्फ नक्या गायकवाड (वय २० ), त्याचा मित्र आकाश उर्फ आक्या शिवशरण (वय १९, दोघे रा. जुनी सांगवी) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी नक्की हा टपरी चालक प्रतापसिंह यांच्याकडे १०० रुपयांचा हप्ता मागत होता. प्रतापसिंह यांनी त्याला १०० रुपये दिले. त्यानंतर देखील आरोपीने प्रतापसिंह यांना धमकवून मारहाण केली. तसेच शिवीगाळ करून पान शॉपच्या गल्ल्यातून जबरदस्तीने सहा हजार रुपये काढून घेतले.

## ५ प्रेक्षागृहांच्या भाडे दराला प्रशासकीय मान्यता

# चिखलीतील टाऊन हॉलचे दर निश्चित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** महापालिकेच्यावतीने नव्याने उभारण्यात आलेल्या चिखली येथील टाऊन हॉलचे तसेच आकुर्डी येथील ग. दि माडगुळकर नाट्यगृहाचे भाडे किंवा अनामत दर व इतर भाडे आकारणीसाठीच्या विषयाला तसेच इतर विविध विषयांना प्रशासक शेखर सिंह यांनी प्रशासकीय मान्यता दिली.

महापालिका सभा आणि स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक असलेले विविध विषय प्रशासक शेखर सिंह यांच्या मान्यतेसाठी विशेष बैठकीमध्ये ठेवण्यात आले होते. पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये पार पडलेल्या बैठकीमध्ये प्रशासक सिंह यांनी विविध विषयांना मंजुरी दिली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त तथा नगरसचिव चंद्रकांत इंदलकर तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अंतर्गत येणाऱ्या प्रेक्षागृह आणि नाट्यगृह येथे नाटक तसेच विविध स्वरूपाचे सांस्कृतिक किंवा इतर कार्यक्रम होत असतात.

सद्यस्थितीत महापालिकेचे एकूण ५ प्रेक्षागृह, नाट्यगृह सुरू आहेत. या ५ प्रेक्षागृह किंवा नाट्यगृहांचे भाडे किंवा अनामत दर निश्चित करण्यात आले आहेत. परंतु आकुर्डी प्राधिकरण येथील ग. दि माडगुळकर नाट्यगृह तसेच नव्याने उभारण्यात आलेल्या चिखली येथील टाऊन हॉलचे भाडे किंवा अनामत दर निश्चित करणे आवश्यक होते.

नटसम्राट निळु फुले रंगमंदिर, पिंपळेगुरव येथील मंजूर असलेले भाडे किंवा अनामत दरांप्रमाणे ग. दि. माडगुळकर नाट्यगृहाचे दर निश्चित करण्यास प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली. तसेच नव्याने उभारण्यात आलेल्या चिखली येथील टाऊन हॉलचे नव्याने निश्चित केलेले दर लागू करण्यासाठीही प्रशासक सिंह यांनी बैठकीत मान्यता दिली.

# इनरव्हील क्लब तर्फे करियर मार्गदर्शन सत्र

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**तळेगाव दाभाडे :** येथील सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी स्पर्धा परीक्षा आणि संरक्षण क्षेत्रातील करियर संदर्भात मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते.

यावेळी लोणावळा विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी सत्यसाई कार्तिक यांनी विद्यार्थीनींशी संवाद साधला. स्पर्धा परीक्षांना तोंड देत असताना शिस्त, समर्पकता आणि अभ्यासात सातत्य असेल तर आपण सुयश मिळवू शकता, असे कार्तिक यांनी सांगितले.

विद्यार्थीनींनी नकारात्मकतेपासून दूर राहावे. पुरुषी वर्चस्वाला दूर ठेवायचे असेल तर महिलांनी सक्षम होणे जरुरीचे आहे. राष्ट्र प्रथम हा विचार सतत मनात असला पाहिजे. ताण तणावापासून दूर राहण्यासाठी अंगातील कला जोपासा, असा मोलाचा सल्ला सत्यसाई कार्तिक यांनी दिला. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्य मिसाळ यांनी मुलींसाठी एमपीएससी, यूपीएससी केंद्र सुरू करत असल्याचे जाहीर केले.

## शहरातील डासोत्पत्ती ठिकाणांवर दंडात्मक कारवाई

# आजार रोखण्यासाठी पालिका ॲक्शन मोडवर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** शहरात किटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिकेच्या वतीने व्यावसायिक आस्थापना, गृह सोसायट्यांसह घरांची तपासणी मोहीम तीव्र करण्यात आली आहे. तपासणीत डासोत्पत्ती ठिकाण आढळल्यास संबंधितावर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. महिनाभरात सुमारे १ लाख ८६ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे, अशी माहिती आरोग्य विभागाचे सहाय्यक आयुक्त अजिंक्य येळे यांनी दिली.



शहरात किटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव वाढू नये यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यासाठी महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी तपासणी मोहिम तीव्र करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिकेच्या वतीने शहरात राबवण्यात येणारी तपासणी मोहीम तीव्र करण्यात आली असून डासोत्पत्तीची ठिकाणे आढळलेल्या व्यक्ती आणि आस्थापनांवर ही कारवाई करण्यात आली आहे.

तपासणी मोहिमेत अ’ क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत २० हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. ब’ क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत ६४ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. क’ क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत १२ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. ड’ क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत १९ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. इ’ क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत ४ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. फ’ क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत ४३ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. ग’ क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत १३ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. ह’ क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत १ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. आज नागरिकांवर करण्यात आलेल्या कारवाई दरम्यान एकूण १ लाख ८६ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. १ जूनपासून आत्तापर्यंत एकूण सुमारे २४ लाखांपेक्षा अधिक दंड या मोहिमेच्या माध्यमातुन वसूल करण्यात आला आहे असल्याचे सहाय्यक आयुक्त येळे यांनी सांगितले.

#रा

## राज्यातील ११४८ पोलिसांना पदक जाहीर

# शहर पोलीस दलातील २१ जणांना 'विशेष सेवा पदक'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पोलीस महासंचालक रश्मि शुक्ला यांनी स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राज्यातील ११४८ पोलिसांना 'विशेष सेवा पदक' जाहीर केले. त्यामध्ये पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलातील २० अधिकारी आणि एका कर्मचाऱ्याचा समावेश आहे. पुणे शहर पोलीस दलातील १२ तर पुणे ग्रामीण पोलीस दलातील पाच जणांना हे पदक जाहीर झाले आहे.

नक्षलवाद्यांच्या हिंसक व बेकायदेशीर कारवायांना परिणामकारक आळा घालण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांना दरवर्षी महासंचालकांकडून 'विशेष सेवा पदक' दिले जाते. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला या पदकांची घोषणा केली जाते. तर प्रत्येक घटकनिहाय पदक वितरणाचा समारंभ स्वतंत्रपणे आयोजित केला जातो.



पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलातील दोन पोलीस निरीक्षक, १८ पोलीस उपनिरीक्षक आणि एक पोलीस कर्मचारी अशा २१ जणांना हे पदक जाहीर झाले आहे. शिरगाव पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक तेजस्विनी कदम यांनी नक्षलग्रस्त भागात साडेतीन वर्ष सेवा केली आहे. दरम्यान त्यांना सेवाकाळात १०० पेक्षा अधिक रिवार्ड मिळाले आहेत. त्यामुळे त्यांना 'विशेष सेवा पदक' जाहीर झाले आहे. सांगवी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी गोंदिया येथे सेवा केली असून त्यांना देखील हे पदक जाहीर झाले आहे.

### विशेष सेवा पदक जाहीर झालेले पिंपरी-चिंचवड मधील पोलीस

- पोलीस निरीक्षक तेजस्विनी कदम
- पोलीस निरीक्षक महेश बनसोडे
- पोलीस उपनिरीक्षक सागर देवकर
- पोलीस उपनिरीक्षक महेश सातपुते
- पोलीस उपनिरीक्षक मिलिंद कुंभार
- पोलीस उपनिरीक्षक गणेश आटवे
- पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल सूर्यवंशी
- पोलीस उपनिरीक्षक सोहन धोत्रे
- पोलीस उपनिरीक्षक बालाजी मेटे
- पोलीस उपनिरीक्षक संतोष जायभाये
- पोलीस उपनिरीक्षक श्रीकिशन कांदे
- पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय सुकाळे
- पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत गुरव
- पोलीस उपनिरीक्षक महादेव भालेराव
- पोलीस उपनिरीक्षक आबा कटपाळे
- पोलीस उपनिरीक्षक राहुल दुधमल
- पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण मोगले
- पोलीस उपनिरीक्षक अनिल टार्फे
- पोलीस उपनिरीक्षक चंद्रशेखर मोरखंडे
- पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र पानसरे
- पोलीस शिपाई योगेश्वर कोळेकर



## स्वातंत्र्य दिनानिमित्त आज विविध कार्यक्रम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** स्वातंत्र्य दिनानिमित्त महापालिकेतर्फे मुख्य प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात आज गुरुवारी (ता. १५) सकाळी सव्वाआठ वाजता आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते ध्वजवंदन होईल. त्यानंतर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. सकाळी साडेनऊ वाजता निगडीतील भक्तीशक्ती चौकात 'झेंडा उंचा रहे हमारा' हा देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम होईल.



क्रांतिकारकांना अभिवादन केले जाईल. तसेच, महापालिकेची सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या हस्ते, प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये मुख्याध्यापकांच्या हस्ते, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्राचार्य आणि विभागीय कार्यालयांमध्ये संबंधित शाखाप्रमुखांच्या हस्ते सकाळी साडेसात वाजता ध्वजवंदन होईल.

» Selected




## उध्दव ठाकरे मुख्यमंत्री होणार, यामध्ये काहीही तथ्य नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सोमेश्वरआगामी विधानसभा निवडणुकीत शिवसेना पक्षप्रमुख ( ठाकरे गट) उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्री पदाचा चेहरा जाहीर करण्याची मागणी शिवसेना नेते संजय राऊत यांनी केली. त्यासाठी ठाकरे कुटुंबीयांनी दिल्ली दौराही केला. मात्र, असे दौरे करून मुख्यमंत्री पद मिळणार नसल्याचे संकेत माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी दिले.

पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, महाराष्ट्राचा मुख्यमंत्री हा सर्वात मोठ्या पक्षाचा म्हणजे ज्या पक्षाच्या आमदारांची संख्या जास्त असते त्या पक्षाचा होतो. जर उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे जास्त आमदार निवडून आले तर त्यांच्या पक्षाचा मुख्यमंत्री होईल. आतापर्यंत आमच्यामध्ये म्हणजे जेव्हा राष्ट्रवादी आणि काँग्रेस बरोबर लढत होतोत तेव्हा ज्या पक्षाचे जास्त आमदार असतील त्या पक्षाचा मुख्यमंत्री होत होता. आताही ज्या पक्षाच्या जास्त जागा निवडून येतील त्या पक्षाचा मुख्यमंत्री होईल, असा फार्म्युला असेल. मात्र, विधानसभेच्या निवडणुकीआधी आम्ही मुख्यमंत्री पदाचा चेहरा ठरवणार नाहीत. त्यानंतर ज्यांच्या जास्त जागा निवडून येतील त्या पक्षाचा मुख्यमंत्री होईल, असं पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितलं.

लोकसभा निवडणुकीत ३० ते ३२ जागा मिळणार असल्याचा दावा आपण केला होता, असेही पृथ्वीराज म्हणाले. निवडून आल्यावर ज्या पक्षाचे आमदार जास्त असतील, त्या पक्षाचा आमदार होतो. येत्या विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लवकरच लागणार आहे. त्यामुळे सरकारतर्फे विविध योजनांचा पाऊस पाडला जात आहे.



## विद्यार्थिनींनी पाठविल्या सीमेवरील जवानांना राख्या

**वाकड :** सोमेश्वर विद्या प्रसारक मंडळ व सैनिक युवा फोर्स यांच्यावतीने रक्षाबंधन निमित्ताने सीमेवरील जवानांसाठी राख्या पाठविण्याचा सोहळा झाला. सैनिक युवा फोर्सचे संचालक निवृत्त सैनिक रामदास मदने यांच्याकडे आपल्या फौजी भावांसाठी राख्या सुपूर्त करण्यात आल्या. यावेळी सोमेश्वर विद्या प्रसारक मंडळाचे संस्थापक प्रा. अंकुश बोडके, अॅग्रो आयडॉल कैलास जाधव, एसपी इंग्लिश मिडीयम स्कूलच्या मुख्याध्यापिका अर्चना बोडके, सुनीता मदने आदी मान्यवर उपस्थित होते.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## पवना धरणातून विसर्ग बंद

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहराला पाणी पुरवठा करणा-या पवना धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचे प्रमाण कमी झाले असल्याने धरणातून होणारा विसर्ग बंद करण्यात आल्याची माहिती राज्याच्या पाटबंधारे विभागाकडील पवना धरण व्यवस्थापनाकडून कळविण्यात आली आहे. मंगळवारी सकाळी पवना धरणात १७.७३ टक्के इतका पाणीसाठा आहे.

मागील आठवड्यात पाऊस चांगला पडल्याने पवना नदीला पूर आला होता. नदीपात्रातील पाणी लोकवस्तीत घुसल्याने हजारो नागरिकांना स्थलांतर करावे लागले होते. दरम्यान, शुक्रवारी (दि. ९) धरणातील साठवण क्षमतेचा विचार करता नदीपात्रात १४०० क्युसेक विसर्ग करण्यात आला होता.



शनिवारी (दि. १०) पाऊस कमी झाल्याने विसर्ग १४०० क्युसेकवरून ८०० वर आणण्यात आला. तीन ते चार दिवसांत पावसाचे प्रमाण कमी झाल्याने धरणातून विसर्ग बंद करण्यात आला आहे. त्यामुळे पवना नदीपात्रातील पाण्याची पातळी कमी झाली असून पुराचा धोका राहिलेला नाही. आजअखेर पवना धरणातून होणारा विसर्ग बंद करण्यात आल्याचे पाठबंधारे विभागाकडील पवना धरण व्यवस्थापनाकडून कळविण्यात आले आहे.

भविष्यात पावसाचे प्रमाण वाढल्यास विसर्ग बंद अथवा सुरु ठेवण्याचा निर्णय घेतला जाईल, असेही कळविण्यात आले आहे. मंगळवारी सकाळी पाटबंधारे विभागाने दिलेल्या आकड्यांनुसार धरणात १७.७३ टक्के इतका पाणीसाठा आहे. तर या पावसाळ्यात आतापर्यंत २५०६ मिमी इतका पाऊस पडला आहे. गेल्या वर्षी आजच्या दिवशी शहरात ९५.८० टक्के पाणीसाठा होता आणि २०५९ मिमी इतका पाऊस झाला होता. गेल्या वर्षी संपूर्ण पावसाळ्यात एकूण २८८२ मिमी पाऊस झाला होता.

## आंदोलन...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा




**पिंपरी :** अमरावतीचे आमदार रवी राणा यांच्या विरोधात उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना महिला आघाडीने आंदोलन केले.

# ठाकरे गटाचे रवी राणा यांच्याविरोधात आंदोलन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महायुतीत सहभागी असलेले अमरावतीचे आमदार रवी राणा यांच्या विरोधात उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना महिला आघाडीने आंदोलन केले. "हा कसला भाऊ, हा तर ओवाळणी खाऊ" असे म्हणत महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांनी राणा यांच्या प्रतिमेला जोडे मारले. "राणा यांचे काय करायचे काय खाली डोके वर पाय" अशा घोषणांनी महिलांनी पिंपरी चौक दणाणून सोडला.

अमरावतीचे आमदार रवी राणा यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेवरून अमरावतीमध्ये नुकतेच एक वक्तव्य केले, ते म्हणाले होते की "विधानसभेसाठी तुमचे आशीर्वाद द्या अन्यथा तुमच्या खात्यातून दीड हजार रुपये पुन्हा काढून घेऊ." या वक्तव्यानंतर राणा यांच्या विरोधात उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी संताप व्यक्त करत पिंपरी येथे "जोडे मारो" आंदोलन केले. राणा यांचे वक्तव्य म्हणजे महिलांच्या स्वाभिमानाला ठेच पोहोचवणारे आहे. रवी राणा यांच्याप्रमाणे महायुतीतील इतरही काही मंत्र्यांनी अशीच वक्तव्ये केली आहेत. योजना आणली म्हणजे महिलांवर उपकार केले का असा सवालही महिलांनी व्यक्त केला.

यावेळी आंदोलनात शिवसेना (ठाकरे गट) पुणे जिल्हा संघटिका सुलभा उबाळे, माजी नगरसेविका मीनल यादव, वैशाली मराठे, अनिता तुतारे , आशा भालेकर, सुजाता काटे, नजमा शेख , शशिकला उभे, ज्योती भालके , प्रज्ञा उतेकर, अश्विनी खंडेराव, , वैशाली कुलथे, कामिनी मिश्रा, रजनी वाघ, ज्योती भालके, वैशाली काटकर,सुजाता गायकवाड , साधना वाघमारे ,वंदना बनसोडे गीता कुषालकर, तस्लिम शेख, संगीता तुपके, जनाबाई गोरे, स्मिता मोगरे, कावेरी परदेशी आदी सहभागी झाल्या. सुलभा उबाळे म्हणाल्या, अमरावतीचे आमदार रवी राणा यांनी लाडकी बहीण योजनेवरून संताप जनक विधान केले आहे. या विधानामुळे तमाम भगिनींचा स्वाभिमान दुखावला गेला आहे. "विधानसभेसाठी तुमचे आशीर्वाद द्या अन्यथा तुमच्या खात्यातून दीड हजार रुपये काढून घेऊ. असे म्हणणारे राणा ही एक प्रवृत्ती आहे. राणा यांच्या तोंडून भाजपची नीतिमत्ता समोर आली आहे.

पान १ वरून

## कमला नेहरू रुग्णालयात दहशतवादी घुसल्याचा संशय!

त्यानंतर पोलिस तिथे पोहोचले . तूर्तास ते दहशतवादी किंवा बांग्लादेशी असल्याच पोलिसांच्या प्राथमिक चौकशीच आढळून आलेल नाही. असे पोलिसांनी सांगितले आहे.काल एक फोटो मोबाइलवर व्हायरल झाला होता. त्यावरून आम्हाला त्यांच्यावर संशय आला. ते काल ब्लड टेस्ट करायला आले होते. तसेच रुग्णालयाबाहेर जाऊन फोटो काढून गेले. आम्हाला हे फारच संशयास्पद वाटलं. आज पुन्हा त्यांना आम्ही पाहिलं. मग त्यांना आम्ही रुग्णालयात स्थानबद्ध करून ठेवले. आम्ही कालपासून त्यांच्यावर नजर ठेवून होतो. आज पण ते ब्लड टेस्ट करायला आले. आम्ही लगेच त्यांना पकडून ठेवले. त्यांच्या बॅगमध्ये बिहारचे आधार कार्ड होते. तातडीने वरिष्ठांना कळवले. तसेच पोलिसांना फोन करून बोलावले. यावेळी आम्ही लोकांना बाहेर काढले. त्यांची वेशभूषा अफगाणी होती. त्यामुळे आम्ही घाबरलो होतो. पण आम्ही नागरिकांची, रुग्णांची सुरक्षा म्हणून तातडीने पाऊल उचलून रुग्णालय बंद केले असल्याचे सुरक्षारक्षकांनी सांगितले.

## पवारांचा पडद्या मागून जरांगेना पाठिंबा -हाके

ओबीसी मराठा परिस्थिती खराब झाली आहे. मग तेव्हा ते गप्प का बसले? मुख्यमंत्री बैठकीला तूम्ही का गेला नाहीत? तरीही स्वागत आहे. आम्ही बैठकीला जाऊ, आमची आम्ही कायदेशीर भाषा तिकडं बोलू. पडद्यामागून पवार यांनीच जरांगेना उद्युक्त केले. इतके दिवस गप्प का होते. ओबीसी प्रश्नांवर बोलावे असे हाके म्हणाले आहेत. हाके यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना प्रश्न विचारले आहेत. ते म्हणाले, मराठा आरक्षणासाठी जरांगे यांनी आंदोलन केले होते. त्यांना आश्वासन दिली होती त्याचे काय झाले? जरांगेच्या शांतता रॅलीला आक्षेप आहे. त्यात अशांतता निर्माण कोणी केली. शांतता रॅलीला शाळा का बंद केल्या जातात. कायदा सुव्यवस्था पाळू शकत नाही का? सांगा मुख्यमंत्री लाखो हरकती घेतल्या कुणबीवर त्याचे काय झाले तेही सांगा असे हाके यांनी विचारले आहे. ओबीसी आरक्षणाला डोळ्यासमोर ठेवून अस्वस्थता निर्माण करणार का सरकार? शांतता रॅलीत ३०ते ३५ वेळा आम्ही क्षत्रिय आहोत, मराठ्यांची अवलाद आहोत असे म्हटले. ही वर्चस्वाची भावना आहे. यामुळे इतर जणांमध्ये असुरक्षितता निर्माण होते.

## शनिवारवाडा देणार दत्तक!

शनिवारवाडा व पुण्यातील इतर वारसा स्थळे या योजने अंतर्गत दत्तक दिले जाणार असून अद्याप या साठी कोणत्याही संस्थेने अर्ज केलेल्या नाही, अशी माहिती पुरातत्व विभाग मुंबईचे अधीक्षक शुभा मुजुमदार यांनी दिली आहे. पुण्यातील शनिवारवाडा, आगाखान पॅलेस, पाताळेश्वर लेणी, लोहगड, कार्ला लेणी आणि भाजे लेणी या संवर्धनासाठी दत्तक दिले जाणार आहे.

## पुणे शहरातील ड्रग्स तस्करीचा...

कर्मचारी नशेबाजांना पोहोचवित असल्याचे तपासात उघड झाले आहे.विश्वनाथ कोनापुरे (वय ४८, रा. काळेपडळ, हडपसर, मूळ रा. सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्या कुरिअर कंपनीच्या कर्मचाऱ्याचे नाव आहे. विश्रांतवाडीतील धानोरी भागात पोलिसांनी छापा टाकून १ कोटी रुपयांचे मेफेड्रोन जप्त केले होते. याप्रकरणी श्रीनिवास संतोष गोंदजे, रोहित बेडे, निमेश आबनावे यांना अटक करण्यात आली होती. यावेळी पोलिसांनी त्यांची कसून चौकशी केली. त्यानंतर आरोपींनी मेफेड्रोन कोठून आणले, ते कुणाला आणि कसे विकले याची माहिती दिली. यातून या प्रकारचा उलगडा झाला. तपासात मिळालेल्या माहितीनुसार कुरिअर कंपनी कर्मचारी कोनापुरेला पोलिसांनी अटक केली

## गोविंदांना १० लाख रुपयांचे ...

गोविंदा असोसिएशनने राज्यातील सर्व गोविंदांचा विमा उतरविण्याची मोहीम सुरू केली आहे.सरकारी आदेशानुसार हात किंवा दोन्ही डोळे गमावणाऱ्या गोविंदांना १० लाख रुपयांचे विमा संरक्षण दिले जाणार आहे. राज्यातील ७५ हजार गोविंदांचा विमा उतरवण्याची घोषणा सरकारने केली आहे. दहीहंडीदरम्यान अपघातात गोविंदांचा एक हात, एक पाय किंवा डोळा गमावल्यास त्यांना ५ लाख तर दोन्ही हात, पाय किंवा डोळे गमावणाऱ्यांना १० लाख रुपयांपर्यंतच्या विम्याचा लाभ मिळणार असल्याचं सरकारतर्फे स्पष्ट करण्यात आलं आहे. अपघातात जखमी झालेल्या गोविंदांना उपचारासाठी जास्तीत जास्त एक लाख रुपये मिळू शकणार आहेत.

## डॉ. ज्योती भाकरे यांची नियुक्ती

त्यांनी आरोग्य कायदा या विषयात पीएच. डी केली असून, गेल्या अनेक वर्षांपासून त्या विद्यापीठात ज्ञानदानाचे काम करत आहेत. त्यांच्या नियुक्तीबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, विद्यापीठाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## पर्यावरणपूरक गणेशोत्सव...

महापालिकांनी गणेशोत्सव मंडळाच्या ठिकाणी तैनात केलेल्या अग्नीशमन वाहनासाठी कुठलेही शुल्क आकारणी करू नये, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

**PUBLIC CAUTION NOTICE**

Know all men that my client **Mr. Sachin Vitthal Mangade** is owner of the property described in the scheduled written herein below. Original Sale deed dated 12/07/2013 doc. No. 6571/2013 at **Haveli No 9,** executed between Chandrakant Tulshiram Mangade and Others and Sachin Vitthal Mangade alongwith RR and Index II, and Original Sale deed dated 28/12/2009 doc. No. 7861/2009 at Haveli No 9, executed between Bhanudas Nivrutti Mangade and Sachin Vitthal Mangade alongwith RR and Index II and Original Sale Deed dated 24/12/2009 to and in favor of Mr. Sachin Vitthal Mangade. The said Sale Deed was registered in the office of Sub registrar Haveli No. 9 at Sr. No. 7813/2009 alongwith RR and Index II are misplaced. Hereinafter referred to as **"said Documents".** That my client has taken best effort to search the said Document. In spite of the same the said Documents are not traceable. By the way of abundant caution my client has logged a Police complaint Online with Bharati Vidyapeeth, Pune on 13/08/2024 having "Lost Report No: 114972- 2024".

By this notice the public at large is made aware of the above facts. Any person dealing in respect of the said Property or on basis of the said Document shall be doing so at his/their own costs, consequences and risks. Such person/s shall not be entitled to any right, interest or title in the said Property. Hence this Public Caution Notice. If any person has possession or found the said document, then should inform about the same or his right on the same, only if informed within 8 days. If no communication is received within 8 days, it will be presumed that no one has found the said document or no one has claim over the said property docs and my client will proceed for Deed of Transfer of the said property.

**SCHEDULE OF PROPERTY**

All that piece and parcel of land admeasuring area 269.98 Sq. Mtrs i.e. 2405 Sq. Fts and construction thereon situated at Survey/Gat No. 12 Hissa No 1 having total land admeasuring area 00 Hector 54 Aare, out of that 500 Sq. Fts and Survey/Gat No 20 Hissa No 1 having total land admeasuring area 00 Hector 57 Aare out of that 2405 Sq. Fts, at revenue Village Mangadewadi, Taluka Haveli, District Pune, within the local limits of Municipal Limit of Pune and also within the jurisdiction of the Sub- Registrar Haveli, Pune.

**Advocate Aishwarya Sachin Koli**
**Place :** Pune
**Date :** 15/08/2024
Add: Office No 3, Yojana Complex, Ramanbaug Chowk, 502 Narayan Peth, Pune 411 030. **Mob: 9145701224**

**PUBLIC NOTICE**

Know all men by this notice that the property described in the schedule written hereunder is presently owned and possessed by **Mr. Audumber Uday Pikle.** That the owner has agreed to sell the said Property to my Client. The owner has represented and assured to my client that the Owner is in possession of the said Property and have full and absolute right to sell & convey the said Property to my client and have further represented and assured my client that, said Property is free from all encumbrances and their title to the said Property is Legal, Clear and Marketable. This notice is issued for verification of the owner's title to the said Property.

Any person/s or corporate body having any interest, claim, lien, mortgage, attachment, charge, maintenance right, easementary right, or any other right, title, etc. of whatsoever nature, in the said Property or any part thereof are hereby required to inform the undersigned, in writing with full details of their claim, right, title or interest in the said along with documentary evidence in support within **8 days** from publication of this public notice. In the event no such objection / communication is received, it shall be presumed that no person has/have any objection for the proposed transfer to be executed in favour of my Client, my Client shall proceed as if, there are no claims. Any right there after claimed shall be deemed to be knowingly waived.

**SCHEDULE OF PROPERTY**

All that piece and parcel of Flat/Apartment No. 15, situated on the 5th Floor, admeasuring area 877 Sq. Fts. i.e. 81.50 Sq. Mtrs Built-up, Terrace admeasuring area 91 Sq. Fts i.e. 8.45 Sq. Mtrs, along with Parking admeasuring area about 75 Sq. Fts i.e. 6.97 Sq. Mtrs, along with 4.56% undivided share in common areas and facilities in **"Karan Regency Apartment"** which is constructed on the land bearing Survey No. 88, Hissa No. 5/B/2A/1 and 6A/1/3, CTS No. 721, at Village Kothrud, Taluka. Haveli, Dist. Pune, within in the local limits of Pune Municipal Corporation, Taluka Haveli, and District Pune. Together with all the rights, title and/or interest attached thereto.

**Advocate Abhijit B. Borole**
**Place :** Pune
**Date :** 15/08/2024
Add: Office No 3, Yojana Complex, Ramanbaug Chowk, 502 Narayan Peth, Pune 411 030. **Mob: 8007799699**

**डॉ. विकास खरात उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी भोर उपविभाग भोर यांचे कार्यालय**

**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसीव्दारे तमाम नागरीकांना कळविणेत येते की, भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दि. ११/०८/२०२३ रोजीच्या राजपत्रान्वये जन्म मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मध्ये कलम ११(२) व ३ नुसार जन्म मृत्युच्या तारखेपासून १ वर्षानंतरच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणामध्ये अशा जन्म मृत्युची नोंद करणेबाबत अनुषंगिक कार्यवाही करुन आदेश देणेकामी संबधित कार्यक्षेत्रातील उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांना प्राधिकृत केले आहे. त्याअनुषंगाने अर्जदार आशा अंकुश देशमुख रा. पसुरे ता. भोर जि. पुणे यांनी या कार्यालयाकडे जन्म मृत्यु नोंदणी कायदा २०२३ मधील कलम १३(३) नुसार अर्ज दाखल केला आहे. सदर तरतुदीनुसार आर्जदार यांची आई कै. ताराबाई एकनाथ धुमाळ यांचा मृत्यु मौजे पसुरे ता. भोर जि. पुणे येथे दि. ०२/१२/२००६ रोजी झालेचे नमूद करुन सदर मृत्युची नोंद होवून दाखला मिळणेबाबत मागणी केली आहे. तरी सदर जन्म-मृत्यु नोंदणी बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप/हरकत अथवा मागणी तपशिलामध्ये दुरुस्ती असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसाचे कालावधीमध्ये लेखी स्वरुपात या कार्यालयास अवगत करावे. सदर विहित कालावधीमध्ये लेखी आक्षेप/हरकत अथवा मागणी तपशिलामध्ये दुरुस्ती प्राप्त न झाल्यास या कार्यालयाकडून जन्म मृत्यु नोंदणी कायदा २०२३ मधील तरतुदीनुसार आदेश पारित करणेत येईल.

आज दि. ०८/०८/२०२४ रोजी माझे सही व कार्यालयाचे शिक्यानिशी हि जाहीर नोटीस देणेत आली आहे.

क्र. फौज/मृत्यू/एस. आर/७७४/२०२४
दिनांक :- ०८/०८/२०२४
ठिकाण :- भोर

शिक्का

सही/-
डॉ. विकास खरात
उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी भोर उपविभाग भोर

# शहरभर स्वातंत्र्याचा उत्सव!

## 'हर घर तिरंगा' अभियान उत्साहात

### खानापूरच्या महात्मा गांधी विद्यालयात प्रभात फेरीतून जनजागृती



**खानापूर :** येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या महात्मा गांधी विद्यालय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत हरघर तिरंगा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.विद्यालयाचे मुख्याध्यापक देशमुख एस.बी.यांचे नेतृत्वाखाली व ज्येष्ठ शिक्षक शशिकांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले.प्रभात फेरीच्या माध्यमातून ग्रामस्थांना हरघर तिरंगा उपक्रमाची जनजागृती करण्यात आली. प्रभात फेरी यशस्वी करण्यासाठी सुजाता भोसले, नूतन ओतुरकर,मीरा कदम यांनी बहुमोल सहकार्य केले. विद्यार्थ्यांनी हरघर तिरंगा उपक्रमांत सहभाग घेतला. ग्रामस्थांनी ठिकठिकाणी स्वागत केले.



कसबा विश्रामबाग क्षेत्रीय कार्यालय



धनकवडी सहकार नगर क्षेत्रीय कार्यालय



प्रभाग क्रमांक 42 आंबेगाव येथील जिल्हा परिषद शाळा

### राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते ध्वजारोहण

**पुणे :** भारतीय स्वातंत्र्य दिनाचा ७७ वा वर्धापन दिन गुरुवार १५ ऑगस्ट रोजी साजरा केला जाणार आहे. त्यानिमित्ताने राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते विधान भवन (कौन्सिल हॉल) येथे सकाळी ९.०५ वा. ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय कार्यक्रम होणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालय येथे सकाळी ७.३० वाजता आणि शनिवार वाडा येथे सकाळी ८ वा. ध्वजारोहण कार्यक्रम होणार आहे. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने सर्व सार्वजनिक व शासकीय इमारतीवर तसेच ऐतिहासिक महत्वाच्या गड किल्ल्यांवर राष्ट्रध्वज उभारण्यात येणार आहेत.

नागरिकांना मुख्य शासकीय समारंभात भाग घेता यावा यासाठी सकाळी ८.३५ ते ९.३५ वा. च्या दरम्यान ध्वजारोहणाचा अथवा इतर कोणताही शासकीय व निमशासकीय समारंभ आयोजित करण्यात येऊ नये. अन्य कार्यालयांना सकाळी ८.३५ पूर्वी किंवा ९.३५ नंतर ध्वजारोहण कार्यक्रम साजरा करता येईल, असे निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी कळविले आहे.



### क्रांतिकारकांच्या पोषाखात शोभायात्रा

**पुणे :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतुन देशभरात हर घर तिरंगा ही मोहीम राबविण्यात येत असुन यामध्ये शासकीय संस्थासोबत ,सरकारी,खाजगी शाळाही सहभागी झाल्या आहेत. राज्यातही ही मोहीम मोठया उत्साहात सुरु आहे. पुणे शहरातील कोथरुड परिसरातील महेश विद्यालय मराठी माध्यमच्यावतीने क्रांतिकारकांच्या पोषाखात शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी मुलांनी भारत माता की जय, हर घर तिरंगा या घोषणा दिल्या तसेच यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका जान्हवी अजोतीकर यांनी उपस्थित मुलांना तिरंगा प्रतिज्ञा दिली. जगभरातील अधिकाधिक भारतीयांना त्यांच्या घरी तिरंगा फडकवण्यासाठी प्रोत्साहित करण्याकरता हर घर तिरंगा मोहीम सुरू करण्यात आली आहे. हे राष्ट्र उभारणीत सहभागी झालेल्या सर्व क्रांतीवीराच्या समर्पणाचे आणि राष्ट्रध्वजाशी संबंधित वैयक्तिक संलग्नतेचे प्रतीक म्हणून हे अभियान महत्वाचे असल्याचे मुख्याध्यापिका जान्हवी अजोतीकर यांनी सांगितले. शाळासमितीचे अध्यक्ष सचिन मंत्री यांनी विद्यार्थ्यांना देशभक्तीपर माहिती दिली.

### समाज कार्याचा मूलमंत्र पथनाट्य

**पुणे :** महेश विद्यालय मराठी माध्यमाच्या शाळेत तेरा ऑगस्ट रोजी शालेय विद्यार्थ्यांचे पथनाट्य आयोजित केले होते. सध्या श्रावण महिना सुरू आहे या महिन्यात दर सोमवारी शंकराच्या मंदिरात महादेवाच्या पिंडीवर दुधाचा अभिषेक केला जातो तसेच महादेवाच्या पिंडीला १००० बिल्वपत्र वाहिले जाते. या धार्मिक श्रद्धेला लोकांनी अंधश्रद्धेचे रूप दिल्यामुळे समाजातील लोकांमध्ये अंधश्रद्धा निर्मूलनानिमित्त जनजागृती करण्यासाठी शाळेतील



विद्यार्थ्यांनी समाजकार्याचा मूलमंत्र हे पथनाट्य कोथरूड येथील शिवाजी पुतळ्या जवळच्या नावाजलेल्या परिसरात सादर केले.

पथनाट्यात २२ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता घोषवाक्य गीत माध्यमातून समाजाचा दानधर्म, वृक्षारोपण ,राग द्वेष, अहंकार यांचा त्याग करणे आधी मूल्यांचे महत्व पटवून दिले.



मनपा शाळा क्रमांक ८३ मुलांची माळवाडी हडपसर



प्रभाग क्र. ८ इंदिरा नगर शाळा



औंध बाणेर होळकर नगर शाळा १



पुणे शहर क्राईम ब्रांचचे सहाय्यक पोलिस आयुक्त सतिश गोवेकर यांना पोलीस खात्यातील अत्यंत मानाचा असणारा राष्ट्रपती पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सर्वपक्षीय मित्र परिवारा तर्फे त्यांचा तिरंगा झेंडा, शाल आणि मिठाई देऊन सन्मान करण्यात आला. सदर पुरस्कार हा अत्यंत अभिमानास्पद आहे. याप्रसंगी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड. मंदार जोशी, बाळासाहेब दाभेकर, बाळासाहेब बोडके, दत्ताभाऊ सागरे, प्रमोद घाडगे, संजय उभे, निलेश वावरे उपस्थित होते.

## नाट्यगृहांमध्येही महापालिकेच्या भ्रष्ट्राचाराचे वारे

**पुणे :** पुणे शहरातील नाटयगृहांमध्येही आता महापालिकेचा भ्रष्ट्राचार पोहचला आहे. नाट्यगृहाच्या देखभाल दुरुस्तीचे काम ज्या ठेकेदारांना देण्यात आले होते. त्यांनी बोगस कर्मचारी दाखवून पैसे लाटले आहेत. ज्या ठेकेदारांकडे हे काम देण्यात आले होते, त्यांनी महापालिकेकडे नोंदणी केलेले नाट्यगृहातील कर्मचारी रिक्षाचालक, मजूर, तसेच इतर कामगार असून, त्यांचा लाइट आणि साउंड देखभाल दुरुस्तीशी काडीचाही संबंध नसल्याचे समोर आले आहे.माहिती अधिकार कार्यकर्ते रूपेश केसेकर यांनी हा प्रकार उघडकीस आणला असून, त्याबाबत विद्युत विभागाकडे तक्रारही करण्यात आली आहे. मात्र, मागील सहा महिन्यांपासून या तक्रारींवर प्रशासनाने दखल घेतली नसल्याने २०१८ ते २०२३ पर्यंत देण्यात आलेल्या कामांची चौकशी करून तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी केसेकर यांनी आयुक्तांकडे केली आहे.

नाट्यगृहांमध्ये असा प्रकार होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर केसेकर यांनी महापालिकेच्या विद्युत विभागाकडे माहिती अधिकाराअंतर्गत माहिती मागविली. सुरुवातीला त्यांना त्यासाठी नकार देण्यात आला.त्यानंतर केसेकर यांनी माहिती घेत ठेकेदारांना काम दिल्यानंतर त्यांच्याकडील कामगारांची नोंदणी पालिकेच्या कंत्राटी कामगारांच्यासाठीच्या संकेतस्थळावर शोधली, तसेच विद्युत विभागाच्या माहितीशी खातरजमा करून या कामगारांचे मोबाइल क्रमांक मिळवून त्यांच्याशी संपर्क साधला.

**आयुक्तांनी तत्काळ चौकशी करण्याची मागणी**

- अनेकांनी आपण रिक्षाचालक, बिगारी, पथारी व्यावसायिक, तसेच बेरोजगार असल्याचे सांगत नाट्यगृहात कधीही काम केलेले नसल्याचे, तसेच लाइट आणि साउंडच्या देखभाल दुरुस्तीबाबत आपला दुरान्वयेही संबंध नसल्याचे सांगितले. त्यानंतर केसेकर यांनी विद्युत विभागाकडे तक्रार केली असता, त्यांच्यावर तत्कालीन विभागप्रमुखांकडून दबाव टाकण्यात आला. माहिती अधिकार कार्यकर्ते केसेकर यांनी २०१८ ते २०२३ या पाच वर्षांची माहिती मागविली होती. ती अद्यापही त्यांना पूर्णपणे देण्यात आलेली नाही. मात्र, २०२१-२२ मधील जवळपास सर्व माहिती असल्याने त्यांनी त्याची प्रत्यक्ष खातरजमा केली.त्यात अनेक कर्मचारी बोगस दाखवून त्यांचे वेतन ठेकेदारांनीच लाटल्याचे समोर आले आहे. त्यामुळे आयुक्तांनी पाचही वर्षांची तत्काळ चौकशी करावी, अशी मागणी केसेकर यांनी केली आहे.

### अंतरिक ऊर्जा वाढवून जीवन संतुलित करा : डॉ. प्रचिती पुंडे



**पुणे :** "अनेक समस्यांपासून स्वतःला मुक्ती मिळवायची असेल तर शरीराव्यतिरिक्त स्वतःला आजच्या आधुनिक जगात ग्लॅमोवेल पद्धतीमध्ये सहज आणि कमी वेळात वर्क लाइफ बॅलन्स करायल शिका. चिंतन करून स्वतःचे गुण लक्षात घेऊन क्षणिक आवेग, आकांक्षा आणि नकारात्मक विचारांच्या प्रवाहांना नियंत्रित करून योग्य दिशा दिली जाऊ शकते. त्यातुनच शारीरिक व मानसिक स्वास्थ्य उपलब्ध होते,' असे विचार प्रोलक्स प्रोडक्शनच्या संस्थापक संचालिका आणि मिसेस युनिव्हर्स टॉलरन्स डॉ.प्रचिती पुंडे यांनी व्यक्त केले.

प्रोलक्स ग्लॅमोवेलच्या वतीने 'प्रोलक्स गाला: द ग्लॅमोवेल एक्स्ट्रावागांझा' या कार्यक्रमाच्या माध्यमातून पुणे शहरात ८ ते ११ ऑगस्ट या काळात विविध ठिकाणी रॅली काढण्यात आली. आपल्या व्यस्त जीवनात ग्लॅमर आणि आरोग्य यांच्यातील समतोल राखण्याच्या महत्त्वाबद्दल जागरूकता निर्माण करण्याच्या मुख्य उद्देश्य ठेऊन या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

ही रॅली प्रोलेक्स आणि ग्लॅमोवेलचे बाणेर येथील मुख्यालयातून शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी ४ दिवस काढण्यात आली. डॉ.प्रचिती पुंडे यांच्या नेतृत्वात निघालेल्या रॅलीत शेकडो नागरिकांनी उत्फूर्तपणे सहभाग दर्शविला. एनसीसी हेड क्वॉटर, टाईम्स ॲण्ड ट्रेड आणि डेक्कन येथील श्री महावीर जैन विद्यालय येथील विद्यार्थी, कर्मचारी व डॉ.प्रचिती पुंडे यांनी ३ ते ३० सेकंदापेक्षा कमी वेळेत जीवन सहजरित्या कसे करावे या संदर्भात छोट्या छोट्या टीप्स देण्यात आल्या.

### सीमेवरील सैनिकांसाठी धायरीतून साडे पाच हजार राख्या रवाना

**धायरी :** डीएसके विश्व रहिवासी आणि योगेश जोशी मित्र परिवार, प्रवर्तन फाउंडेशन आणि रावसाहेब कट्टा यांच्यातर्फे सीमेवर देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिक बांधवांसाठी साडे पाच हजार राख्या पाठविण्यात आल्या आहेत. सीमेवर राहून देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी राखी पौर्णिमेच्या निमित्ताने योगेश जोशी मित्र परिवारातर्फे हा उपक्रम राबविला जात आहे. यामध्ये शालेय विद्यार्थी, मूकबधिर विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या राख्या, आदिवासी बांधवांनी बांबूपासून तयार केलेल्या राख्यांचाही समावेश आहे. काश्मीरमधील कुपवाडा, मच्छल, तिथवाल, पूँछ येथे मराठा आणि जाट बटालियनमधील सैनिकांसाठी सुमारे साडेपाच हजार राख्या पाठविण्यात आल्या असून, राखी पौर्णिमेच्या पूर्वी त्या तेथे पोचणार आहेत.

### मंत्री हसन मुश्रीफांच्या नावाचा गैरवापर

## निवृत्त शिक्षिकेकडून उकळले २० लाख

**हडपसर :** निवृत्त वृद्ध शिक्षिकेला पोलिस उपायुक्ताच्या नावाने कॉल करून माजी मंत्री हसन मुश्रीफ यांच्यासाठी मनीलाँड्रींग केले आहे, असे सांगून तुमच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून तुम्हाला अटक करावी लागेल. असे म्हणत २० लाख उकळल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी तोतया पोलिस उपायुक्त नरेंद्र गुप्ता याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी उषा मुरलीधर व्यास (वय ७१, रा. प्राईम रेसीडेन्सी, विठ्ठलनगर, हडपसर) यांनी याबाबत पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

हसन मुश्रीफ आमच्या ताब्यात असून तुमच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. त्यात तुम्हाला अटक करावी लागेल, अटक झाल्यावर तुम्हाला मुंबई येथे ठेवण्यात येईल. तुमची पेन्शन बंद करण्यात येईल, असे खोटे सांगून गुन्हा दाखल करण्यात आल्याची पीडीएफ पाठवली. त्याच्या बोलण्यामुळे व्यास ह्या घाबरल्या. त्याने तुम्हाला यातून जामीन मिळू शकत नाही. त्यासाठी तुम्हाला तुमच्या खात्यात जेवढे पैसे असतील ते आमच्या खात्यात पाठवले लागतील, असे सांगून फसविण्यात आले.

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या

## पदवी प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन अर्ज सुरु

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत नुकताच १२४ वा पदवीप्रदान समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्यानंतर विद्यापीठाचा १२५ वा पदवी प्रदान समारंभ नोव्हेंबर/डिसेंबर, २०२४ मध्ये होणे अपेक्षित आहे. या पदवी प्रदान समारंभासाठी ऑनलाईन अर्जप्रक्रिया ०७ ऑगस्ट, २०२४ पासून सुरु करण्यात येत असून पदवी प्राप्त करु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी पदवी, पदविका प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन अर्ज करावा, असे आवाहन विद्यापीठाच्या परीक्षा प्रमाणपत्र विभागातर्फे करण्यात येत आहे.

फक्त एप्रिल/ मे, २०२४ मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना convocation.unipune.ac.in विद्यापीठाच्या या संकेतस्थळावर दिलेल्या नमुन्यात ऑनलाईन पद्धतीने अर्ज करता येणार आहे. विद्यार्थी ०७ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट या कालावधीत विनाविलंब शुल्कासह अर्ज करू शकतात. तर त्यांना १ सप्टेंबर ते १८ सप्टेंबर २०२४ पर्यंत विलंब शुल्कासह अर्ज करता येणार आहे. एप्रिल/ मे, २०२४ मध्ये उत्तीर्ण झालेले विद्यार्थी पदवी प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन अर्ज करण्यास पात्र आहे. अर्जाचा नमुना, शुल्क आदीबाबत सविस्तर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दिली आहे. पदवी किंवा पदविका प्रमाणपत्र मिळविण्याकरिता विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज योग्य शुल्कासह भरल्यानंतर अंतिम वर्षाच्या गुणपत्रिकेची छायांकित प्रत अपलोड करणे आवश्यक आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या परीक्षा प्रमाणपत्र विभागाकडून देण्यात आली आहे.

### कायदेशीर कारवाईचा १३ वे वंशज रणधीर जेधे यांचा इशारा

## कान्होजी जेधेंच्या वंशजांवरून दिशाभूल

**पुणे :** राजश्री कान्होजी नाईक जेधे यांच्याशी कोणतेही रक्ताचे नाते नसताना केवळ स्वतःच्या स्वार्थासाठी आपण त्यांचे वंशज असल्याचा खोटा दावा दौंड, पारगाव येथील दिग्विजय जेधे, सर्जेराव जेधे आदी मंडळींकडून सुरू आहे. प्रत्यक्षात त्यांचा कान्होजी जेधे यांच्या घराण्याशी कोणताही संबंध नसून, ही शुद्ध फसवणूक व समाजाची दिशाभूल आहे. कान्होजी जेधे यांच्या नावाचा असा वापर करणे, लोकांमध्ये गैरसमज पसरवणे व कोणतेही पुरावे नसताना खोटा इतिहास कथन करणे, हे सर्वथा निषेधार्ह आहे. त्यामुळे याबाबत आपण संबंधितांना लवकरात लवकर कायदेशीर नोटीस पाठविणार असल्याचा इशारा कान्होजी जेधे यांचे थेट १३ वे वंशज रणधीर बाळासाहेब जेधे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिला.



याबाबत बोलताना जेधे म्हणाले, कान्होजे जेधे यांचे वंशज असल्याचे भासवून गैरसमज पसरविण्याचे प्रयत्न दिग्विजय जेधे व सर्जेराव जेधे आदी मंडळींकडून सुरू आहेत. मात्र, जेधेंच्या नावाचा वापर करून आपला स्वार्थ साधण्याचा त्यांचा हेतू दिसतो. चुकीची माहिती देऊन



लोकांची दिशाभूल करण्याचा व जनमानसावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न ते करीत आहेत. मुळात ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये वा साधनांमध्ये कुठेही त्यांच्यासंदर्भात नोंद नाही किंवा तसा कोणताही पुरावा आढळत नाही. असलेच तर केवळ नामसाधर्म्य (आडनाव) आहे.

## आम आदमी पार्टी खेड आळंदीमधून मैदानात

# जनतेतला आमदार करण्याचा निर्धार !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**महाळुंगे :** आगामी विधानसभा निवडणूक आम आदमी पार्टी महाराष्ट्रात पूर्ण ताकदीने लढणार आहे. यासाठी राज्यातील २८८ मतदारसंघाबाबत दिल्लीत वरिष्ठ पातळीवर बोलणी सुरू झाली आहेत. राज्यात पक्षानेही जोरदार तयारी सुरू केली आहे. यात खेड-आळंदी मतदारसंघात गेल्या चार वर्षापासून आम्ही कंबर कसली असून तयारीत आहोत. आता 'इंडिया आघाडी'सोबत निवडणूक लढायची की स्वबळावर लढायची, यासंदर्भातील निर्णय वरिष्ठ पातळीवर घेतला जाईल, परंतु आम्ही सध्या संपूर्ण मतदारसंघावर लक्ष केंद्रीत केलं आहे, अशी जाहीर भूमिका आम आदमी पार्टीचे युवक प्रदेशाध्यक्ष मयूर दौंडकर यांनी व्यक्त केली आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजगुरूनगर येथे पत्रकार परिषद पार पडली त्यावेळी ते बोलत होते.

ते म्हणाले की, सध्या खेड-आळंदी विधानसभा मतदारसंघात शेतकऱ्यांचे प्रश्न, पाण्याचा प्रश्न, एमआयडीसीचा प्रश्न, वाहतूक कोंडीचा प्रश्न, तसेच औद्योगिक वसाहतीमधील कामगारांची




होणारी परवड, हे सर्वसामान्यांचे प्रश्न घेऊन आम्ही मैदानात उतरणार आहोत. यासाठी गेल्या चार वर्षापासून आम्ही मतदारसंघात तयारी सुरू केली आहे.

त्याचसोबत 'वारी खेड-आळंदी'ची या उपक्रमाच्या माध्यमातून संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढला आहे. यातच लोकांच्या अडीअडचणी समजून घेतल्या आहेत. त्याच मुद्यांवर आम्ही निवडणूक लढवणार आहोत. आगामी विधानसभा निवडणूक ही फक्त विकासाच्या मुद्यांवर लढणार आहोत. तालुक्याच्या विकासावर बोलणार आहोत. यात कुणावरही टीका-टिप्पणी करणार नाही. असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. सध्याच्या राजकीय वातावरणावर बोलतांना ते म्हणाले की, राज्यांमध्ये सध्या महायुतीसाठी पोषक वातावरण दिसत नाही, गेल्या लोकसभा निवडणुकीत मतदारांनी आपला रोष मतदानरूपाने व्यक्त केला आहे. कॉंग्रेस प्रणीत इंडिया आघाडीशी आमची आघाडी झाली किंवा झाली नाही तरी मतदारांचा कल आम आदमी पार्टीच्या उमेदवारांकडे असेल, असे सध्या चित्र आहे. सर्वठिकाणी जो भ्रष्टाचार बोकाळला आहे, त्यावर तोगडा म्हणजे आम आदमी पार्टी आहे, हे जनतेच्या लक्षात आले असून दिल्ली पाठोपाठ पंजाबमध्येही जनतेने आमच्याकडे सत्ता सोपविली आहे, हा इतिहास अगदी ताजा आहे. महाराष्ट्रातील सूज्ञ जनताही याचेच अनुकरण करेल, असे आम्हाला वाटते. दरम्यान, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी देखील अलीकडेच तीन दिवसीय दिल्ली दौरा केला. यात त्यांनी कॉंग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे, तसेच नेते खासदार राहुल गांधी यांच्याशी चर्चा केली. त्याचबरोबर उद्धव ठाकरे यांनी आम आदमी पार्टीच्या नेत्यांशीही चर्चा केली आहे. त्यामुळे राज्यात आम आदमी पार्टी स्वतंत्र लढणार की आघाडीत लढणार ? याचे उत्तर लवकरच मिळणार आहे.

## पुरंदर रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी बारवकर, सचिवपदी ॲड.जगताप



**सासवड :** पुरंदर तालुका रोटरी क्लब सन २०२४ - २०२५ च्या अध्यक्षपदी सासवड येथील सामाजिक कार्यकर्ते व विमा क्षेत्रातील सुप्रसिद्ध अभिजीत बारवकर तर सचिवपदी सासवड येथील प्रसिद्ध विधीज्ञ ॲड आनंद जगताप यांची निवड झाली आहे. सासवड - दिवे येथे हॉटेल वैभव येथे मंगळवारी ( दि १३ ) रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक ३१३१ सन २०२४ - २५ चे सहायक प्रांतपाल पुष्कराज मुळे, हॅपी स्कूल चे डिस्ट्रिक डायरेक्ट अनंत तिकोणे यांच्या हस्ते आणि पुरंदर हवेलीचे आमदार रोटरीयन संजय जगताप, जिमाचे अध्यक्ष डॉ रामदास कुटे यांच्या उपस्थतीत हा पदग्रहण समारंभ संपन्न झाला.

यावेळी माजी अध्यक्ष व संचालक रोटरीयन अनिल उरवणे, डॉ प्रविण जगताप, ॲड युवराज वारघडे, डॉ सुमित काकडे, गुलाबराव गायकवाड, संचालक कृष्णा शेट्टी, डॉ विनायक बांदेकर, सुनीलकाका जगताप, डॉ अश्विनी जगताप, भारती गायकवाड, डॉ उमाकांत ढवळे, जीवन कड, पुनम बारवकर, प्रमोद धनावडे, विश्वनाथ गायकवाड, तुषार जगताप आदी संचालक उस्थित होते. यावर्षी मोठ्या कामांचा संकल्प करून ते पुर्ण करण्यासाठी जिद्दीने प्रयत्न करा असे सांगत पुष्कराज मुळे यांनी येथीर प्रत्येक पैसा सामाजिक कामासाठी आणि लाभार्थीपर्यंत वापरला जातो. ग्रामीण भागातही रोटरीच्या विविध उपक्रमांतून कामे सुरू असून रोटरीच्या अनेक उपक्रमांमार्फत यापुढेही ही कामे अधिक चांगल्या प्रकारे करण्याकडे लक्ष देणे गरजेचे असल्याचे यावेळी सांगितले.

» Selected




## बांगलादेशातील हिंदूंवरील हल्ल्याचा बारामतीत निषेध

**बारामती :** बांगलादेशात हिंदू अल्पसंख्याकांवर कट्टरतावाद्यांकडून केल्या जाणाऱ्या अन्याय अत्याचाराचा सकल हिंदू समाजाच्या वतीने बारामती येथे मंगळवारी (दि. १३) निषेध करण्यात आला. याबाबत सकल हिंदू समाज बारामती यांच्या वतीने तहसीलदार गणेश शिंदे यांना निवेदन देण्यात आले. तत्पूर्वी, येथील भिगवण चौकामध्ये निषेध नोंदविण्यात आला. बांगलादेशात अराजकता निर्माण झाली असून, तेथे दंगली घडत आहेत. त्यात अल्पसंख्याक हिंदू बांधवांची दुकाने लुटली गेली, घरे जाळली गेली. मंदिरे तोडण्यात आली. हिंदू महिलांवर अत्याचार केले गेले. विद्यार्थ्यांनाही या अन्यायाला सामोरे जावे लागले. तेथील धर्मांध लोक अल्पसंख्याक हिंदूंना बळजबरीने धर्मांतर करण्यासाठी प्रवृत्त करीत आहेत. या अत्याचाराचा या वेळी निषेध करण्यात आला. सरकारने बांगलादेशातील अल्पसंख्याक हिंदूंना भारतीय नागरिकत्व देऊन त्यांना भारतात सामावून घ्यावे, अशी मागणी करण्यात आली. सुनील शिंदे, सागर चिंचकर, विकास देवकाते, संभाजी माने, मंगेश मासाळ, गणेश जाधव, अक्षय देवकाते, विकी आगम, दिलीप शिंदे, राजेश बाचल आदींनी हे निवेदन दिले.

# अहिल्यादेवी होळकर पुण्यतिथी निमित्त नारदीय कीर्तन संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** समरसता गती विधी व लायन्स क्लब सहकार नगर वतीन राजमाता अहिल्यादेवी होळकर पुण्यतिथी निमित्ताने चंद्रशेखरबुवा ब्रम्हे यांनी नारदीय कीर्तन जिजामाता हायस्कूल व गुरुकुल विद्यालय जेजुरी येथे केले .

कीर्तनकार चंद्रशेखर ब्रह्मे यांनी विद्यार्थ्यांना आपली संस्कृती अणि विशेषत: नारदीय कीर्तनाचि माहिती दिली. अहिल्यादेवी यांच्या माहेरचा चौडी येथील शिंदे घराण्याचा वारसा पाहून बाजीराव पेशवे यानी शनिवारवाड्या समोर मल्हार राव होळकर यांच्या मुलाबरोबर त्यांचे लग्न लावले. पतीचे निधन झाल्यानंतर सती न जाता मल्हार राव यांच्या विनंतीवरून राज्य कारभार केला. काशी सह बारा ज्योतिर्लिंग, जेजुरी पंढरपुर, नाशिक अश्या अनेक तीर्थक्षेत्र विकास केला. न्यायदान करताना अतिशय परखड निर्णय घेत असत. महिलांची सैन्याची पलटण उभी केली. राघोबादादा यांनी इंदोरवर चाल करून आल्यावर एका महिलेच्या हातून पराभव होईल व जगात नाचक्की होईल असे सुनावले. सात बारा सारखे शेतीच्या नोंदीची पद्धत सुरु केली, स्वताच्या मुलीचे लग्न पेंढारी लुटारू यांचा बंदोबस्त करणाऱ्या बरोबर लावून समरसता जपली असे त्यांनी सांगितले.

आयोजक डॉ प्रसाद खंडागळे यांनी न्यायदान करताना स्वताच्या मुलाला सुध्दा अहिल्यादेवी यानी जेजुरी येथे हत्तीच्या पाया खाली दिले याची माहिती दिली. जेजुरीच्या खंडोबा देवाच्या षडरात्रात अहिल्यादेवी बरेच वर्षे या ठिकाणी राहिल्या या मातीला एका पुण्यवान मातेचा स्पर्श झालेला आहे असे डॉ खंडागळे यांनी सांगितले.

यावेळी प्राचार्य नंदकुमार सागर सामाजीक कार्यकर्ते कुंडलिक भोसले, गणेश जगताप व मोठ्या संख्येनं विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी सामाजीक आरती करून, अहिल्यादेवीचा जयजयकार करून कार्यक्रमाची सांगता झाली.

## किर्तन

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



» **जेजुरी :** समरसता गती विधी व लायन्स क्लब सहकार नगर वतीन राजमाता अहिल्यादेवी होळकर पुण्यतिथी निमित्ताने चंद्रशेखरबुवा ब्रम्हे यांनी नारदीय कीर्तन जिजामाता हायस्कूल व गुरुकुल विद्यालय जेजुरी येथे केले .

## शेवाळे यांच्याकडून २५ शाळांना संगणक भेट



**कारेगांव:** - कारेगाव, ता.शिरुर येथील रहिवाशी तथा जनता दल विद्यार्थी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष ॲड.संग्राम नाथाभाऊ शेवाळे यांच्या वतीने शिरुर तालुक्यातील २५ शाळांना संगणक भेट देण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात ग्रामिण भागातील विद्यार्थांना या संगणकाचा नक्कीच उपयोग होईल, यासाठी आपण संगणक दिले असल्याचे असे ॲड शेवाळे यांनी सांगितले. शेवाळे यांनी मागील महिन्यात शिक्षण संवाद यात्रा या कार्यक्रमाचा आयोजन केले होते. या शिक्षण संवाद यात्रेमध्ये त्यांनी शिरूर तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले,तसेच ज्या विद्यालयांमध्ये संगणक कमी प्रमाणात किंवा उपलब्ध नाही अशा शाळांना आपण संगणक देऊ असे आश्वासन दिले होते.याचधर्तीवरशेवाळेयांनीनिमगावभोगी,ढोकसांगवी,वाघाळे,पिंपरी दुमाला,शिरुर यांसह २५ शाळांना हे संगणक भेट दिले. यावेळी जनता दल सेक्युलरचे प्रदेशाध्यक्ष नाथा शेवाळे, माजी उपसरपंच सयाजी नवले,युवा उद्योजक समाधान सरोदे, शुभम शेवाळे आदि उपस्थित होते.

## कॉँग्रेसच्या जिल्हा ओबीसी सेलच्या उपाध्यक्षपदी टिळेकर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** पुणे जिल्हा ओबीसी सेलच्या अध्यक्षपदी सासवड येथील सामाजिक कार्यकर्ते संजय टिळेकर यांची निवड करण्यात आली असून जिल्हा कॉँग्रेसचे अध्यक्ष व पुरंदर हवेलीचे आमदार संजय जगताप यांच्या हस्ते त्यांना निवडीचे पत्र देऊन सत्कार करण्यात आला.

सासवड येथील पुरंदर कॉँग्रेस कमिटीत मंगळवारी ( दि १३) पुणे जिल्हा तसेच पुरंदर व दौंड तालुक्याच्या ओबीसी सेलच्या पदाधिकाऱ्यांना निवडीची पत्र देण्यात आली.
यावेळी बारामती लोकसभा मतदारसंघाच्या ओबीसी सेलच्या उपाध्यक्षपदी सागर जगताप तसेच सासवड शहर ओबीसी सेलच्या अध्यक्षपदी नितीन राऊत, सरचिटणीस पदी अमित कुंभार, दौंड तालुका ओबीसी सेलच्या अध्यक्षपदी पोपट लकडे, पुरंदर तालुका ओबीसी सेलच्या उपाध्यक्षपदी विनोद चौरे यांना निवडीची पत्र देऊन आ संजय जगताप यांनी सत्कार केला.

याप्रसंगी कॉँग्रेसच्या महिलाध्यक्षा सुनिता कोलते, युवक अध्यक्ष चेतन महाजन, माजी उपनगराध्यक्ष विजय वढणे, सुहास लांडगे, संतोष खोपडे, सागर जगताप, तुषार जगताप, आप्पा भांडवलकर, मोबीन बागवान, संदीप राऊत, नितीन भोंगळे यांसह कॉँग्रेसच्या विविध विभागांचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## सणसवाडीत मेव्हण्यांनी पाडला दाजीचा दात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** सणसवाडी ता. शिरुर येथे पत्नीला भेटण्यासाठी सासरी जाणाऱ्या इसमाच्या तिघा मेव्हण्यांनी इसमाला बेदम मारहाण करत सख्ख्या दाजीचा दात पाडल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे राधे डीपीशन काळे, गुट्टन डीपीशन काळे, बहाद्दूर डीपीशन काळे या तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सणसवाडी ता. शिरुर येथील अरेश भोसले याची पत्नी विश्रांतवाडी येथे माहेरी गेलेली असल्याने अरेश त्याच्या पत्नीला भेटण्यासाठी सासरी गेलेला होता, त्यांनतर अरेश घरी असताना त्याचे तिघे मेव्हणे अरेशकडे आले त्यांनी अरेशला त्य आमच्या घरी कशाला येतो असे म्हणून शिवीगाळ, दमदाटी करत लाकडी दांडके, लोखंडी गजाने बेदम मारहाण करत जखमी केले.

## बारामतीचे जळोची उपबाजारात डाळींबास २०० रूपये दर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** येथील बारामती कृषि उत्पन्न बाजार समितीचे जळोची उपबाजार येथील फळे व भाजी मार्केट मध्ये डाळींबाची २०० क्रेटची आवक होऊन प्रति किलोस रू. २००/- असा उच्चांकी दर मिळाला तर प्रति क्रेटस् १८०० ते ४००० रूपये दर मिळाला. डाळींबास प्रति किलोस किमाल दर रू. ९०/- व सरासरी दर रू. १५०/-प्रति किलो दर निघाले. संजय गदादे यांचे आडतीवर पणदरे येथील डाळींब उत्पादक शेतकरी माधवराव कोकरे यांचे डाळींबास २०० रूपये प्रति किलो दर मिळाला.
आवारात चव्हाण, जळोची मार्केट मध्ये बारामतीसह इंदापुर, दौंड, फलटण, कर्जत, श्रीगोंदा या तालुक्यातु आवक होत आहे.
आठवड्यातुन साधारण ९०० ते १००० क्रेटस् ची डाळींब आवक होत आहे. डाळींब



खरेदीसाठी बारामती तालुक्यासह बिहार,कानपुर व दिल्ली येथील खरेदीदार येत असुन सदर डाळींब किरकोळ विक्रीसाठी तसेच बिहार,कानपुर, दिल्ली इत्यादी ठिकाणी पाठविले जात आहे. त्यामुळे मागणी वाढत असल्याने शेतकऱ्यांना डाळींबास चांगला दर मिळत आहेत अशी माहिती सचिव अरविंद जगताप यांनी दिली. डाळींब उत्पादक शेतकऱ्यांनी आपला माल ग्रेडींग व सॉर्टींग करून आणावा म्हणजे आणखी जादा दर मिळेल. स्थानिक बाजारपेठेत किरकोळ विक्रीसाठी आणि बाहेरील राज्यात मागणी असल्याने आणखी दर वाढतील असे अपेक्षित आहे.

## पाबळचे ज्वेलर्स दुकान फोडण्याचा प्रयत्न करणारा जेरबंद

**शिक्रापूर :** पाबळ ता. शिरुर येथील गोकर्ण ज्वेलर्स हे सोनाराचे दुकान ५ ऑगस्ट रोजी चोरट्यांनी फोडण्याचा प्रयत्न केला मात्र सायरन वाजल्याने चौघे चोरटे पळून गेलेले असताना या टोळीच्या मोरक्याला बेड्या ठोकण्यास शिक्रापूर पोलिसांना यश आले असून अमर रामकुमार राठोड असे पोलिसांनी जेरबंद केलेल्या सराईताचे नाव आहे. पाबळ ता. शिरुर येथील गोकर्ण ज्वेलर्स हे सोन्याचे दुकान ५ ऑगस्ट रोजी पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास चोरट्यांनी फोडण्याचा प्रयत्न केला मात्र अचानक सायरन वाजण्याचे चौघे चोरटे त्यांच्या जवळील साहित्य सोडून फरार झाल्याने चोरट्यांचा चोरीचा डाव फसला होता, तर याबाबत गोविंद भाऊसाहेब काळे वय ५६ वर्षे रा. कासार गल्ली पाबळ ता. शिरुर जि. पुणे मूळ रा. पिंपरी जलसेल ता. पारनेर जि. अहमदनगर यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलीसांनी अज्ञात चार चोरट्यांवर गुन्हा दाखल केला होता, सदर गुन्ह्याचा तपास करत असताना या चोरट्यांची माहिती पोलीस उपनिरीक्षक महेश डोंगरे यांना मिळाली, त्यांनतर सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र पानसरे, पोलीस हवालदार श्रीमंत होनमाने, अमोल दांडगे, शिवाजी चितारे, विकास पाटील, रोहिदास पारखे, जयराज देवकर यांनी चाकण परिसरात जाऊन या गुन्ह्यातील मुख्य मोरक्या अमर राठोड याला ताब्यात घेत चौकशी केली आसरा त्याने त्याच्या तीन साथीदारांच्या मदतीने चोरी केल्याचे कबुल केले, दरम्यान पोलिसांनी अमर रामकुमार राठोड वय २६ वर्षे रा. काळूस चाकण ता. खेड जि. पुणे याला अटक केली आहे.

POSITIVE NEWS!

भवानी नगर

नागरी सत्कार



## बहुजन समाजाने माहायुतीच्या मागे रहावे : आमदार अमित गोरखे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भवानी नगर :** भवानीनगर आपल्या समाजाला विधान परिषदेवर महाराष्ट्रात पहिल्यांदा संधी मिळाली आहे येणार सरकार हे महायुतीचेच येणार आहे त्यामुळे बहुजन समाजाने माहायुतीच्या मागे राहण्याची गरज आहे असे मत आमदार अमित गोरखे यांनी व्यक्त केले

विधान परिषदेवर निवडून आल्याबद्दल बारामती इंदापूर तालुका मातंग एकता आंदोलन संघटना व श्री छत्रपती कारखान्याच्या वतीने आमदार अमित गोरखे यांचा भवानीनगरमध्ये सत्कार करण्यात आला तत्पूर्वी कारखाना कार्यस्थळावरील सर्व महापुरुषांच्या पुतळ्यांना आमदार गोरखे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले श्री छत्रपती कारखान्याचे कामगार नेते युवराज रणवरे शेतकरी संघटनेचे पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष पांडुरंग रायते बापूराव सोलंकर माजी संचालक सतीश गावडे सुहास निंबाळकर संजय मुळीक मातंग एकता आंदोलन संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजू मांढरे उपाध्यक्ष शिवाजी सोनवणे दिलीप सोनवणे पंढरीनाथ सोनवणे विकी गायकवाड उद्धव सोनवणे शंकर सोनवणे अशोक सोनवणे व ग्रामस्थ उपस्थित होते.

गोरखे म्हणाले उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून देखील आपल्याला बहुजन समाजाचे प्रश्न सोडवण्यास मदत होणार आहे अण्णाभाऊंचे स्मारक लहुजी वस्ताद यांचे स्मारक लंडन मधील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक या सर्व गोष्टी महायुतीच्या काळातच झालेल्या आहेत समाज बांधव म्हणून मला कधीही आवाज द्या तुमचे कुठलेही प्रश्न असतील ते सोडवण्यासाठी तुमच्या घरातला आमदार म्हणून मी तुमच्या बरोबर सदैव तत्पर राहील महायुती सरकारने आपल्या बहुजन समाजाकडे लक्ष दिलेले आहे अजित पवार यांचे व माझे चांगले संबंध आहेत त्यामुळे समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी मदत होणार आहे आरटीची घोषणा देखील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजित पवार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या काळात झालेली आहे सगळ्या गोष्टी माहायुती सरकारच्या काळातच घडलेल्या आहेत.

## १३२ टक्के क्षेत्रावर पेरणी पूर्ण

# सरासरी तीन लाख ३६ हजार ८२२ हेक्टरने वाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सरासरीच्या तुलनेत पेरणीच्या क्षेत्रात तीन लाख ३६ हजार ८२२ हेक्टरने वाढ झाली आहे, चालू वर्षी वेळेवर झालेल्या पावसामुळे खरिपाच्या क्षेत्रात चांगलीच वाढ झाली आहे. पुणे विभागात सुमारे सरासरीच्या १० लाख ६५ हजार ४८ हेक्टरपैकी १४ लाख १ हजार ८७० हेक्टर म्हणजेच १३२ टक्के क्षेत्रावर पेरणी झाली आहे. अशी माहिती कृषी विभागाच्या सूत्रांनी दिली.

गेल्या वर्षी कमी झालेल्या पावसामुळे पिकांचे काही प्रमाणात नुकसान झाले होते. रब्बी हंगामही काहीसा अडचणीचा गेला होता. त्यातच हवामान विभागाने १०६ टक्के पावसाचा अंदाज वर्तविल्यानंतर शेतकऱ्यांच्या अपेक्षा उंचावल्या होत्या. खरिपात अनेक शेतकऱ्यांनी पिकांच्या पेरणीवर भर दिला आहे.

तसेच यंदा वेळेवर सात जून रोजी दाखल झालेल्या मॉन्सून दाखल झाल्यामुळे तूर, मूग, उडीद, कापूस, बाजरी या पिकांच्या पेरण्या वेळेवर केल्या गेल्या. यामध्ये भात, ज्वारी, बाजरी, मका, तूर, उडीद, सोयाबीन, कापूस या पिकांच्या क्षेत्रात चांगलीच वाढ झाली आहे. विशेषतः सोयाबीन पिकांच्या क्षेत्रात तब्बल दुपटीने वाढ झाली असून सुमारे तीन लाख ५८ हजार २७५ हेक्टरवर पेरणी झाली आहे.

सध्या नगरमधील अकोले व पुणे जिल्ह्यातील पश्चिमेकडील तालुक्यात भात पिके वाढीच्या



अवस्थेत असून, पीक परिस्थिती समाधानकारक आहे.

बाजरी पीक वाढीच्या अवस्थेत आहे. मका पीक कणसामध्ये दाणे भरण्याच्या अवस्थेत असून काही ठिकाणी मका पिकांवर लष्करी अळीचा प्रादुर्भाव झाला आहे. मूग पीक काढणीस आले आहे. काही ठिकाणी पिकांवर मोठ्या प्रमाणात विषाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने उत्पन्नात घट येण्याची शक्यता आहे. उडीद पीक पक्वतेच्याअवस्थेत आहे. तूर पीक फुटवा येण्यासाठी शेंडे खुडण्याचे काम चालू आहे. सोयाबीन पीक शेंगा लागण्याच्या अवस्थेत असून काही प्रमाणात उंट अळी तसेच चक्री भुंग्याचा प्रादुर्भाव दिसून आला आहे. कापूस पीक फुले ते बोंड लागण्याच्या अवस्थेत आहे. अनेक ठिकाणी पिकांवर मावा तुडतुड्याचा प्रादुर्भाव दिसून आला आहे.

## २४ इच्छुकांचे अर्ज प्राप्त

# काँग्रेसची विधानसभा निवडणूकीच्या तयारीस सुरुवात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे** : आगामी विधानसभा निवडणुका महाविकास आघाडी एकत्रित सामोरे जाणार असल्याचं वारंवार आघाडीतील तिन्ही पक्षातील वरिष्ठ नेते सांगत आहेत. मात्र असं असलं तरी काँग्रेसने राज्यातील २८८ जागांवर निवडणुकीची तयारी करण्यास सुरुवात केली आहे.

काँग्रेसकडून देखील महाराष्ट्रातील २८८ जागांवर पक्षाकडून निवडणूक लढण्यास इच्छुक असलेल्यांना अर्ज करण्यास सांगितले होते. पुण्यातील आठ विधानसभा मतदार संघामध्ये काँग्रेसकडून निवडणूक लढण्यास इच्छुक असणाऱ्यांना पाच ऑगस्टपर्यंत अर्ज करण्यास सांगण्यात आले होते. त्यानुसार नियोजित वेळात तब्बल २४ इच्छुकांचे अर्ज काँग्रेसला प्राप्त झालेला आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रात सर्वात मोठा पक्ष हा काँग्रेस ठरला. त्यामुळे काँग्रेस पक्षाच्या महत्त्वकांक्षा बळवल्या आहेत. जागा वाटपामध्ये अपेक्षित अशा जागा काँग्रेसला न सुटल्यास आणि ऐनवेळी 'एकला चलो' ची भूमिका घ्यावी लागल्यास सर्व विधानसभा मतदारसंघांमध्ये आपली तयारी असावी या दृष्टिकोनातून सर्व विधानसभा मतदारसंघात काँग्रेसकडून चाचपणी करण्यात येत असल्याचं राजकीय विश्लेषक सांगतात.

पुणे शहरातील आठ विधानसभा जागां पैकी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने सहा जागांवर दावा सांगितला आहे. तर शिवसेना ठाकरे गटाने देखील



सहा जागांवर महाविकास आघाडीकडून विधानसभा लढवण्याची इच्छा प्रदर्शित केली आहे. काँग्रेसने देखील शिवाजीनगर, पुणे कॅन्टोन्मेंट आणि कसबा या जागा आपल्यालाच मिळतील असं जवळपास निश्चित मानले आहे.त्या व्यतिरिक्त एखाद दोन जागा मिळवण्यासाठी काँग्रेस प्रयत्नशील असणार आहे. लोकसभा निवडणुकी वेळी देखील काँग्रेसकडून अशाच प्रकारे इच्छुकांचे अर्ज मागविण्यात आले होते. त्यावेळी तब्बल 20 इच्छुकांनी काँग्रेसकडून लोकसभा निवडणूक लढवण्याची इच्छा प्रदर्शित केली होती. याच अर्जातून रवींद्र धंगेकर यांची निवड करून काँग्रेसने उमेदवारी घोषित केली होती.

आता आगामी विधानसभा निवडणुकीसाठी कसबा, शिवाजीनगर ,हडपसर, पुणे कॅन्टोन्मेंट, पर्वती, वडगाव शेरी आणि कोथरूड या आठ मतदारसंघांमधून तब्बल 24 इच्छुकांच्या अर्ज काँग्रेसला प्राप्त झाले आहेत. यातूनच तीन किंवा चार काँग्रेस उमेदवार निवडले जाणार आहेत. लोकसभा निवडणुकीमध्ये काँग्रेस उमेदवार रवींद्र धंगेकर यांचा पराभव झाला असला तरी शिवाजीनगर आणि पुणे कॅन्टोन्मेंट मतदारसंघांमध्ये काँग्रेससाठी सकारात्मक चित्र दिसलं. कसबा विधानसभा मतदारसंघांमध्ये सध्या रवींद्र धंगेकर हे काँग्रेसचे पुण्यातील एकमेव आमदार आहेत. त्यामुळे काँग्रेसकडून निवडणूक लढवण्याची इच्छा प्रदर्शित केलेल्या २४ जणांना मधील बहुतांश जणांनी या तीन मतदारसंघांमध्ये निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

लोकसभा निवडणुकीच्या वेळी काँग्रेसकडून पुणे लोकसभा निवडणूक लढवण्यासाठी इच्छुकांचे अर्ज मागविण्यात आले होते. तेव्हा लोकसभेच्या एक जागेसाठी तब्बल २० अर्ज करण्यात आले होते. तेव्हा काँग्रेसने अर्ज करणाऱ्यांकडून रक्कम घेतली नव्हती.

## इचलकरंजीच्या पाणी पुरवठा योजनेचे काम प्राधान्याने करा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इचलकरंजी** : इचलकरंजी शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. या वाढत्या लोकसंख्येमुळे शहराच्या पायाभूत सुविधांवर ताण पडत आहे. इचलकरंजीकरांना दिलासा देण्यासाठी शहरासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या योजना तातडीने मार्गी लावाव्यात. तसेच इचलकरंजीकरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी शहराची पाणीपुरवठा योजना प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिले.

इचलकरंजी (जि. कोल्हापूर) शहराच्या विविध प्रश्नांसंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या



बैठकीस वैद्यकीय शिक्षणमंत्री तथा कोल्हापूरचे पालकमंत्री हसन मुश्रीफ, वस्त्रोद्योग मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार प्रकाश आवाडे, माजी आमदार आसिफ शेख रशीद शेख, नियोजन विभागाचे अप्पर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव ओ. पी गुप्ता, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असीमकुमार गुप्ता, पाणीपुरवठा विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, वस्त्रोद्योग विभागाचे सचिव विरेंद्र सिंह उपस्थित होते.

## नाना पटोलेंचा गडकरींना टोला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर** : नागपूरचा विकास आज देशात गाजतोय. सिमेंट रस्त्याची जाणीव मी २०१९ ला करून दिली होती. त्यामुळे केळीबाग असेल किंवा इतर विकासकामे आहेत ते बघता सरकारनी स्वत:चा कसा विकास केला हे बघितलं पाहिजेल. उपराजधानी नागपूर सारख्या शहरात पावसाळ्यात नाव चालते, अजून किती विकास पाहिजे? असा प्रश्न उपस्थित करत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंनी केंद्रीय मंत्री आणि भाजपचे नेते नितीन गडकरींवर जोरदार निशाणा साधलाय. ते नागपूर येथे बोलत होते.

दरवर्षी नागपूर येथे होणारे नुकसान आपण पाहिले आहे. विकासाच्या नावातून झालेला भ्रष्टाचार आज शहरांमध्येही पाहायला मिळतो आहे.

## जरांगेंच्या आंदोलनामागचा मास्टरमाईंड कोण?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर** : ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी मनोज जरांगे यांच्यावर टीका करताना गंभीर असे आरोप केले आहेत. मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामागचा मास्टरमाईंड कोण याबाबतही खळबळजनक असा दावा लक्ष्मण हाके यांनी केलाय. हाकेंनी मनोज जरांगे पाटील यांच्या शांतता रॅलीला आक्षेप घेतला आहे. अशांतता कोणी निर्माण केली? शांतता रॅलीला शाळा का बंद केल्या जातात असा सवाल लक्ष्मण हाके यांनी विचारला आहे.

कायदा सुव्यवस्था पाळू शकत नाही का सांगा? लाखो हरकती घेतल्या कुणबीवर त्याचे



काय झाले तेही सांगा? ओबीसी आरक्षणाला डोळ्यासमोर ठेवून अस्वस्थता निर्माण करणार का? असे प्रश्न लक्ष्मण हाके यांनी सरकारला विचारले आहेत. तसंच शांतता रँलीत ३०ते ३५ वेळा आम्ही क्षत्रिय आहोत, मराठ्यांची अवलाद आहोत असे म्हटले. ही वर्णवर्चस्वाची भावना आहे. यामुळे इतरांमध्ये असुरक्षितता निर्माण झालीय असल्याचंही लक्ष्मण हाके म्हणाले.

गावांमध्ये आमदार, पक्षांच्या ओबीसी सेलचे पदाधिकारी आंदोलनाला पाठिंबा देत नाहीत. जरांगेंना मात्र आमदार पाठिंबा, खर्च करून देत आहेत. ओबीसी आरक्षणाच्या विरोधातच काम सुरू मग कुठे आहे सामाजिक न्याय आहे. शरद पवार यांनी जरांगेंचं आंदोलन पेटवलं असा आरोपही लक्ष्मण हाके यांनी केला आहे.

एका आघाडीने दुसऱ्या आघाडीवर किंवा एका पक्षाने दुसऱ्या पक्षाला लोकशाहीत ठीक आहे. पण ओबीसींना पाडा हे कशात बसते. मुख्यमंत्री त्यांना तरीही रेड कार्पेट देत आहेत. असे का? आम्ही आरक्षण घेतो, आम्ही खालच्या वर्णात आहोत ही चूक आहे का? असे लक्ष्मण हाके यांनी म्हटलं.

## » Selected

### कुडाळ येथील बनावट नोटांचे कनेक्शन थेट सांगलीशी

**सिंधुदुर्ग** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ येथील बनावट नोटांचे कनेक्शन थेट सांगलीशी असल्याचे उघड झाले आहे. चलनात येणाऱ्या बनावट नोटांची छपाई सांगली- पलूस येथे कर प्रिंटर्सचा वापर करुन छापल्या जात असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी कुडाळ पोलीसांन तीन जणांना अटक केली आहे. तसेच कुडाळ पोलिसांनी सांगली-पलूस येथील संशयिताच्या घरी १ लाख ३४ हजार ७०० रुपयांच्या बनावट नोटा जप्त केल्या आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ येथे २३ नोव्हेंबर २०२३ रोजी रात्री ११.५० वाजता कुडाळ येथील बँक ऑफ इंडियाच्या शाखेत १०० रुपयांच्या ९ नोटा, २०० च्या ९ आणि ५०० ची एक नोट अशा एकूण ३ हजार २०० रुपये किमतीच्या भारतीय चलनासारख्या दिसणाऱ्या १९ बनावट चलनी नोटांचा कॅश डिपॉझिट मशिनद्वारे भरणा केला होता. याबाबत कुडाळ शाखेचे शाखाधिकारी राजेंद्र सोनकुसरे यांनी कुडाळ पोलिस ठाण्यात संशयीत व्यक्तीविरुद्ध तक्रार दाखल केली होती. या तक्रारीचा तपास करताना सापडलेल्या बनावट नोटांचे मूळ कनेक्शन सांगली-पलूस येथे असल्याचे उघड झाले आहे. या बनावट नोटांची छपाई सांगली-पलूस येथे कलर प्रिंटरचा वापर करून मुख्य संशयित आरोपी सुरेंद्र ऊर्फ सूर्या रामचंद्र ठाकूर हा पलूस गावातील याच्या घरी करत होता हे उघड झाले आहे. या गुन्ह्यात विजय शिंदे आणि निशिगंधा कुडाळकर हे दोघे सिंधुदुर्गातील कुडाळ येथील असून यांचा देखील प्रत्यक्ष सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने तिघांनाही कुडाळ पोलिसांनी अटक केली आहे.

### हाजी शेख हत्या प्रकरणात आरोपींची वाढ!

**चंद्रपूर** : कोळसा तस्करीत डॉन समजल्या जाणाऱ्या कुख्यात हाजी शेख हत्या प्रकरणात काल सकाळी सुरेंद्र यादव या आरोपीला नागपुरातून अटक करण्यात आल्याने प्रकरणातील आरोपींची संख्या सहावर पोहचली आहे. दरम्यान ६ आरोपींना ५ दिवसांची पोलीस कोठडी मिळाली आहे. कुख्यात हाजी शेख वर सोमवारी दुपारी शहरातील एका हॉटेलमध्ये जेवण करत असताना आरोपींनी गोळ्या झाडल्या. सोबतच चाकूने देखील सपासप वार केले. गंभीर अवस्थेत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या प्रकरणात पोलिसांनी सोमवारी सायंकाळपर्यंत मुख्य आरोपी समीर शेखसह राजेश मुलकलवार, प्रशांत उर्फ पशी मालवीनी, निलेश उर्फ पिंटू ढगे, श्रीकांत कदम या ५ आरोपींना अटक केली होती. त्यानंतर आणखी एक आरोपी सुरेंद्र यादव याला काल सकाळी नागपुरातून अटक करण्यात आली. त्यामुळे सध्या यातील आरोपींची संख्या सहा झाली. या सर्व आरोपींना चंद्रपूर प्रथम श्रेणी न्यायालयात पेश केले असता समीर शेखसह सर्वांना १७ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

## संजय राऊत यांचे मुख्यमंत्र्यांवर टीकास्त्र

# मुख्यमंत्री शिंदेंवर ठाकरे गटाचा हल्लाबोल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई** : आगामी विधानसभेची निवडणूक दोन महिन्यांवर येऊन ठेपली आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या राजकीय नेत्यांनी कंबर कसली असून महाराष्ट्रात अनेक नेत्यांचे दौरे सुरु आहेत. या दौऱ्यादरम्यान सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. अशातच आज शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्लाबोल केला आहे. "मुख्यमंत्री हे लोचट मजनू आहेत. दिल्लीच्या दारातील एवढे लोचट मुख्यमंत्री आजपर्यंत आम्ही पाहिले नाहीत. मात्र, ज्या दिवशी त्यांची सत्ता जाईल, त्या दिवशी दिल्ली त्यांना पायाशीही उभं करणार नाही", असा हल्लाबोल खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्यावर केला.

### तेव्हा तुम्ही सुटणार नाहीत

- "आमच्या नितीन देशमुखांना सातत्याने त्रास दिला जात आहे. हा त्रास का दिला जात आहे? तर बेहिशोबी मालमत्ता असल्याचा आरोप केला जात आहे. मग तुमचं काय चाललंय? आमचे आमदार असतील, किंवा आमचे पदाधिकारी असतील आमच्या चौकशा तुम्ही करता का? मात्र, जेव्हा तुमची चौकशी आम्ही करू, तेव्हा तुम्ही सुटणार नाहीत, एवढंच सांगतो", असा इशारा खासदार संजय राऊत यांनी दिला.

### मुख्यमंत्री हे लोचट मजनू आहेत

- "महाराष्ट्रात सावत्र भाऊ कोणीही नाही. जे सावत्र भाऊ असतील ते दिल्लीत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह हे महाराष्ट्राला सावत्र वागणूक देत आहेत. महाराष्ट्राचे सावत्र भाऊ नाही तर ते भाऊच नाहीत. देवेंद्र फडणवीस, नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांनी महाराष्ट्राचं नुकसान केलं आहे. त्यांनी जेवढं नुकसान केलं तेवढं गेल्या १०० वर्षात कोणीही केलं नाही. आताचे मुख्यमंत्री हे लोचट मजनू आहेत. दिल्लीच्या दारातील एवढे लोचट मुख्यमंत्री आम्ही आजपर्यंत पाहिले नाहीत. याआधी दिल्लीपुढे झुकणारे अनेक मुख्यमंत्री पाहिले. मात्र, यांच्याएवढा दिल्लीपुढे झुकणारा मुख्यमंत्री पाहिला नाही. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आज जे बोलत आहेत ते दिल्लीचे पोपट म्हणून बोलत आहेत.

### संजय राऊत काय म्हणाले?

- "महाराष्ट्रात महाविकास आघाडीला लोकसभेला चांगलं यश मिळालं. आता विधानसभेची तयारी सुरु आहे. काल बुलढाण्यात होतो. आज अकोल्यात आहे. या राज्यातील वातावरण असं आहे की कोणत्याही परिस्थितीत राज्यात सत्ताबदल होईल. हे सरकार सध्या राज्याच्या तिजोरीमधून किती उधळपट्टी करत आहे? लाडक्या बहिणींना पैसे मिळाले पाहिजेत. त्यांचा १५०० रुपयांचा आकडा आहे. मात्र, पुढे जर आमचं सरकार आलं तर त्यामध्ये भरघोष वाढ होईल", असं सूचक विधान संजय राऊत यांनी केलं.
- "लोकसभा निवडणुकीत आलेल्या अपयशानंतर महायुतीला लाडक्या बहिणींची आठवण झाली. मात्र, तोपर्यंत फक्त फुटलेले लाडके आमदार आणि फुटलेले लाडके खासदार या पलिकडे यांचं लाडकं कोणीही नव्हतं. एका-एका आमदाराला ५०-५० कोटी आणि एका-एका खासदाराला १०० कोटी देण्यात आले. ठाकरे गटाचे पदाधिकारी फोडण्यासाठी आताही कोट्यवधी रुपये खर्च होत आहेत. पण लाडक्या बहिणींसाठी १५०० रुपये देण्यात येत आहेत. यावरही चर्चा होईल. निवडणुकीनंतर नोव्हेंबरमध्ये राज्यात सत्तातर झालेलं दिसेल.



राष्ट्र संचार छायाचित्रसेवा

### मेरा भारत महान

स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठत सध्या तिरंगा ध्वज आणि देशभक्तीपर विविध वस्तू विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्या आहेत. ठीक ठिकाणी दुकानांमध्ये तसेच रस्त्यावर तिरंगा ध्वज आणि स्वातंत्र्य दिनाची संबंधित साहित्याची विक्री होत असल्यामुळे बाजारपेठेत देशभक्तीपर वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.

## भुजबळांच्या नादात फडणवीस सत्ता घालवून बसणार : जरांगे पाटील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई** : छगन भुजबळांच्या नादात देवेंद्र फडणवीस तुम्ही सत्ता घालवून बसणार असल्याचे मत मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केले. पाडायचे की उभे करायचे ते ठरवू, पण तुमचा कार्यक्रम आम्ही करु असेही जरांगे पाटील म्हणाले. दरेकर हे लय खवाट, डेंजर भूत असल्याचे जरांगे म्हणाले. हे त्रासलेलं मराठा द्वेषाच भूत मराठा संघटना फोडत असल्याचे जरांगे पाटील म्हणाले. मराठ्यांची शक्ती काय असते ते आम्ही दाखवू थोडा संयम दाखवा असेही मनोज जरांगे पाटील म्हणाले.

**आता यांची खुर्ची ठेवायचं नाही :** सरकारनं पक्क ठरवलं आहे की, मराठ्यांना आरक्षण द्यायचे नाही. त्यामुळं मराठ्यांनी देखील



ठरवलं आहे की, यांना आता खुर्ची ठेवायचं नाही असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. आम्ही सरकारला आणखी २९ तारखेपर्यंत वेळ दिला असल्याचे मनोज जरांगे पाटील म्हणाले. मराठा समाजामध्ये यांच्याविषयी प्रचंड चीड आहे. त्यांची खदखद बाहेर पडणार आहे.

**आमचा जीव आरक्षणात त्यांचा जीव खुर्चीत :** तुम्ही जर आरक्षण देणार नसाल तर आम्हाला राजकीय भाषा वापरावी लागेल. मंत्री शंभुराज देसाई आले त्यावेळी शेवटची चर्चा झाली. त्यानंतर सरकारशी कोणतीही चर्चा झाली नसल्याचे मनोज जरांगे पाटील म्हणाले. आमचा जीव आरक्षणात त्यांचा जीव खुर्चीत, त्यांची खुर्ची आम्ही घालवणार असल्याचे जरांगे पाटील म्हणाले. काय व्हायचं ते होऊद्या असेही जरांगे पाटील म्हणाले. फडणवीसांना आणखी किती दिवस मराठ्यांना वेठीस धरायचे आहे ते बघू असेही जरांगे पाटील म्हणाले.

**२९ ऑगस्टला आम्ही कोणाला पाडायचं की निवडून आणायचं याबाबतची निर्णय घेऊ :** दरम्यान, २९ ऑगस्टला आम्ही कोणाला पाडायचं की निवडून आणायचं? याबाबतचा निर्णय घेणार आहोत. सर्व समाजाशी चर्चा करुन हा निर्णय घेणार असल्याचे जरांगे म्हणाले.

## ५२ पदकं सीआरपीएफ दलाला

# पोलीस पदक; राज्यातील ६१ जणांची निवड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई** : भारताच्या स्वातंर्त्यदिनाचं औचित्य साधत या अतीव महत्त्वपूर्ण दिवसाच्या पूर्वसंध्येला केंद्र सरकारनं सेवा पदकांची घोषणा केली. केंद्रानं जाहीर केलेल्या या यादीमध्ये पोलीस सेवेतील १०३७ जणांना पदकं जाहीर करण्यात आली असून, गृह मंत्रालयाच्या माहितीनुसार २१४ जणांना शौर्य पदकानं सन्मानित केलं जाणार आहे.

पदकांच्या या संपूर्ण यादीत सर्वाधित शौर्य पदकं अर्थात तब्बल ५२ पदकं सीआरपीएफ दलाला देण्यात आली आहेत. यामध्ये तेलंगणा पोलीस दलाच्या सेवेत असणाऱ्या हे कॉन्स्टेबल चदुवू येदैय्या यांना अद्वितीय शौर्य दाखवल्याबद्दल सर्वोच्च महत्त्वं असणारं PMG medal देण्यात येणार आहे.

### पाहा महाराष्ट्रातील मानकऱ्यांची यादी

- पुणे पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखेच्या सेवेत असणाऱ्या पोलीस आयुक्त सतीश गोवेकर यांना राष्ट्रपती विशिष्ट सेवा पोलीस पदक जाहीर झालं आहे. अनेक मोठ्या गुन्ह्यांची प्रकरणं हाताळत त्यांनी पोलीस दलात महत्त्वाचं योगदान दिलं. याशिवाय अतिरिक्त पोलीस महासंचालक चिरंजीव प्रसाद आणि संचालक राजेंद्र डहाळे यांनाही राष्ट्रपती विशिष्ट सेवा पोलीस पदक जाहीर झालं आहे.

### महाराष्ट्रातील पदक विजेत्यांची नावं (शौर्य पदक विजेते) :

- डॉ. कुणाल शंकर सोनावणे - सब डिव्हिजनल पोलीस ऑफिसर
- दीपक रंभाजी उते - पोलीस उपनिरीक्षक
- कै. धनाजी तानाजी होनमाने - पोलीस उपनिरीक्षक (मरणोपरांत)
- नागेशकुमार बोंड्यालू मदारबोईना- नायक पोलीस हवालदार
- शकिल युसूफ शेख- पोलीस हवालदार
- विश्वनाथ समैय्या पेंडम - पोलीस हवालदार
- विवेक मानकू नरोटे - पोलीस हवालदार
- मोरेश्वर नामदेव पोटवी - पोलीस हवालदार
- कैलास चुंगा कुळमेठे - पोलीस हवालदार
- कोटला बोटू कोरामी - पोलीस हवालदार
- कोर्के सन्नी वेलाडी- पोलीस हवालदार
- महादेव विष्णू वानखेडे - पोलीस हवालदार
- अनुज मिलिंद तरे - अतिरिक्त पोलीस महानिरीक्षक
- राहुल नामदेव नेव्हाडे- पोलीस उपनिरीक्षक
- विजय दादासो सपकाळ - पोलीस उपनिरीक्षक
- महेश बोरू मिच्छा- हेड कॉन्स्टेबल
- समैय्या लिंगय्या असम - नायक पोलीस हवालदार
- उल्लेखनीय सेवा पुरस्कार
- श्री. चिरंजीव रामच्छबिला प्रसाद- अतिरिक्त महासंचालक, महाराष्ट्र
- श्री. राजेंद्र बाजीराव डहाळे- संचालक, महाराष्ट्र
- श्री. सतीश रघुवीर गोवेकर, पोलीस सहआयुक्त, महाराष्ट्र

#रा

## दहशतवादी हल्ल्याचा गुप्तचर यंत्रणांचा इशारा

# दिल्लीत हाय अलर्ट...

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**नवी दिल्ली :** स्वातंत्र्यदिनानिमित्त दिल्लीत हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. जम्मूमध्ये सक्रिय असलेले दहशतवादी दिल्ली किंवा परिसरात आत्मघातकी हल्ले करण्याच्या तयारीत असल्याची माहिती गुप्तचर यंत्रणांना मिळाली आहे. दिल्लीसह पंजाबमध्येही सुरक्षा दलांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दहशतवाद्यांमधील संभाषणाच्या आधारे गुप्तचर यंत्रणांनी माहिती दिली आहे.

स्वातंत्र्यदिनी हल्ला होईल असे नाही, असे यंत्रणांचे म्हणणे आहे. त्या दिवशी सगळीकडे कडक सुरक्षा पथक तैनात असतात, एक-दोन दिवसांनी दहशतवादी कारवाई करू शकतात, असे यंत्रणांनी म्हटले आहे.

माध्यमातील वृत्तानुसार, जम्मू-काश्मीरमधील कठुआ येथे दिसणारे दोन संशयित दिल्लीच्या दिशेने जात असल्याचा संशय आहे. त्यांच्याकडे शस्त्रेही आहेत. दहशतवादी पठाणकोटच्या दिशेने गेले असून, तेथून दिल्लीच्या दिशेनेही जाऊ शकतात, अशी भीती व्यक्त केली जात आहे. हे दहशतवादी अमरनाथ यात्रेलाही लक्ष्य करू शकतात, अशी भीती सुरक्षा दल आणि यंत्रणांना आहे. याशिवाय दिल्लीतील महत्त्वाच्या संस्थांनाही लक्ष्य केले जाऊ शकते. गेल्या अनेक वर्षांपासून दहशतवाद्यांना रोखण्यात सुरक्षा दल आणि यंत्रणांना यश आले आहे. अतिगर्दी असलेल्या भागांना दहशतवादी लक्ष्य करू शकतात, असे अलर्टमध्ये म्हटले आहे. काश्मीरच्या तुलनेत शांतता म्हटल्या जाणाऱ्या जम्मू विभागात दहशतवाद्यांच्या कारवाया वाढल्या असतानाच, हा अलर्ट जारी करण्यात आला आहे. कठुआ, डोडा, उधमपूर आणि राजौरी सारख्या जिल्ह्यांमध्ये दहशतवादी हल्ले वाढले आहेत.

दिल्लीवर हल्ला करून दहशतवाद्यांना हा संदेश द्यायचा आहे की, राजधानी अजूनही त्यांच्या आवाक्याबाहेर नाही. लष्कर-ए-तोयबा आणि जैश-ए-मोहम्मद सारख्या संघटना दिल्लीवर हल्ले करण्याची योजना आखत आहेत. दिल्ली आणि पंजाबव्यतिरिक्त जम्मू-काश्मीरमध्येही सुरक्षा दलहाय अलर्टवर आहेत. लाल चौकासारख्या भागात सुरक्षा दल हाय अलर्टवर आहेत.

## राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## डेंग्यू, झिकाचा होणार लवकरच नायनाट!

**आरोग्य**

**पावसाळ्यात** डेंग्यू, मलेरिया, हिवताप असे अनेक साथीचे आजार डोकावत असतात. त्यातच सध्या देशभरात डेंग्यू आणि झिका व्हायरसने थैमान घातले आहे. मागील आठवड्यात जोरदार झालेल्या पावसामुळे डेंग्यू आणि झिकाची रुग्णसंख्या सातत्याने वाढत चालल्याचे दिसून येत आहे. मात्र आता लवकरच या आजारांचा नायनाट होणार आहे. या आजारांचा प्रादुर्भाव मिटवण्यासाठी नवीन लस उपलब्ध होणार आहे. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, देशात सध्या डेंग्यूच्या लशीवर ४ संस्थांकडून संशोधन सुरू आहे. सरकारने राष्ट्रीय जैववैद्यक धोरणांतर्गत डेंग्यू लसीच्या चाचण्यास परवानगी दिली आहे. भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेने (आयसीएमआर) हैदराबादमधील पॅनासिआ बायोटेक कंपनीबरोबर डेंग्यूवरील लशीच्या चाचण्यांसाठी करार केला आहे. 'डेंगीऑल' असे या लसीचे नाव असून तिच्या चाचण्या ५ वर्षांसाठी घेतल्या जाणार आहेत. या लसीची पहिली व दुसरी चाचणी पूर्ण झाली असून तिसऱ्या टप्प्यातील चाचणीसाठी भारतीय औषधे महानियंत्रकांनी परवानगी दिली आहे. याचबरोबर इंडियन इम्युनोलॉजिकल्स लिमिटेड (आयआयएल) कंपनीकडूनही डेंग्यूची लस विकसित केली जात आहे. या लसीची पहिल्या टप्प्यातील चाचणी पूर्ण झाली आहे. दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्यातील चाचणी लवकरच सुरू होणार आहे. या लसीची पहिल्या टप्प्यातील चाचणी यशस्वी ठरली असून, तिचे चांगले परिणाम दिसून आले आहेत.

## » Selected

## बाजारात किरकोळ तेजी

**मुंबई :** बुधवारच्या अस्थिर सत्रात भारतीय बेंचमार्क निर्देशांक किरकोळ तेजीसह बंद झाले. निर्देशांक १४९.८५ अंकांनी वधारून ७९,१०५.८८ वर, तर निफ्टी ४.८० अंकांनी वधारून २४,१४३.८० वर बंद झाला. सुमारे १,२४७ समभाग वधारले, २,१४१ घसरले आणि ९१ स्थिर राहिले. निफ्टीत टीसीएस, एचसीएल टेक्नॉलॉजीज, इन्फोसिस, टेक महिंद्रा आणि बीपीसीएल यांचे समभाग वधारले, तर डिव्हिस लॅब्स, हीरो मोटोकॉर्प, कोल इंडिया, ओएनजीसी आणि अल्ट्राटेक सिमेंट यांचे समभाग घसरले. आयटी (१.५ टक्के) वगळता इतर सर्व क्षेत्र निर्देशांक लाल भांडवली वस्तू, आरोग्यसेवा, तेल व वायू, धातू, रियल्टी, फार्मा, मीडिया या क्षेत्रांतील निर्देशांक ०.५ ते १ टक्क्यांनी घसरले. बीएसई मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांक प्रत्येकी ०.५ टक्क्यांनी घसरले.

## काश्मिरमध्ये लवकरच निवडणूक

**नवी दिल्ली :** जम्मू-काश्मीरमधील सुरक्षा स्थितीचा आढावा घेण्यासाठी आणि सुरक्षा रक्षकांच्या गरजेचा आढावा घेण्यासाठी निवडणूक आयोग केंद्रीय गृह सचिव अजयकुमार भल्ला यांच्यासमवेत बैठक घेणार आहे. निवडणूक आयोग पुढील आठवड्यात केंद्रशासित प्रदेशातील विधानसभा निवडणुकांच्या तारखा जाहीर करण्याची शक्यता आहे. निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी तीन सदस्यीय निवडणूक आयोग, गेल्या आठवड्यात केंद्रशासित प्रदेशाचा दौरा केला होता. जम्मूत पत्रकारांशी बोलताना मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार म्हणाले होते की, केंद्रशासित प्रदेशात लवकरात लवकर विधानसभा निवडणुका घेण्यास निवडणूक आयोग कटिबद्ध आहे आणि कोणतीही बाह्य किंवा अंतर्गत शक्ती निवडणूक प्रक्रियेत अडथळा आणू शकत नाही.

## बांगलादेश सरकारने मागितली माफी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ढाका :** बांगलादेशात माजी पंतप्रधान शेख हसीना यांना सत्तेतून काढण्याकरीता उसळलेल्या आंदोलनात हिंदू समाजाला तीव्र अत्याचाराला सामोरे जावे लागले. बांगलादेशातील एकूण २७ जिल्ह्यांमध्ये हिंदूंवर हिंसाचार झाला. त्यानंतर आज हिंदू समाजाच्या लोकांनी रस्त्यावर उतरून हिंसाचाराचा निषेध केल्याचे समोर येत आहे. मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील बांगलादेशच्या अंतरिम सरकारने हिंदूंवरील हिंसाचाराच्या घटनांना दुःखद म्हणत माफीही मागितली आहे. बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचाराविरोधात अमेरिका, कॅनडा आणि भारतासह जगातील अनेक देशांमध्ये निदर्शने झाली. मोहम्मद युनूस लवकरच हिंदू समाजाच्या प्रतिनिधींची भेट घेणार असल्याचे सांगितले जात आहे.

## अलाहाबाद उच्च न्यायालयाचे वक्तव्य

# धर्मांतराचे स्वातंत्र्य नाही!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** उत्तर प्रदेश बेकायदेशीर धर्मांतर प्रतिबंधक कायदा २०२१ चा उद्देश सर्व व्यक्तींना धार्मिक स्वातंत्र्याची हमी देणे हा आहे. भारतातील धर्मनिरपेक्षतेची भावना कायम ठेवणे, हा या कायद्याचा उद्देश असल्याचे अलाहाबाद उच्च न्यायालयाने म्हटले आहे.

राज्यघटनेने प्रत्येक व्यक्तीला आपला धर्म मानण्याचा आणि त्याचा प्रचार करण्याचा मूलभूत अधिकार दिला आहे, असे न्यायालयाने म्हटले आहे. धार्मिक स्वातंत्र्याच्या वैयक्तिक हक्काचे धर्मांतराच्या अधिकारात रूपांतर करता येत नाही. न्यायमूर्ती रोहित रंजन अग्रवाल यांनी धर्मांतराचा आरोपी अजीमचा जामीन अर्ज फेटाळताना हे निरीक्षण नोंदवले.

मुलीचे बळजबरीने धर्मांतर करून तिचे लैंगिक शोषण केल्याप्रकरणी बदायूं येथील कोतवाली पोलिस ठाण्यात अजीमविरोधात उत्तर प्रदेश बेकायदा धर्मांतर प्रतिबंधक कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीने जामिनासाठी उच्च न्यायालयात अर्ज दाखल केला होता. याचिकाकर्त्याच्या वकिलांनी सांगितले की, याचिकाकर्त्याला चुकीच्या पद्धतीने अडकवण्यात आले आहे. पीडितेने संबंधित प्रकरणातील जबाबात याचिकाकर्त्याशी लग्न झाल्याची पुष्टी केली आहे. जामिनाला विरोध करताना अतिरिक्त सरकारी वकील म्हणाले की, पीडितेने आपल्या जबाबात म्हटले आहे की, तिच्यावर इस्लाम धर्म स्वीकारण्यासाठी दबाव टाकण्यात आला होता.

कलम १६४ सीआरपीसी अंतर्गत नोंदविण्यात आलेल्या जबाबात याचिकाकर्त्याने आणि त्याचे कुटुंबीय त्याला इस्लाम धर्म स्वीकारण्यास भाग पाडत असल्याचे स्पष्टपणे नमूद केले होते, असे न्यायालयाने नमूद केले. बकरी ईदच्या दिवशी होणारी जनावरांची कुर्बानी पाहून मांसाहार शिजवून खाणेही तिला भाग पाडले, असाही आरोप होता. न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळला.

# बांगलादेशींना भारताचे नागरिकत्व

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बांगलादेशात हिंदूंविरोधात सुरू असलेल्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर, आसाममधील सिलचर येथील ५० वर्षीय दुलोन दास हे आसाममधील नागरिकत्व दुरुस्ती कायद्याच्या मदतीने, भारतीय नागरिकत्व मिळवणारे बांगलादेशातील पहिले स्थलांतरित ठरले आहेत.

भारताच्या गृह मंत्रालयाने दुलोन दास यांना नागरिकत्व मिळाल्याची माहिती दिली. त्यांना गुवाहाटी येथील प्रादेशिक पासपोर्ट कार्यालयात जाऊन प्रमाणपत्रे घेण्यास सांगण्यात आले आहे. दुलोन दासच्या वकिलांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी सीएएच्या मदतीने १ एप्रिल रोजी भारतीय नागरिकत्वासाठी अर्ज केला होता.

१९७४ मध्ये बांगलादेशच्या सिलहट जिल्ह्यात त्यांचा जन्म झाला होता. १९८६ मध्ये त्यांच्या वडिलांनी बांगलादेशच्या सिलहट जिल्ह्यातील एका गावात ८ हजार रुपये (बांगलादेशी चलन) खर्च करून जमीन खरेदी केली होती. मात्र, त्यानंतर लगेचच त्यांच्यावर अनेक वेळा हल्ले झाले आणि ते देश सोडून पळून गेले. दुलोन दास १९९६ पासून आसाममध्ये भारतीय म्हणून मतदान करत असून, त्यांच्या कुटुंबातील सदस्यांकडे आधार कार्ड, बँक खाती आणि इतर कागदपत्रे आहेत. ते १९७१ नंतर आसाममध्ये आले आहेत आणि म्हणूनच त्यांनी सीएए अंतर्गत नागरिकत्वासाठी अर्ज केला. आसाममधील एकूण आठ जणांनी सीएए अंतर्गत नागरिकत्वासाठी अर्ज केला असून, त्यापैकी दोघांनी आपला अर्ज मागे घेतला आहे. सीएए अंतर्गत सहा अर्जांची गृह मंत्रालयाकडून तपासणी केली जात असून, आणखी चार जणांना नागरिकत्व मिळण्याची अपेक्षा आहे. यावर्षी मार्चमध्ये सार्वत्रिक निवडणुका जाहीर होण्यापूर्वीच सरकारने सीएए लागू केले होते. त्यासाठी आतापर्यंत फारच कमी अर्ज आले आहेत. सीएएच्या मदतीने स्थानिक अर्जदारांना नागरिकत्व देण्यास सुरुवात केल्यानंतर अर्जांची संख्या वाढेल, असा दावा भाजपने केला आहे.

## इस्रायलला विमानांसह दारुगोळाही

# अमेरिका देणार शस्त्रास्त्रे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**वॉशिंग्टन :** गाझामध्ये गेल्या दहा महिन्यांपासून सुरू असलेल्या युद्धात जवळपास ४० हजार पॅलेस्टिनी मारले गेले आहेत. गेल्या वर्षी हमासने केलेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर, इस्रायलने गाझावर हल्ले सुरूच ठेवले आहेत. अमेरिकेनेही त्याला पूर्ण पाठिंबा दिला आहे. अमेरिकी बायडन प्रशासनाने नुकतीच इस्रायलला २ हजार कोटी रुपयांच्या शस्त्रास्त्रांच्या पुरवठ्याला मंजुरी दिली आहे. विशेष म्हणजे गाझामधील नागरिकांच्या मृत्यूच्या पार्श्वभूमीवर अनेक मानवाधिकार संघटनांनी शस्त्रास्त्रांचा पुरवठा थांबवण्याची विनंती केली होती. मात्र, अमेरिकेने त्याकडे दुर्लक्ष केले आहे.

इस्रायलला ५० एफ-१५ लढाऊ विमाने देण्यात येणार आहेत. त्यासह मोठ्या प्रमाणात लष्करी वाहने तसेच दारुगोळा पुरवण्यात येणार आहे. अत्याधुनिक रडार आणि सुरक्षित उपकरणांनी सुसज्ज असलेली एफ-१५ विमाने २०२९ पर्यंत इस्रायलच्या ताफ्यात सामील होतील.

अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे की, इस्रायलच्या सुरक्षेसाठी अमेरिका कटिबद्ध आहे आणि इस्रायलला बळकट करणे आणि स्वतःचे संरक्षण करण्याची क्षमता विकसित करणे, समर्थन करणे अमेरिकेच्या राष्ट्रीय हितासाठी महत्त्वाचे आहे. यामुळे इस्रायलची विद्यमान आणि भविष्यातील शत्रूच्या धोक्यांचा सामना करण्याची क्षमता सुधारेल, आपल्या भूमीचे रक्षण होईल आणि प्रादेशिक धोक्यांवर मात करता येईल.

मानवाधिकार संघटना आणि बायडन यांच्या डेमोक्रॅटिक पक्षाच्या काही सदस्यांनी प्रशासनाला इस्रायलला शस्त्रास्त्रांची विक्री थांबवण्याची विनंती केली आहे. गाझा युद्धात मोठ्या संख्येने झालेल्या नागरी बळींचा त्यांनी निषेध केला. अलीकडेच गाझामध्ये विस्थापित पॅलेस्टिनींना आश्रय देणाऱ्या शाळेवर इस्रायलने केलेल्या हवाई हल्ल्यात ९३ जण ठार झाले होते. शाळेतील दहशतवाद्यांना लक्ष्य करत असल्याचा दावा इस्रायलने केला. बायडन प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या मृत्यूबद्दल चिंता व्यक्त केली होती. मे महिन्याच्या सुरुवातीला बायडन यांनी इस्रायलला करण्यात येणारी मदत रोखली होती.

## बांगलादेश हिंसाचाराची पश्चिम बंगालमध्ये पूर्नरावृत्ती!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोलकाता :** 'सलाम वालेकूम'ला 'जय श्री राम'ने उत्तर देत अभिवादन केले, म्हणून कट्टरपंथी युवकांनी हिंदू कुटूंबियांच्या घरात घुसून मारहाण करत देवघरातील मूर्त्यांची तोडफोड केली. पश्चिम बंगालच्या नमिता पाईकमारा या भागात हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

भारतीय जनता पार्टी पश्चिम बंगालने ट्विट करत एक व्हिडिओ शेअर केला होता. त्या व्हिडिओत घरावर केलेला हल्ला दिसत आहे. तसेच व्हिडिओमध्ये पीडित व्यक्ती आपले दुख सांगत आहे. हा व्हिडिओ बांगलादेश भाजपने शेअर केल्यानंतर त्यांनी लिहिले की, निमता पाइकपारा येथील वॉर्ड क्रामांक ५ येथील निवासी बिस्वजीत मंडल के घर मे १५०-२०० रोहिंग्यांनी घरात घुसखोरी करच घराची तोडफोड केली आहे. त्यावेळी त्यांचे सामानही तोडण्यात आले.

## युक्रेनची घुसखोरी

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा




**सुमी प्रदेश :** युक्रेनने रशियाच्या प्रदेशात घुसखोरी करण्यात यश मिळवले. त्यामुळे हजारो रशियन नागरिकांनी स्थलांतर केले. युक्रेनी सैनिक रशियन सीमेजवळ वाहन चालवताना टिपलेले छायाचित्र.

## लाडली बहनाला अभूतपूर्व प्रतिसाद, महाराष्ट्रातही अंमलबजावणी

# राज्यांनी स्वीकारली मध्य प्रदेशची योजना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**नवी दिल्ली :** मध्य प्रदेशात तत्कालीन मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या लाडली बहना योजनेला मिळालेला प्रचंड प्रतिसाद अन्य राज्यांनाही ही योजना लागू करण्यासाठी प्रेरणा देणारा ठरला आहे.

गेल्या वर्षी मध्य प्रदेशात झालेल्या विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजपची स्थिती फारशी चांगली नसल्याचे मानले जात होते. पण जेव्हा निकाल लागला तेव्हा त्याने ऐतिहासिक कामगिरी केली. भाजपला १६३ जागा मिळाल्या होत्या, तसेच ४८ टक्क्यांहून अधिक मते भाजपला मिळाली. माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी जाहीर केलेल्या लाडली बहना योजनेचे योगदान या नेत्रदीपक निकालामागे असल्याचे मानले जाते. महिलांना दरमहा १,२५० रुपये देण्याचे आश्वासन दिले. या योजनेच्या घोषणेचा महिलांवर सकारात्मक परिणाम झाला आणि भाजपला विजय मिळाला. शिवराजसिंह चौहान यांना पुन्हा मुख्यमंत्री करण्यात आले नसले, तरी त्यांना या योजनेचे श्रेय मिळत आहे.

आता अनेक राज्ये या योजनेची पुनरावृत्ती करत आहेत. विशेषतः निवडणुकीच्या तोंडावर असलेल्या राज्यांमध्ये अशी योजना सुरू आहे. महाराष्ट्रातील शिंदे सरकारने यापूर्वीच लाडकी बहिण योजनेची घोषणा केली आहे. याअंतर्गत दरमहा १,५०० रुपयांची रक्कम दिली जाणार आहे. २१ ते ६० वयोगटातील महिलांना या योजनेचा लाभ मिळणार असून, रक्षाबंधनापूर्वी त्याचा पहिला आणि दुसरा हप्ता एकाच वेळी हस्तांतरित केला जाणार आहे. शिंदे सरकारने या योजनेसाठी २५ हजार कोटी रुपयांची तरतूद यापूर्वीच केली आहे. यावर्षी रक्षाबंधन १९ ऑगस्टला आहे. आता हरयाणातील भाजप सरकारही निवडणुकीपूर्वी अशीच योजना जाहीर करू शकते, अशी चर्चा आहे. आतापर्यंत महाराष्ट्रातील १ कोटी २९ लाख महिलांची या योजनेसाठी पडताळणी करण्यात आली आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी महिलांना या योजनेअंतर्गत किमान तीन हप्ते मिळावेत, अशी महाराष्ट्र सरकारची इच्छा आहे. झारखंडच्या हेमंत सोरेन सरकारने मुख्यमंत्री मैया सन्मान योजनेची घोषणा केली आहे. या अंतर्गत २१ ते ५० वयोगटातील महिलांना १,००० रुपयांची रक्कम मिळणार आहे. तर ५० वर्षांवरील महिलांना दरमहा १,००० रुपये पेन्शन मिळणार आहे.

झारखंडमध्ये सध्या नव्या योजनेसाठी नोंदणी सुरू असून, सुमारे ३० लाख महिलांनी आपली नावे नोंदविली आहेत. या योजनेअंतर्गत ४५ लाख महिलांना लाभ देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यासाठी ४,५०० कोटी रुपयांचे बजेटही निश्चित करण्यात आले आहे. हरयाणाबद्दल बोलायचे झाले, तर हर घर हर गृहिणी योजनेअंतर्गत महिलांच्या नावे एलपीजी सिलिंडर ५०० रुपयांना देण्याचा प्रस्ताव आहे. हरियाणा सरकार काही रक्कम थेट हस्तांतरित करण्यासारखी योजनाही जाहीर करू शकते.

#रा

## हिमाचल प्रदेश, ओडिशा, केरळसह दिल्लीतही पाऊस

# मुसळधार पावसाचा इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारतीय हवामान खात्याने (आयएमडी) या आठवड्यात अनेक राज्यांमध्ये पावसाचा इशारा दिला आहे. हिमाचल प्रदेश, केरळ, ओडिशा आणि दिल्लीसह अनेक राज्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. दिल्लीसाठी यलो अलर्ट जारी केला आहे.

एर्नाकुलम, त्रिशूर आणि इडुक्कीसह अनेक जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. आयएमडीने तिरुवनंतपुरम, कोल्लम आणि पथनमथिट्टा जिल्ह्यात गुरुवारपर्यंत मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. या दरम्यान ताशी ४० किमी वेगाने वारे वाहू शकतात.

राजस्थानमध्ये दोन दिवस अतिवृष्टी झाली. जयपूरमध्ये सर्वाधिक पाऊस नोंदवला गेला. पुढील दोन ते तीन दिवस अधूनमधून पावसाचा जोर कायम राहील, असा अंदाज स्थानिक हवामान यंत्रणांनी वर्तवला आहे.

हिमाचल प्रदेशलाही मुसळधार पावसाचा फटका बसला आहे. मार्कंडा नदीची पाणी पातळी धोकादायक पातळीवर पोहोचली आहे. पुढील पाच दिवसांत अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाचा अंदाज वर्तवला आहे. चंबा, कांगडा, मंडी, सोलन, सिरमौर, शिमला, उना, बिलासपूर आणि हमीरपूरसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

ओडिशामध्ये मयूरभंज, क्योंझर आणि सुंदरगड या जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. सुंदरगड, झारसुगुडा, बारगड आणि संबलपूरमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.



"ऑस्ट्रेलियाला बदला घ्यायचा आहे. ते त्यासाठी तहानलेले आहेत आणि भारतीय संघाला पराभूत करण्यासाठी ते सर्व प्रयत्न करतील. कारण टीम इंडियाने त्यांना घरी दोनवेळा पराभूत केले आहे. त्यांच्याकडे दिग्गज गोलंदाजांची फौज आहे. शिवाय नॅथन लियॉनसारखा अव्वल फिरकीपटू आहे. त्यामुळे या मालिकेत भारताची फलंदाजी विरुद्ध ऑस्ट्रेलियाचा जलदगती मारा, असा हा सामना असेल. "ही मालिका अटीतटीची होईल हे निश्चित आणि भारतीय संघ हॅटट्रिक साजरी करण्याची शक्यता अधिक आहे. कारण, त्यांच्याकडे तंदुरुस्त गोलंदाज आहेत आणि फलंदाजांनी दमदार खेळ केल्यास, ऑस्ट्रेलियाला पुन्हा पराभूत करू शकतो."
— रवि शास्त्री

### तिसरी 'स्पोटर्सफिल्ड मान्सुन लीग' अजिंक्यपद १४ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धा

# किणीकर ॲकॅडमी पुढच्या फेरीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्पोटर्सफिल्ड मॅनेजमेंट तर्फे आयोजित तिसऱ्या 'स्पोटर्सफिल्ड मान्सुन लीग' अजिंक्यपद १४ वर्षाखालील ३०-३० षटकांच्या क्रिकेट स्पर्धेत हेमंत किणीकर क्रिकेट ॲकॅडमी आणि एके स्पोर्टस क्रिकेट ॲकॅडमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी कामगिरी केली.

सातारा रोड येथील टेंभेकर फार्मस् क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत अजिंक्य पुजारी याने केलेल्या महत्वपूर्ण धावांच्या जोरावर हेमंत किणीकर क्रिकेट ॲकॅडमीने सनराईज क्रिकेट ॲकॅडमीचा एक गडी राखून पराभव करत सलग तिसरा विजय मिळवला.





पहिल्यांदा फलंदाजी करताना सनराईज क्रिकेट ॲकॅडमीने २८ षटकामध्ये ११८ धावा धावफलकावर लावल्या. यामध्ये अर्थव शिंदे (३२ धावा), प्रतिक शिंदे (२२ धावा) आणि उत्कर्ष भोसले (२१ धावा) यांनी संघाचा डाव बांधला.

हे लक्ष्य हेमंत किणीकर क्रिकेट ॲकॅडमीने २९ षटकात पूर्ण केले. अजिंक्य पुजारी याने ३६ धावांची तर, आराध्या पवार हिने २३ धावांचे योगदान देत संघाचा विजय निश्चित केला.

ऋषभ कुलकर्णी याने केलेल्या नाबाद खेळीमुळे एके स्पोर्टस क्रिकेट ॲकॅडमीने विराग ॲकॅडमी संघाचा ८ गडी राखून सहज पराभव करून सलग पाचवा विजय नोंदवित स्पर्धेतील आपले अपराजकत्व कायम ठेवले. पहिल्यांदा खेळताना विराग क्रिकेट ॲकॅडमीचा डाव ७४ धावांवर गडगडला.

स्वर शिंदे याने २० धावा जोडल्या. एके संघाच्या नील रूद्रभाते आणि ऐश्वर्या काळे यांनी अचूक गोलंदाजी केली. हे लक्ष्य एके स्पोर्टस क्रिकेट ॲकॅडमीने ९ षटकात व २ गडी गमावून पूर्ण केले. ऋषभ कुलकर्णी याने नाबाद २९ धावांची खेळी करून संघाला सहज विजय मिळवून दिला.

**सामन्याचा संक्षिप्त निकालः गटसाखळी फेरीः**

- सनराईज क्रिकेट ॲकॅडमीः २८ षटकात ७ गडी बाद ११८ धावा (अर्थव शिंदे ३२, प्रतिक शिंदे २२, उत्कर्ष भोसले २१, इशान शेळके २-२२, अरीन सातपुते २-२०, दर्ष चानपुर २-२१) पराभूत वि. हेमंत किणीकर क्रिकेट ॲकॅडमीः २९ षटकात ९ गडी बाद ११९ धावा (अजिंक्य पुजारी ३६, आराध्य पवार २३, अन्कीता गायकवाड ३-२७); सामनावीरः अजिंक्य पुजारी;
- विराग क्रिकेट ॲकॅडमीः २३.५ षटकात १० गडी बाद ७४ धावा (स्वर शिंदे २०, नील रूद्रभाते २-६, ऐश्वर्या काळे २-८) पराभूत वि. एके स्पोर्टस क्रिकेट ॲकॅडमीः ९ षटकात २ गडी बाद ७८ धावा (ऋषभ कुलकर्णी नाबाद २९, विहान जगताप १-१०); सामनावीरः ऋषभ कुलकर्णी;

# सुपर सिक्स कॅरम स्पर्धेत मुंढे, सोनावणेचे विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र कॅरम संघटना व सूर्यवंशी क्षत्रिय ज्ञाती समाज आयोजित रॅपीडो कॅरम सुपर सिक्स पुण्याच्या अनिल मुंढे, नंदू सोनावणेने प्रतिस्पध्र्यांवर विजय प्राप्त करीत विजयी सलामी दिली.

या स्पर्धेत पुण्याच्या अनिल मुंढेने मुंबई उपनगरच्या चंद्रकांत तुपलोंढेचा २२-१, २५-५ असा तर नंदू सोनावणेने ठाण्याच्या महेश शेट्येचा २३-७, २५-८, असा पराभव केला होता. या स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी मुंबई क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष अजिंक्य नाईक, अभय हडप, राज्य कॅरम संघटनेचे जितेंद्र शाह, अरुण केदार, अजित सावंत, यतीन ठाकूर, केतन चिखले, योगेश फणसळकर, सूर्यवंशी क्षत्रिय ज्ञाती समाजाचे जयंत पाटील आणि उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक दादर शाखेचेआशिष उपाध्याय हे उपस्थित होते. निकाल : पुरुष एकेरी



: दिलीप सोसा (मुंबई) वि.वि. शिरीष पेंढारकर (मुंबई उपनगर) २५-४, २५-०, संजय भंडारे (मुंबई उपनगर) वि.वि. महेश कुपेरकर (मुंबई) १७-४, १६-३, दिलेश खेडेकर (मुंबई) वि.वि. महम्मद खान (ठाणे) १९-४, २५-०, शाबाज शेख (मुंबई उपनगर) वि.वि. संजय कोंडविलकर (रत्नागिरी) १८-२, १२-११, मंगेश जागुष्टे (मुंबई) वि वि नासिर खान (मुंबई उपनगर) १३-१४, २०-२, २२-३, राहुल भस्मे (रत्नागिरी) वि.वि. राजेश खेडेकर (मुंबई) २४-४, ८-७, रोमित बगाडे (ठाणे) वि.वि. नीलांश चिपळूणकर १८-६, ११-९, कृष्णा वाघमारे (मुंबई) वि.वि. रघुनाथ वाघपंजे (मुंबई उपनगर) १८-१३, ११-७.

### परशुरामियन्सने डेक्कन इलेव्हन एफसी 'अ' संघाला बरोबरीत रोखले

# रूपाली एससीचा सहज विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रूपाली एससी, स्निग्मय पुणे एफसी आणि परशुरामियन्स संघांनी पीडीएफए सुपर डिव्हिजन लीगमध्ये आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवले. गंगा लिजेंड्स, बावधन मैदानावर सुरू असलेल्या लीगमध्ये सनी पवारच्या (४९व्या, ७०व्या) आणि संगोराम सातवच्या (३रा) एक गोलच्या बळावर रूपाली एससीने उत्‌कर्ष क्रीडा मंचवर ३-० अशी मात केली.

आणखी एका सामन्यात स्निग्मय एफसी, पुणेने गेम ऑफ गोल्स एफसीचा ३-१ असा पराभव केला. गुलाम अन्सारीची (१४वा, २६वा, ३४वा) गोल हॅट्‌ट्रिक त्यात निर्णायक ठरली. गेम ऑफ गोल्स एफसीसाठीचा एकमेव गोल सूरज थापाने (५४वे) केला. नंतर परशुरामियन्सने चुरशीच्या लढतीत डेक्कन इलेव्हन एफसी 'अ' संघाला २-२ असे बरोबरीत रोखले.



रोहन देशमुखने (३१व्या) परशुरामियन्सचे खाते उघडले. मात्र, यश महापात्‌रा (५२वे) डेक्कन इलेव्हन एफसी 'अ' ला बरोबरी साधून दिली. त्यानंतर साद शेख (६५व्या) संघाला आघाडीवर नेले. परंतु, उत्तरार्धात निखिल पडवळने (७६वे) परशुरामियन्ससाठी बरोबरी साधली. सदीम मिया (८वा आणि ३१वा) आणि हर्ष दरबा (५१वा) यांच्यामुळे एआयवायएफए स्काय हॉक्सने दिएगो ज्युनियर्सला ३-१ असे रोखले. प्रतिस्पर्धी संघाकडून जॉन चल्लाने (६२ वे) गोल केला. दुसऱ्या सामन्यात, इंद्रायणी एससीने संघवी एफसीचा ५-० असा धुव्वा उडविला. विजयी संघाकडून आयुष दीपक (३९वा), सूरज भैरट (४९वा), अजय राठोड (६५वा), शिवकुमार शेट्टी (८५वा) आणि शुभम गायकवाडने (८७वा) प्रत्येकी एक गोल केला.

### आयसीसी क्रमवारीत मोठा बदल : बाबर आझम अव्वल स्थानावर

# रोहित शर्माने शुभमन गिलला टाकले मागे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद ने १४ ऑगस्ट रोजी ताजी क्रमवारी जाहीर केली आहे, ज्यामध्ये बरीच उलथापालथ झाली आहे. आता भारतीय कर्णधार रोहित शर्मा एकदिवसीय फलंदाजी क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर आला आहे. रोहितने आपला देशबांधव सलामीवीर शुभमन गिलला तिसऱ्या क्रमांकावर ढकलले. गिलनंतर चौथ्या क्रमांकावर विराट कोहली आहे.



एकदिवसीय क्रिकेटमधील फलंदाजांच्या यादीत पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझम पहिल्या क्रमांकावर आहे. पण रोहित शर्माही त्याच्या मागे नाही. रोहितचे ७६५ रेटिंग गुण आहेत, तर बाबर आझमचे ८२४ रेटिंग गुण आहेत. नुकत्याच झालेल्या श्रीलंकेविरुद्धच्या वनडे मालिकेत रोहितने १५७ धावा केल्या होत्या. याच मालिकेत १०१ धावा करत श्रीलंकेचा फलंदाज पथुम निसांकाही आठव्या स्थानावर पोहोचला आहे. कुसल मेंडिस (पाच स्थानांनी ३९ व्या स्थानावर) आणि अविष्का फर्नांडो (२० स्थानांनी ६८ व्या स्थानावर) यांच्या क्रमवारीतही सुधारणा झाली आहे.

नेदरलँडचा आक्रमक सलामीवीर मॅक्स ओ'डॉड (१० स्थानांनी वर ५४ व्या स्थानावर) आणि अमेरिकेचा मोनांक पटेल (११ स्थानांनी ५६ व्या स्थानावर) देखील वाढले. अमेरिकेचा नोस्टुश केन्झिगे (१० स्थानांनी ४९व्या स्थानावर) आणि श्रीलंकेचा फिरकीपटू ड्युनिथ वेललागे (१७ स्थानांनी वर ५९व्या स्थानावर) यांनीही एकदिवसीय गोलंदाजी क्रमवारीत वर्चस्व राखले आहे. गोलंदाजी क्रमवारीत केशव महाराज पहिल्या, जोश हेझलवूड दुसऱ्या आणि ॲडम झाम्पा तिसऱ्या स्थानावर आहेत.



# पै. खाशाबा जाधव यांना पुण्यतिथी दिनी अभिवादन

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात पै. खाशाबा जाधव यांचा पुण्यतिथी दिन कार्यक्रम संपन्न झाला. मा. कुलगुरू प्रा. (डॉ.) सुरेश गोसावी यांनी विद्यापीठाच्या खाशाबा जाधव क्रीडा संकुल येथील पै. खाशाबा जाधव यांच्या पुतळ्यास व प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी मा. प्र-कुलगुरू प्रा. (डॉ.) पराग काळकर, मा. कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे, मा. अधिसभा सदस्य श्री. कृष्णा भंडलकर, उपकुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर साळुंखे, विभागप्रमुख डॉ. विष्णू पेठकर आणि क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी उपस्थित होते.

# पीआर श्रीजेश नंबर १६ जर्सी निवृत्त

**नवी दिल्ली :** भारतीय हॉकी संघाने चमकदार कामगिरी केली आणि पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये कांस्यपदक जिंकले. कांस्यपदकाच्या लढतीत भारताने स्पेनचा २-१ असा पराभव केला होता. भारतीय हॉकी संघाने सलग दुसऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेत कांस्यपदक जिंकले आहे. यापूर्वी त्याने टोकियो ऑलिम्पिक (२०२०) मध्येही ही कामगिरी केली होती. भारतीय संघाच्या विजयात गोलरक्षक पीआर श्रीजेशने महत्त्वाची भूमिका बजावली. गोलरक्षक म्हणून पीआर श्रीजेशने संपूर्ण स्पर्धेत भारतीय गोलचे खडकासारखे संरक्षण केले. पॅरिस ऑलिम्पिकसह, गोलकीपर पीआर श्रीजेशने आंतरराष्ट्रीय हॉकीला अलविदा केला. पॅरिस ऑलिम्पिक ही त्याची शेवटची स्पर्धा असल्याचे श्रीजेशने आधीच जाहीर केले होते. हॉकी इंडियाचे सरचिटणीस भोला नाथ सिंग यांनीही घोषणा केली की, जवळपास दोन दशके १६ क्रमांकाची जर्सी परिधान करणारा ३६ वर्षीय श्रीजेश कनिष्ठ राष्ट्रीय प्रशिक्षकाची भूमिका स्वीकारणार आहे. श्रीजेशच्या सन्मानार्थ आयोजित कार्यक्रमात भोला नाथ म्हणाले, 'श्रीजेश आता ज्युनियर संघाचा प्रशिक्षक बनणार आहे आणि आम्ही वरिष्ठ संघासाठी १६ क्रमांकाची जर्सी निवृत्त करत आहोत.

# जीत काळेच्या हॅट्‌ट्रिकने आर्मी पब्लिक स्कूलची बाजी

**पुणे :** शिक्षण विभाग प्राथमिक पुणे मनपा व जिल्हा क्रीडा परिषद आयोजित सतरा वर्षांखालील मुलांच्या गटाच्या शालेय फुटबॉल स्पर्धेत जीत काळेने हॅटट्रिकसह केलेल्या (४, ९ व १२ वे मिनिट) तीन गोलच्या जोरावर खडकीच्या आर्मी पब्लिक स्कूलने सरहद स्कूलवर तीन गोलच्या फरकाने विजय प्राप्त केला. फग्युर्सन कॉलेजच्या मैदानावर झालेल्या लढतीत हिलग्रीन हायस्कूलने उंड्रीच्या संस्कृती स्कूलचा २-० असा पराभव केला. त्यात महत्त्वाचा वाटा रिदांश कुमार (५ वे मिनिट) व जिशान खानने (१६ वे मिनिट) केलेल्या प्रत्येकी एक गोलचा होता. घोरपडीच्या आर्मी पब्लिक स्कूलने हडपसरच्या मेंटॉर स्कूलवर ५-० असा विजय मिळविला. त्यात महत्त्वाचा वाटा दोन गोल करणाऱ्या सुयश यादवचा (१९ व २६ वे मिनिट) होता त्याला स्वरीत सोनी (८ वे मिनिट), भूषण गायकवाड (९. वे मिनिट) व पर्व मिश्राने (१२ वे मिनिट) प्रत्येकी एक गोल करून सुरेख साथ दिली.

# शौनक, रजत, जयचे विजय

**पुणे :** नागपूर येथे सुरू झालेल्या राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत पुरुष गटात पुण्याच्या शौनक शिंदे, रजत कदम, जय पेंडसे, नील मुळ्ये, अमिष आठवले, संस्कार बसाकने विजय मिळविले. पुरुष गटात पुण्याच्या शौनक शिंदेने केतन मुंशीचा ११-३, ११-३, ११-३ असा, रजत कदमने प्रतीक येडकेचा ११-५, ११-८, ११-८ असा, जय पेंडसेने हृषिकेश नलावडेचा ११-४, ११-५, ११-८ असा, नील मुळ्येने सार्थक टाभाणेचा ११-४, ११-४, ११-६ असा, अमिष आठवलेने हर्षीत खंडेलवालचा ११-६, ११-६, ११-८ असा तर संस्कार बसाकने बी. शहाचा ११-२, ११-५, ११-८ असा पराभव केला. महिला गटात समृद्धी कुलकर्णीने सेजल दाभाडेचा ११-१, ११-१, ११-१ असा तर पूजा सहस्त्रबुद्धे - कोपरकरने सिया हिंगोराणीचा ११-५, ७-११, १३-११, ११-९ असा, मानसी चिपळुणकरने स्वप्नाली नरळेचा ७-११, ११-८, ११-७, ५-११, १२-१० असा, श्रुती अमृतेने तिशीका पवारचा ११-६, ११-३, ११-५ असा पराभव केला होता.

# हर घर तिरंगा सायकल रॅली चे महापालिके द्वारे आयोजन

**पुणे :** पुणे महानगरपालिकेच्या क्रीडा विभागाच्या वतीने व पुणे महानगरपालिका सायकल क्लबचे सहकार्याने १५ ऑगस्ट २०२४ रोजी हर घर तिरंगा भव्य सायकल रॅली १५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ८.२० वाजता मनपा मुख्य भवन येथून आयोजित करण्यात आली आहे. सदर रॅलीचा फ्लॅग ऑफ माननीय राजेंद्र भोसले ,महापालिका आयुक्त तथा प्रशासक पुणे महानगरपालिका यांचे शुभहस्ते होणार आहे .सदर रॅलीमध्ये सहभागी सायकल स्वारास टी-शर्ट, मेडल देण्यात येणार असून चहा व नाश्त्याची सोय करण्यात आली आहे. सदर रॅलीमध्ये १८ ते ६० वयोगटातील सर्व स्त्री, पुरुषास सहभाग घेता येईल व सदर रॅली सर्वांसाठी विनामूल्य आहे. सकाळी ६ वाजता टी शर्ट वाटप सुरू करण्यात येईल.

### पहिल्या पीवायसी स्नुकर अँड बिलियर्डस लीग स्पर्धेत

# सुप्रीम एसेस संघानी मिळविला दुसरा विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पीवायसी हिंदू जिमखाना आयोजित पहिल्या पीवायसी स्नुकर अँड बिलियर्डस लीग स्पर्धेत साखळी फेरीत सुप्रीम एसेस संघाने सलग दुसरा विजय मिळवला.

पीवायसी जिमखाना येथील स्नुकर अँड बिलियर्डसमध्ये हॉलमध्ये सुरु असलेल्या या स्पर्धेत सुप्रीम एसेस संघाने जोग स्पेक्ट्रम कॉमेट्स संघाचा ५-२ असा सहज पराभव करून विजयी मालिका कायम राखली. विजयी संघाकडून निमिश कुलकर्णी, रोहित नारगोळकर, संजीव पटेल, गिरीश दामले, यश शहा यांनी सुरेख कामगिरी बजावली. दुसऱ्या सामन्यात राजवर्धन जोशी, सिद्धार्थ बदामीकर, उदयन भागवत, सौमित्‌रा रानडे, अंकित दामले,अनिश शहा यांनी केलेल्या विजयी कामगिरीच्या जोरावर बदामीकर स्टार्स संघाने क्यु मास्टर्स संघाचा ५-२ असा पराभव करून पहिला विजय नोंदवला.

अन्य लढतीत सेनूमेरो रॉकेट्स संघाने स्कायलाइन स्ट्रायकर्स संघाचा ४-३ असा संघर्षपूर्ण पराभव करून पहिला विजय मिळवला. सेनूमेरो रॉकेट्स संघाकडून अमित भडभडे,विशाल मल्होत्‌रा, योगेश लोहिया,अरिन माळी यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली.





**निकाल: साखळी फेरी:**

- बदामीकर स्टार्स वि.वि.क्यु मास्टर्स ५-२(१५ रेड स्नूकर एकेरी: राजवर्धन जोशी वि.वि.कर्णा मेहता ६९-१८; ६ रेड स्नूकर दुहेरी: राजवर्धन जोशी/सिद्धार्थ बदामीकर वि.वि.अनिकेत शिंदे/समीर जालन ५७-३०; बिलियर्ड्स रेस टू १५०: रणजित पांडे पराभुत वि.निशाद चौघुले १०५-१५१; ६ रेड स्नूकर एकेरी: उदयन भागवत वि.वि.राजवीर राज्याध्यक्ष ५२-२७; ६ रेड स्नूकर दुहेरी: सौमित्‌रा रानडे/अंकित दामले वि.वि.जयदीप गोडबोले/मिहीर शहा ६५-२६; ६ रेड स्नूकर एकेरी: शक्ती चितळे पराभुत वि.निशाद चौघुले ३२-५२; ब्लू बॉल शूट आउट: अनिश शहा वि.वि.यश काळे १-०);
- सुप्रीम एसेस वि.वि.जोग स्पेक्ट्रम कॉमेट्स ५-२(१५ रेड स्नूकर एकेरी: अमेय भावे पराभुत वि.सचिन संचेती ५८-९०; ६ रेड स्नूकर दुहेरी: स्वरूप कुलकर्णी/नकुल पटेल पराभुत वि.सचिन संचेती/संजीव आगाशे २४-४७; बिलियर्ड्स रेस टू १५०: निमिश कुलकर्णी वि.वि.विष्णू पुंडे १५१-८७; ६ रेड स्नूकर एकेरी: रोहित नारगोळकर वि.वि.आनंद आपटे ४२-३३: ६ रेड स्नूकर दुहेरी: संजीव पटेल/गिरीश दामले वि.वि.रोहित सुगंधी/अशोक शेट्टी ३८-२१; ६ रेड स्नुकर एकेरी: निमिश कुलकर्णी वि.वि.सलील देशपांडे ३८-३१; ब्लू बॉल शूट आउट: यश शहा वि.वि.हर्षद शहा १-०).

#रा